म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

# गांधीजींच्या सान्निध्यांत



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. ३२९ | विभाग | क्रमांक
पुस्तकाचें नांव गांधीजींच्या सान्निध्यांत
लेखक
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.


REFBK-0006739

गांधीजींच्या
सान्निध्यांत

## लेखकाचीं इतर पुस्तकें

काव्यप्रभा

किसान चरखा



प्रभाकर दिवाण

# गांधीजींच्या सान्निध्यांत

REFBK-0006739

चित्रकार:
प्र. श्री. गोरे

६८३८.

पद्म प्रकाशन लिमिटेड
मुंबई

किंमत ४ रुपये

प्र थ मा वृ त्ति
१९४६

*

सर्व हक्क स्वाधीन

प्रकाशक:
मोरारजी पदमसी
' पद्म प्रकाशन '
लिमिटेड
सर फिरोजशहा मेहता रोड,
फोर्ट, मुंबई.

मुद्रक:
रा. का. तटणीस
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४ ठाकुरद्वार,
मुंबई.

# विषयसूची


**१ नांवांतील काव्य** ... ... ... ... १

१ पहिलें दंडवत २ लोखंडी पातें ३ सेवेचीं नांवें ४ सेवेसाठीं सेवा करा ५ रंभेची गोष्ट ६ शादीलाल व बे-लगामवाला ७ बापूजींचा अभिनव ' रनर '

**२ आंतरः कोऽपि हेतुः** ... ... ... ... १०

१ शाल्मली तरु २ सेवेची आवश्यकता कोणाला ३ जमनालालजींचें चुंबकत्व ४ मीराबेनचा भटकेपणा ५ मडक्यांतील गार पाणी ६ मीराबेनचें वेदाध्ययन

**३ पर्णकुटीचें अंतरंग** ... ... ... ... १९

१ हिंवाळ्यांत ऊबदार आणि उन्हाळ्यांत थंड २ पक्क्या घरांचा प्रताप ३ खोलींतील वस्तु ४ गुप्तपणाचा अभाव ५ वर्तमानपत्री नव्हे ६ आश्रमचें पुस्तकालय ७ 'ॐ' आणि ' हे राम ' ८ खिस्ताचें चित्र ९ साधेपणांतील सौंदर्य

**४ जीवनाचीं प्रतीकें** ... ... ... ... २७

१ शिंदीचीं पानें २ नीरेचें माधुर्य ३ चरख्याची प्रतिमा ४ घड्याळाचे कांटे ५ व्रतनियमांचें रहस्य ६ सेफ्टी पिन्स

**५ गुलकंद आणि शिगोशिग प्याला** ... ... ३५

१ गरिबाला गरम पाणी २ शिगोशिग भरलेला प्याला ३ पाण्याच्या रांजणाला नळाची तोटी ४ मातीचीं सुंदर भांडीं ५ शुभ्र खादीचें तत्त्वज्ञान ६ टेबलपर फूल रखना चाहती हो ?

**६ भेट आणि उपायनें** ... ... ... ... ४८

१ आणखी पैसे मिळवा २ कोट्याधीश गांधी ३ मंगळसूत्राची भेट ४ फळांचे करंडे व मेव्याचीं पार्सलें ५ तुम्हीही

कांहीं वस्तु घेऊन या ६ पंढरीचा प्रसाद ७ भेटीचे त्रिविध नमुने

७ हरिनामाचा गजर ... ... ... ... ५३

१ वाळवंटांतील भक्तिरस २ तरुण अश्वत्थाच्या पर्णराजी-खालीं ३ प्रार्थनेंतील गीतापाठ ४ एक स्वर, एक ध्वनि ५ अनावृत दर्शन ६ नमो हो रँगे क्यो ७ वेरभई प्रभु क्यों नहीं आये ८ दिलरुब्याची मधुर साथ ९ क्रियात्मक प्रार्थना

८ संयमाचा साक्षात्कार ... ... ... ... ६३

१ कितनी लज्जाजनक बात है ? २ पंचाहत्तरींतही कणखर ३ मानवी काळ्यांचा आधार ४ आणखी एक उदाहरण ५ विलोभनीय दृश्य ६ आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनम् ७ चमत्कारांचें युग संपलें नाहीं ८ उघड्या आकाशाखालीं झोंप ९ ऐन थंडींतही बाहेर निजविलें १० पांजरपोळ ? ११ कीं वेड्याचें इस्पितळ ? १२ मित अहार, मित विहार १३ अधिक काम करण्यासाठीं विश्रान्ति

९ कस्तुरबांची पतिपरायणता ... ... ... ७३

१ पति आणि धर्म २ धगधगत्या चुलीपुढें ३ पंखा आणि विनोद ४ चलेजाव ५ बांचा सत्यनारायण ६ तुलसी रामायणाचें संस्करण ७ बापूजींची संन्यस्त वृत्ति ८ प्रान्त-भाषा व मातृभाषा ९ लग्नानें हिंदी प्रचार ? १० जवळ राहूं नका, काम करा ११ विवाहितांना स्थान नाहीं १२ बापूजींचा सहवास सोडला नाहीं १३ प्रेमाची भेट १४ सेवाग्रामची ओढ

१० चहा, कॉफी आणि मुलें ... ... ... ८३

१ चहाबाजांची सोय २ मिरची, मसाले व तळीव पदार्थ ३ आश्रमांतील कडक शिस्त ४ जो चा नहीं पीता वह आदमी नहीं ५ नायकमजीकडील चहाची बैठक ६ दुसऱ्यांच्या संवयी-

विषयीं सहिष्णुता ७ आचार विचारांचें स्वातंत्र्य ८ स्पृश्यांचा आश्रमावर बहिष्कार ९ लहान मुलांची आवड १० बापूजींशीं कट्टी ११ बापूजींचे कान धरले

११ आहारांतील अभिनव प्रयोग ... ... ... ९३

१ बापूजी भोंवळ येऊन पडले २ शरीर एक प्रयोगशाळा ३ डॉक्टर डास ४ हिरवी मिरची आणि विड्याचीं पानें ५ चौपट भाजी ६ अमिश्र अन्न ७ कांदा व लसूण ८ गाजरपारखीपणा ९ आंवळा देऊन कोहळा

१२ महादेवभाई ... ... ... ... ... १००

१ शरीरानें व मनानें उंच २ सौंदर्य आणि कलेचा भोक्ता ३ फुलांची आवड ४ बिल्वदलांची पूजा ५ गांधीजींचे दुसरे सेक्रेटरी ६ तीनशें पासष्ट वार ७ प्रेमाची उदारता ८ भाव-प्रवण व प्रेमळ

१३ सेवाग्रामच्या तीन शिला ... ... ... १०७

१ प्रभु रामचंद्राचा चरणस्पर्श २ निष्पर्ण वृक्षाखालीं ३ गांधीजी बसत नाहींत ४ जागा खालीं केली पाहिजे ५ गणेशापुढें गणेशाचें खंडण ६ स्पष्टवक्तेपणा व निर्भयता ७ लेखन, वाचन व मनन ८ बुद्धि व श्रद्धा यांचा समन्वय ९ कस्तुरबांचा ओटा १० बापूजींचा काळा पाषाण ११ मेरा पीछा कर रहे हो ?

१४ चिमूरचा तपस्वी ... .. ... ... ११८

१ असंस्कृत वेषांतील सुसंस्कृत महात्मा २ देहदंडनाची साधना ३ पोलिसांनीं टोप्या वर केल्या ४ निर्जल उपवास ५ चिमूरला जाण्याचा निर्धार ६ गुळाचें पाणी ७ स्वर्गारोहण ? ८ मृत्यूनिमित्त आनंद करा ९ मृत शरीर पशुपक्षांना द्या १० दैवी चमत्कार

१५ भनसाळींचा अद्भुत दिनक्रम ... ... ... १२७

१ मुक्तद्वार २ उत्कृष्ट शिक्षक ३ विषय आणि विद्यार्थ्यांचें वैचित्र्य ४ अंगाखांद्यावर शिक्षण ५ मुलांचे आवडते गुरुजी ६ भाजीची टोपली व दुधाचें पातेलें ७ विलक्षण पचनशक्ति ८ वजन वाढूं नये म्हणून उपवास ९ निरहंकार वृत्ति

१६ महात्माजी कोठें जाणार? ... ... ... १३६

१ गंगेची अधोगति २ गांधीजींच्या योजनांवर आक्षेप ३ मनांत विलक्षण खळबळ ४ गांधीजींचा अदम्य उत्साह ५ लढा अयशस्वी कां झाला? ६ पक्के क्रांतिकारी झाले ७ एकसूत्रीपणाचा अभाव ८ युद्धोत्तर भीषण दुर्दशेची जाणीव ९ जनतेचें दारिद्र्य वाढलें १० अहिंसक समाजरचनाच अवश्य ११ अधोगति नव्हे, उन्नति

१७ मी एकटा राहिलों तरी ... ... ... १४२

१ सेवाग्राममध्यें मल्लयुद्ध २ कणखर व्यावहारिक साधुत्व ३ अंतराळांतील विहार ४ एकांगी कार्याची जाणीव ५ खादी विकण्याची वस्तु नाहीं ६ कार्यांतील अडचणी ७ बापूजींच्या आंतरिक वेदना ८ शेतीची उपेक्षा करूं नका ९ राज्यसत्तेची आवश्यकता १० मग अहिंसा कशाला? ११ सत्ता नको, अहिंसा हवी १२ आपल्या पायावर उभें राहा १३ कठिण परीक्षा हे १४ योग्य कार्यकर्त्यांची उणीव १५ गांधींचा निर्धार १६ समग्र उत्थानाची चळवळ १७ साक्षरता नाहीं, सार्थकता हवी १८ बुलंद काम

# स्वागत

**'गांधीजींच्या सान्निध्यांत'** यासारख्या सोप्या, रोचक आणि बागडणाऱ्या गोजिरवाण्या पुस्तकाला खरोखर प्रस्तावनेची जरूरच नाहीं. आणि या पुस्तकाचे लेखक कोण कसे आहेत याची कल्पना तर या बोलक्या पुस्तकावरूनच होऊं शकते. त्यांतूनही कोणी प्रस्तावना लिहावयाचीच, तर ती माझ्यासारख्या घरच्या मनुष्यानें लिहावी कीं काय हाही एक प्रश्न आहे. मी जरी सेवाग्रामवासी नसलों, तरी गांधीजींच्या सान्निध्यांत राहिलेल्या जुन्यांतल्या जुन्या आश्रमवासीयांपैकीं एक आहें. मला या पुस्तकाविषयीं लिहितांना संकोच वाटणें स्वाभाविक आहे. पण श्री. विनोबांच्या शिष्यांनीं कांहीं करावयास सांगितलें तर होतां होईल तों नाहीं म्हणावयाचें नाहीं, अशी वृत्ति असल्यामुळें हे चार शब्द लिहावयास मी तयार झालों आहें.

**'गांधीजींच्या सान्निध्यांत'** या नांवाखालीं किती तरी गोष्टी येऊं शकतात. सेवाग्रामला आठ-दहा दिवस गांधीजींकडे राहून आपण काय पाहिलें, काय ऐकलें, गांधींना काय विचारलें आणि काय काय अनुभवलें याचा वृत्तांत लुई फिशरसारखा एखादा जागतिक मुलाखतदार उत्कंठित जनतेपुढें सविस्तर मांडूं शकतो.

गांधीजींच्या आसपासचें वातावरण कसें आहे याचें चित्र काढून गांधीजींच्या आवडीनावडी आणि संवयी कशा आहेत हें सांगून गांधीजींच्या सान्निध्यांत अखंड राहणाऱ्या व्यक्ति कोण कशा आहेत हेंही सांगतां येईल. आणि तिसरा प्रकार म्हणजे राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला वाहून घेतलेल्या अनेक संस्थांचे जनक आणि पोषक अशा गांधींनीं स्वतःच्या सान्निध्यांत कोणकोणत्या प्रवृत्तींचा पसारा विस्तारला आहे, हेंही एखाद्या पुस्तकांत आणतां येईल.

प्रस्तुत पुस्तक दुसऱ्या प्रकारचें आहे. आणि तेंही सेवाग्रामच्या वातावरणांत रुळलेल्या—आणि कांहीं अंशीं मुरलेल्या—अशा एका व्यक्तीनें लिहिलेलें आहे, हें या पुस्तकाचें वैशिष्ट्य आहे.

श्री. विनोबांच्या शिष्यवृन्दांत दिवाणबंधूंचें एक विशेष स्थान आहे. चारही बंधूंनीं विनोबांच्या प्रेरणेनें राष्ट्रसेवेला वाहून घेतलें आहे. श्री. मनोहर दिवाण

पवनारच्या वाटेवर असलेल्या दत्तपुरांत महारोगी सेवाश्रम चालवून स्वतःच्या जीवनाचें सार्थक करीत आहेत, आणि हिंदुस्थानांतील धर्मपरायण लोकांना सेवेचा एक नवीन उज्ज्वल प्रकार दाखवून देत आहेत. कुंदर दिवाण तसें पाहिलें तर खादीकार्याला वाहून घेतलेले, पण संस्कृत, पाली, मराठी, हिंदी वगैरे भाषणांतील धार्मिक साहित्याच्या व्यासंगानें आणि व्याकरण, छंद, भाषाशास्त्र वगैरे तर्ककर्कश विषयांच्या आवडीमुळें येथील लोकांकडून 'शास्त्री' ही पदवी मिळवून बसले आहेत.

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक प्रभाकर दिवाण प्रथमपासूनचे साहित्यरसिक. यांचा काव्यप्रभाकर महाराष्ट्र काव्यरसिकांपुढें केव्हांचा तेवत आहे. (त्या काव्य संग्रहाला एक प्रस्तावना नागपूर जेलमधून मीं लिहून पाठविली होती. जेलच्या अधिकाऱ्यांनीं ती पाठविण्याची परवानगी दिली. पण तेथील कारकून मंडळींना कदाचित् एवढी उदारता सहन झाली नसेल! माझी प्रस्तावना जेलमधून सुटूं शकली नाहीं एवढें खरें.) प्रभाकरनीं स्वतःला शिक्षणकार्याला वाहून घेतलें आहे. उद्योगप्रधान, बौद्धिक शिक्षणाचा विकास करण्यांत तें गुंतलेलें असतात. द्वाडाचे साहित्यरसिक असल्यामुळेंच फावल्या वेळीं त्यांना लोकभोग्य असें कांहीं तरी लिहावेसें वाटतें.

गांधीजींसारख्या थोर पुरुषांना लहान गोष्टींतील आणि लहान माणसांतील थोरपणा चटकन दिसतो. आणि त्याची ते कदर करतात. सामान्य जनतेचें असें नसतें. त्यांना थोर पुरुषांच्या जीवनांतील अगदीं साध्या साध्या गोष्टी ऐकाव्याशा वाटतात. जनतेची ही आवड तृप्त करणें अयोग्य नाहीं. थोरांचा थोरपणा पाहून सामान्य जनतेला ते इतके दूरचे, दुर्गम आणि दुर्ज्ञेय वाटतात कीं त्यांना शेंदूर फांसून, देव्हाऱ्यांत बसवून त्यांची पूजा करणें एवढेंच आपलें कर्तव्य आहे, असें जनतेला वाटूं लागतें. अशा रीतीनें थोरांचे थोरपणच त्यांच्या लोकजागृतीच्या कार्यांत आड येऊं लागलें, म्हणजे कोणीं तरी जनतेला सांगावें लागतें कीं बाबांनो, आणि बायांनो, हे थोर पुरुष तुमच्याआमच्यासारखेच मनुष्य आहेत. हे शरीरधारी आहेत. आपल्याच भाषेंत बोलतात. आपल्या जीवनाविषयीं त्यांना रस वाटतो, आपुलकी वाटते. त्यांच्या वातावरणांत जाणें आपल्याला शक्य आहे.

थोरांचे लोकोत्तर सद्‌गुण आणि चारित्र्य पाहून आपल्या मनांत आदर उत्पन्न होतो, पण त्यांच्यांतील मानवसहज वैशिष्ट्यें पाहून त्यांच्याविषयीं प्रेम वाटूं लागतें,

आपुलकी वाटूं लागते आणि त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी आपण देखील करून पाहण्यासारख्या आहेत, असा आत्मविश्वास आपल्याला वाटूं लागतो.

अशाच प्रकारचा अनुभव ह्या पुस्तकाच्या वाचकांना होईल. माझ्यासारख्या घरच्या आणि काकदृष्टि मनुष्याला येथील वर्णनांत चार दोन चुका सांपडावयाच्या; पण येथील वर्णन हें कांहीं कॅमेरांतील चित्रासारखें नाहीं. चित्रकाराच्या रेखा-चित्रासारखें आहे. कॅमेराचे डोळे आंधळे असतात म्हणून ते सर्व कांहीं पाहतात आणि सर्वच नोंदून काढतात. चित्रकाराचे विदग्ध डोळे आवडनिवड वापरून आपल्या उपयोगाचें तेवढेंच पाहातात. आणि तेही स्वतःच्या अभिरुचीप्रमाणेंच लोकांपुढें वाढतात.

या पुस्तकांतील एक अगदीं लहानशी चूक मला आवडली नाहीं. घड्याळ लटकविण्यासाठीं गांधीजी जो कडदोरा बांधतात तो काळ्या रंगाचा कधींच नसतो. त्यांचा पोशाख जो कांहीं असेल तो, नखशिखान्त शुभ्रच असतो. उद्यां जर गांधीजींनीं काळ्या रंगाचा कडदोरा बांधण्याचें सुरू केलें तर मी जाऊन तक्रार करीन कीं आमच्या डोळ्यांवर असा अत्याचार करूं नका. मला सर्व रंग आवड-तात; पण माझ्या डोळ्यांत बसलेल्या बापूजींच्या अंगावर मात्र रंगीत कपडा किंवा एक धागा देखील मला सहन होणार नाहीं.

तसेंच, बापूजींनीं दक्षिण आफ्रिकेंत असतांना मीठ सोडलें होतें हें खरें. पण हिंदुस्थानांत येऊन धान्याहार सुरू केल्यानंतर त्यांनीं मीठ खाण्यास सुरुवात केली. पुस्तकांत लिहिल्याप्रमाणें त्यांनीं व्रत म्हणून मीठ सोडलेलें नाहीं.

गांधीजी सेवाग्रामला राहयला कसे गेले आणि विनोबा वर्ध्याला कसे आले यांची कथा देखील आहे तशीच लोकांपुढें आली पाहिजे.

गांधीजी मगनवाडींत राहत असतां मीराबेननीं स्वतःसाठीं एक झोंपडी मागून घेतली. गांधीजींनीं त्यांना ती बांधून दिली. पुढें त्या म्हणाल्या, ' जवळच्या शिंदी गांवांत सफाईचें काम चालले आहे; तेथें मला राहावयाचें आहे. ' गांधीजींनीं त्यांना तेथें एक खोली बांधून दिली. पुढें त्या म्हणाल्या, ' तेथं मन लागत नाहीं, ' तेव्हां बापूजींनीं त्यांना सांगितलें, ' हें असें आतां चालावयाचें नाहीं. तूं आपण होऊन हवें तें स्थान पसंत कर. तेथं तुला सर्व सोय करून देईन. मग मात्र तें स्थान तूं सोडतां कामा नये. जर सोडलेंस, तर मला प्रायश्चित्त करावें

लागेल. माझा असाही आग्रह नाहीं कीं तूं एक ठिकाणीं स्थिर होऊन रहावेंस. पण तसा संकल्प केलासच, तर त्याला चिकटून राहाण्याची दृढता तुझ्यांत असली पाहिजे.'

इतकें हुडसून खडसून सांगितल्यानंतर मीराबेननीं श्री. जमनालालजींचें माल-गुजारी गांव शेगांव पसंत केलें आणि तेथें त्या राहूं लागल्या. हल्लीं जी झोंपडी–ॐ, चरखे आणि शिंदीचीं झाडें त्यांनीं मढविलेल्या भिंतींची झोंपडी–गांधीजींची झोंपडी म्हणून ओळखली जाते, ती खरोखर मीराबेननीं स्वतःसाठीं बांधलेली होती. भिंती-वरील चित्रें त्यांनीं आपल्या हौसेसाठींच तयार केलीं होतीं.

पण जिप्सी स्वभावाच्या मीराबेनचें शेगांवांत देखील मन लागेना. तेव्हां बापूजी म्हणाले, कीं ' मला कोठें तरी खेडेगांवांत जाऊन राहावयाचें आहेच. तेव्हां जेथ तुझें मन लागत नाहीं, तेथेंच जाऊन मी राहाणार. मी राहिलों म्हणजे तुझें मन लागूं लागेल हें खरें; पण त्यानें खरें प्रायश्चित्त होणार नाहीं. तेव्हां तूं शेगांवला राहतां कामा नयेस.'

हल्लीं ज्या झोंपडीच्या ओट्यावर सर्व लोक जेवायला बसतात, ती खरोखर बापूजींच्या राहण्यासाठीं बांधली होती. कांहीं दिवस तेथें ते राहिलेही आणि म्हणूनच त्यांच्या शेजारीं बांची झोंपडी बांधली गेली. मीराबेनसाठीं शेगांव आणि वरोड्याच्या मध्यें एक झोंपडी बांधून दिली गेली. आणि तेथच एक विहीरही खणण्यांत आली, जिचें वर्णन या पुस्तकांत आलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे गांधीजींनीं स्वतः शेगांव पसंत केलें नसून तें त्यांच्यासाठीं नियतीकडून पसंत केलें गेलें. त्या शेगांवचें सेवाग्राम बनविलें तें मात्र गांधीजींनीं.

श्री. विनोबा भावे साबरमतीहून वर्ध्याला आले त्याचीही कथा अशीच आहे. श्री. जमनालालजींनीं त्यांना खेंचून आणलें असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. ती सर्व कथा येथें देण्याचें प्रयोजन नाहीं.

या पुस्तकांत कस्तुरबांचें जें रेखाचित्र आलें आहे, तें एकांगी आहे. आश्रम आणि आश्रमाचे नियम यांच्या चौकटींत स्वतःला बसविण्यासाठीं त्या स्वेच्छेनें किती जिवापाड प्रयत्न करीत असत तें मी कोचरब आणि साबरमतीला पाहिलें आहे. त्यांच्या मातृहृदयांत वात्सल्य मुबलक भरलें असल्यामुळें आश्रमांतील बाळगोपाळांना आणि कच्च्या लोकांना त्यांची पाखर नेहमीं असे हें खरें; पण


आणखी एक दोन बारीक सारीक गोष्टी सुधारल्या पाहिजेत. इतर सर्व धार्मिक पुरुष सोडून गांधीजींनीं स्वतःच्या खोलींत ठेवण्यासाठीं ख्रिस्ताचें चित्र पसंत केलें आहे, अशी जी छाप येथील वर्णन वाचून पडते, ती बरोबर नाहीं. राजकुमारी अमृतकुंवर स्वतः ख्रिस्ती असल्यामुळें त्यांना तें चित्र आवडतें. जर तेथून त चित्र कोणी हालविलें तर गांधीजींच्या ध्यानांतही येणार नाहीं. राजकुमारींनीं ठेवललें चित्र दुसऱ्या कोणी कां हालविलें याची ते चौकशी करतील, पण चित्र नसल्यामुळें चुकल्यासारखें होणार नाहीं. त्यांच्या सबंध आयुष्यांत कोणत्याही अर्थानें घ्या, गांधीजी मूर्तींची कदर करतात, पण ते मूर्तिपूजक मुळींच नाहींत. मूर्तिपूजक आणि मूर्तिध्वंसक दोघांनींही गांधीजींकडून धडा घेण्यासारखें आहे. त्यांचें तत्त्वज्ञान आणि त्यांचें जीवनविरोधी वस्तूंतील हार्द ओळखून त्याचा अहिंसक समन्वय साधण्यालाच वाहिलेलें आहे.

काकावाडी, वर्धा
ता. २७-९-४६

**काका कालेलकर**

म. ग्रं. सं. ठाणें.

धा. क. ६५३९



# १ नांवांतील काव्य

## पहिला दंडवत

: १ :

१९३६ ची गोष्ट असेल. बापूजी नुकतेच सेवाग्रामला राहण्याला आले होते. त्यावेळेस रायपूरकडील माझे एक मित्र नालवाडी आश्रमांत माझ्याकडे आले. सेवाग्रामला जाऊन बापूजींचें दर्शन घेण्याची त्यांची इच्छा होती. पावसाळ्याची सुरुवात असल्यामुळें वारा व पाऊस एक दोन दिवसांआड सारखा चालू होता. त्यामुळें सेवाग्रामला जाणें सोपी गोष्ट नव्हती. मी त्यांना म्हणालों, ' महात्माजींचें दर्शन येथूनच घ्या. सेवाग्राम तुम्हांला तीर्थक्षेत्र वाटत आहे, तें ठीकच. परंतु ह्या दिवसांत तेथें जाणें म्हणजे एक दिव्य करण्यासारखेंच

आहे. पंढरपूर महाराष्ट्राचें अत्यंत मोठें तीर्थस्थान आहे. परंतु सोसाट्याचा वारा व पाऊस असला म्हणजे लोक काय म्हणतात, आहे तुम्हाला ठाऊक?'

माझ्या मित्रांनीं नकारार्थी मान हलविली, तेव्हां मीं त्यांना खालील ओळी म्हणून दाखविल्या;—

**—'पाऊस पडला, चिखल झाला, नदीला आला पूर।**
**माझें इथेंच पंढरपूर!—**

ह्या उक्तीप्रमाणें आपलें सेवाग्रामही आतां इथेंच समजा.'

माझे मित्र माझ्यापेक्षांहि जास्त गांधीभक्त होते. पावसाच्या व रस्त्याच्या भीतीमुळें ते आपला बेत रहित करण्याला तयार झाले नाहींत. त्यांच्या आग्रहामुळें अखेरीस आम्ही सेवाग्रामला जाण्याला निघालों. नालवाडीहून सेवाग्राम तीन–साडेतीन मैल असेल. चिखल तुडवीत व एक दोन नाले ओलांडीत आम्ही कसेबसे सेवाग्रामला आलों. रायपूरकडे लाल मातीची जमीन असल्यामुळें पावसाळ्यांत देखील तेथें चिखल होत नाहीं; त्यामुळें सेवाग्रामला काळ्या मातीच्या चिखलांतून जाणें म्हणजे काय, याची त्यांना चांगली कल्पना आली. बापूजींच्या झोपडीच्या जसजसे आम्ही जवळ आलों, तसतसा चिखल जास्तच वाढत गेला. मित्रांना सांभाळून चालण्याचा इशारा मी मधून मधून देत होतों. परंतु बापूजींची झोंपडी दिसूं लागतांच त्यांचें चालण्याकडे थोडें दुर्लक्ष्य झालें आणि एका ठिकाणीं अखेरीस पाय निसटून ते सपशेल भूमिसात् झाले.

'बापूजींना आपण घातलेला हा पहिला दंडवत् खरोखरच अपूर्व आहे!' मी हंसत हंसत म्हणालों.



एवढें बरें झालें, कीं त्यांनीं पडतांना आपला तोल हातावर सांभाळला होता; त्यामुळें चिखलानें त्यांचे कपडे फारसे खराब झाले नाहींत. ह्यानंतर विशेष कांहीं न घडतां आम्ही बापूजींच्या झोंपडीजवळ आलों. दाराशींच शेत वखरण्याचें एक लोखंडी पातें दोन खुंटांवर उलटें बसविलें होतें.

## लोखंडी पातें : २ :

'दाराजवळ हें काय ठेवलें आहे?'—मित्रांनीं पृच्छा केली.

'देवळांत जाण्यापूर्वीं पाय धुवून आंत जावें लागतें, माहित आहे ना तुम्हाला? त्याप्रमाणें बापूजींच्या झोंपडींत जाण्यापूर्वीं ह्या लोखंडी पात्यावर पाय साफ करावे लागतात.'—मीं त्यांना सांगितलें.

पायांना लागलेला चिखल खरडण्याकरितां लोखंडी पात्याची ही योजना अजूनहि तुम्हांला येथें दिसेल. सेवाग्रामची जमीन काळ्या मातीची असल्यामुळें थोडासा पाऊस पडतांच पायाला तिचे पेंड लागतात. ते धुऊन काढावयाचे म्हटल्यास बादली दोन बादली पाणी देखील कमीच पडेल. त्याकरितां आधीं लोखंडी पात्यावर पाय खरडून मग पाय धुणें सोयीचें असल्यामुळें बापूजींनीं ही अभिनव योजना

केलेली आहे. आम्हीं त्या पात्यावर पाय खरडून टाकले व नंतर पाण्यानें पाय स्वच्छ करून बापूजींच्या खोलींत दाखल झालों. बापूजींचें दर्शन घेऊन आणि इकडे तिकडे फिरून आम्ही नालवाडीला परत गेलों. पूर्वीं सेवाग्रामला कसें यावें लागे, हें वाचकांना कळावें, म्हणून प्रारंभीं ही गोष्ट सांगितली.

## सेवेचीं नांवें : ३ :

सेवाग्रामचें मूळचें नांव शेगांव असें आहे. बापूजी येथें आल्यानंतर जवळ जवळ चार वर्षांनीं बापूजींनीं शेगांवचें सेवाग्राम हें नवीन नांव ठेवलें. 'सेवा' बापूजींचा सर्वांत आवडता शब्द आहे. बापूजींच्या जीवनाचें एका शब्दांत वर्णन करावयाचें झाल्यास तें 'सेवा' ह्या शब्दानें जितकें उत्तम होईल, तितकें दुसऱ्या कोणत्याही शब्दानें होणार नाहीं, असें म्हणतां येईल. लोकांच्या सेवेकरितां त्यांनीं आपलें जीवन दिलें आहे, त्यांचें सारें जीवनच सेवामय झालें आहे. दक्षिण आफ्रिकेंत असतांना सत्याग्रही स्त्रियांचीं लुगडीं त्यांनीं धुतलीं, मजुरांच्या ओंगळ मुलांना स्नानें घातलीं, त्यांचीं घाण नाकें देखील साफ केलीं. अल्प सेवेचीं अशीं अनेक कामें अत्यंत आवडीनें त्यांनीं केलीं आहेत. नामदार गोखले दक्षिण आफ्रिकेंत गेले असतां रोज स्वतः इस्तरी करून बापूजी उपरणें गोखल्यांना देत. हिंदुस्थानांत आल्या-नंतर काँग्रेसच्या बडया पुढाऱ्यांचे बूट त्यांच्या पायांत ते घालीत, व कोट अंगावर चढवून त्याचीं बटनें देखील ते लावून देत. त्यांनीं केलेली देशसेवा उत्तुंग हिमालयाप्रमाणें आमच्यासमोर आज उभी आहे; परंतु तिची उभारणी बापूजींच्या ह्या सेवाभावांत आहे, हें विसरून चालणार नाहीं.

पार्लमेंटरी कार्यक्रमापेक्षां बापूजी नेहमीं विधायक कार्यक्रमावर जो इतका भर देतात, तो कां? कारण विधायक कार्यक्रमांत सेवा

आहे, तशी ती पार्लमेंटरी कार्यक्रमांत नाहीं. विधायक कार्यक्रम म्हणजे सेवेचें संघटित स्वरूप होय. हरिजन सेवा, गोसेवा, ग्रामसेवा हे शब्द देखील सेवेवर अधिष्ठित आहेत. ह्या शब्दांतून सेवा काढून टाकल्यास त्याचें कांहीं तरी महत्त्व उरेल काय ? हिंदुस्थानांत इतक्या उत्कटतेनें सेवेची वृत्ति निर्माण करणारे बापूजीच पहिले महापुरुष आहेत, असें म्हणतां येईल. सेवा शब्द त्यांना इतका आवडता आहे, कीं प्रत्येक ठिकाणीं तो शब्द आल्याशिवाय त्यांचें समाधान होत नाहीं.

## सेवेसाठीं सेवा करा : ४ :

एकदां कॉंग्रेसचे एक पुढारी बापूजींना भेटण्याला आले होते. कॉंग्रेस कमिट्या सरकारनें बेकायदेशीर ठरविल्या असल्यामुळें विधायक कार्यक्रम करण्याकरितां तशाच तऱ्हेचें दुसरें कांहीं संघटन करण्याचा त्यांचा विचार होता व त्याकरितां बापूजींची सल्ला घेण्याला ते आले होते. संघटनाचें नांव ‘ कॉंग्रेस कार्यकर्ता समिति ’ अशासारखें ते ठेवणार होते. बापूजींनीं त्यांना सांगितलें कीं कार्यकर्ता ह्या शब्दांत अहंकाराचा भाव येण्याचा संभव आहे; तेव्हां ‘ कार्यकर्ता समिति ’ ऐवजीं ‘ सेवक समिति ’ असें नांव ठेवणें, त्यांना अधिक पसंत होईल.

नालवाडी जवळील महारोगी सेवामंडळाच्या कुष्ठीनिवासाला त्यांनीं भेट दिली. त्या वेळीं ‘सेवेसाठीं सेवा करा’ असा तेथील कार्यकर्त्यांना त्यांनीं संदेश दिला. बापूजी सर्वत्र एक सेवाभाव पाहूं इच्छितात; सर्व जग सेवामय करण्याची त्यांची आकांक्षा आहे आणि म्हणूनच शेगांवचें नांव बदलून त्याला सेवाग्राम असें आपल्या पसंतीचें नांव त्यांनीं दिलें.

ह्यावर ‘ नांवांत काय आहे ? ’—म्हणून तुम्ही विचाराल. नांवां-तहि पुष्कळ आहे, असें बापूजी म्हणतील. नांवांत जर कांहीं नसतें,

तर रोज रामनामाचा ते जप करतात, तो कां? प्रार्थनेचा जो एवढा प्रपंच त्यांनीं चालविला आहे, तो उगीच कीं काय? शब्दांच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास आहे, म्हणूनच नांव ठेवण्यांत ते विशेष लक्ष घालतात. सेवाग्राममध्यें मूल जन्मलें, म्हणजे मुलांचे आईबाप—' नांव काय ठेवावयाचें? नांव काय ठेवावयाचें?'—म्हणून बापूजींकडे येतात. नवीन पुस्तक, नवीन मासिक किंवा नवीन संस्था सुरू करावयाची असल्यास त्यांच्या जवळचे लोक बापूजींचा विचार घेतल्याशिवाय राहत नाहींत. बापूजी स्वतः ईश्वरभक्त असल्यामुळें भक्तांचीं नांवें त्यांना विशेष आवडतात, ह्यांत आश्चर्य नाहीं. आपल्या पहिल्या दोन मुलांचीं 'हिरालाल' व 'मणिलाल' हीं दोन नांवें त्यांनीं आपल्या साधनावस्थेच्या पूर्वीं ठेवलीं आहेत. त्यानंतर त्यांनीं ठेवलेलीं आपल्या मुलांचीं रामदास आणि देवदास हीं नांवें पाहा. त्यांच्या जीवनांत केव्हां बदल झाला, हें त्यांच्या मुलांच्या नांवावरूनहि कळण्यासारखें नाहीं काय?

## रंभेची गोष्ट :५:

बापूजींचें जीवन अत्यंत शुष्क आहे. त्यांत काव्य किंवा सौंदर्य बहुतेक नाहींच, अशी अनेकांची समजूत आहे. परंतु ही समजूत कशी चुकीची आहे, हें त्यांनीं ठेवलेल्या नांवांवरूनहि कळण्यासारखें आहे. त्यांचीं नांवें लहान, सुटसुटीत व उच्चारसुलभ तर असतातच, परंतु त्यांत जें सौंदर्य आणि काव्य दृष्टीस पडतें, तें पाहिलें म्हणजे ते रसिक नाहींत असें कोणी म्हणूं शकणार नाहीं. रामदास गांधींच्या मुलीचें नांव रंभा ठेवावें असें त्यांनीं सुचविलें होतें, हें ऐकून पुष्कळांना आश्चर्य वाटेल. उत्तान काव्यमय व शृंगारिक म्हणून तें कोणाला आवडलें नाहीं व म्हणून त्याऐवजीं सुमित्रा हें सर्व परिचित नांव ठेवण्यांत आलें. सुंदर व काव्यमय एवढ्यावरूनच

कांहीं बापूजींनीं तें नांव ठेवलें नव्हतें, हें खरें; परंतु ज्या तऱ्हेचें नांव ठेवावयाचें असेल तें विचारपोषक असून सुंदरहि असलें पाहिजे, ही बापूजींची दृष्टि आहे. रंभा हें नांव सुचविण्यांत ह्या दोन्ही गोष्टी दिसून येतात. लहापनणीं त्यांचा सांभाळ करण्याकरितां त्यांची एक दाई होती. तिच्या भाविक शिकवणीमुळेंच ईश्वरभक्तीची गोडी आपणाला लागली, असें बापूजींनीं लिहिलें आहे. रामनामाचा मंत्र देणारी त्यांची प्रथम गुरु ही रंभाच होय. बापूजींना लहानपणीं विंचू—साप व भुतेंखेतें ह्यांची फार भीति वाटत असे. अंधारांत एकटें जायचें म्हणजे त्यांचा थरकांप होई. अशा वेळीं रामनाम घेत जा म्हणजे भीति पळून जाईल, असा रंभा दाईनें त्यांना मंत्र दिला. तेव्हांपासून रामनामावर बसलेला त्यांचा विश्वास आज त्यांच्यांत किती दृढ झालेला आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. रामनामाची दीक्षा देणाऱ्या त्या भाविक दाईची स्मृति ताजी ठेवण्यासाठीं रामदास गांधींच्या मुलीचें रंभा नांव ठेवण्याला त्यांनीं सांगितलें होतें. पण असें असलें, तरी रंभा हें नांव निवडण्यांत त्यांची जी रसिकता दिसून आली, ती नजरेआड करतां येणार नाहीं.

अशाच प्रकारें अनेक मुलांचीं नांवें त्यांनीं ठेवलीं आहेत. वर्ध्याचे डॉ. त्रिवेदी यांच्या मुलीचें नांव त्यांनीं ‘ आरति ’ ठेवलें आहे. किती काव्यमय आणि उदात्त नांव आहे हें ! कांहीं दिवसांपूर्वीं चरखा संघांतील एका कार्यकर्त्याच्या बहिणीची प्रसूति आश्रमाच्या दवाखान्यांत झाली होती. दहाबारा दिवस झाल्यानंतर ते कार्यकर्ते आपल्या बहिणीला दवाखान्यांतून आपल्या घरीं घेऊन जाऊं लागले, तेव्हां घरीं नेण्यापूर्वीं बापूजींनीं मुलासह त्यांना आपणाकडे बोलाविलें, व स्वतः होऊन ‘मुलाचें नांव काय ठेवणार’ म्हणून प्रश्न काढला व ‘बापूजी, तुम्हीच ठेवा ना नांव ’ असें त्या कार्यकर्त्यांनीं म्हटल्यावर त्या मुलाचें ‘ हरिश्चंद्र ’ असें नांव ठेवलें. सत्याचा निःसीम उपासक म्हणून

हरिश्चंद्राचें नांव बापूजींना किती प्रिय आहे, हें त्यांनीं आपल्या आत्मकथेंत लिहिलें आहे. आपल्या आवडत्या गोष्टींचें नित्य स्मरण राहावें म्हणून ते अशा प्रकारें मुलांचीं नांवें ठेवीत असतात, हें यावरून दिसून येईल.

## शादीलाल व बे-लगामवाला : ६ :

बापूजी स्वभावत: विनोदी आहेत, त्यामुळें ते पुष्कळदां कोणाकोणाला विनोदी टोपण नांवें ठेवीत असतात. त्यांचीं हीं नांवें मोठीं समर्पक असतात, यांत शंका नाहीं. शेठ जमनालाल बजाज यांना त्यांनीं 'शादीलाल' बनविलें होतें. तरुण-तरुणींचीं लग्नें जुळविणें हा जमनालालजींचा आवडता व्यवसाय होता. त्यामुळें बापूजींनीं दिलेलें 'शादीलाल' हें नांव त्यांना बरोबर लागू पडत असे. मुंबईकडील एका पारशी गृहस्थांचें नांव वेलगामवाला असें आहे. त्यांना बापूजींनीं 'बे–लगामवाला' असें म्हटलें, तेव्हां एकच हंशा पिकला, असें म्हणतात. अशासारखीं समर्पक टोपण नांवें ठेवून बापूजी प्रसंगीं सुंदर विनोद निर्माण करतात.

## बापूजींचा 'रनर' : ७ :

खेड्यांत गेल्याशिवाय खेड्यांची सेवा होणार नाहीं, असें बापूजींचें म्हणणें आहे, आणि म्हणूनच ते सेवाग्रामला आले व जें पूर्वीं शेगांव होतें त्याला त्यांनीं सेवाग्राम बनविलें. नामपरिवर्तनाच्या मागील त्यांची दृष्टि सेवेची आहे; असें असलें तरी शेगांवचें नांव बदलण्याला प्रत्यक्ष कारण दुसरेंच झालें आहे. बापूजी येथें आले, तेव्हां शेगांवला पोस्ट ऑफिस नव्हतें. त्यांचें टपाल वर्ध्याच्या पोस्टांत येत असे व तेथून तें सेवाग्रामला आणावें लागे. तसेंच जाणारें

टपालहि सेवाग्रामहून वर्ध्याला पाठवावें लागे. ह्यामुळें अर्थातच बापूजींच्या पत्रव्यवहाराला उशीर होई. सुरुवातीला महादेवभाई स्वत: वर्ध्याहून सेवाग्रामला टपाल घेऊन येत व त्याचीं उत्तरें लिहून वर्ध्याला घेऊन जात. बापूजींकरितां सुरुवातीला येथें एकच झोंपडी होती. त्यांत जास्त लोकांना राहणें कठिण होतें, हें एक कारण आणि दुसरें म्हणजे टपालाची अडचण; ह्या दोन कारणांमुळें महादेवभाई शेगांवला न राहतां वर्ध्याला मगनवाडींत राहत. मगनवाडीहून कधीं मोठ्या पहांटे, तर कधीं दुपारीं भर बारा वाजतां ते निघत व पांच साडेपांच मैलांचा तो इतिहासप्रसिद्ध रस्ता तुडवीत सेवाग्रामला येत आणि महत्त्वाच्या प्रश्नांचीं उत्तरें लिहून व इतर पत्रांना काय उत्तर लिहावयाचें यासंबंधीं बापूजींचा विचार घेऊन येथून परत फिरत. ऊन असो कीं पाऊस असो, रोज सेवाग्रामला पायीं येण्याजाण्याचा हा कार्यक्रम त्यांनीं कित्येक महिने चालविला होता. त्यांची ती उंची पुरी धिप्पाड मूर्ति सेवाग्रामच्या धुळीनें भरलेल्या रखरखीत रस्त्यावरून झपाझप पावलें टाकीत उन्हांतून चाललेली अजूनहि दृष्टीसमोर उभी राहते.


कॉंग्रेसनें अधिकारग्रहण केल्यानंतर बापूजींचा पत्रव्यवहार किती वाढला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. आधींच त्यांचा पत्रव्यवहार प्रचंड, त्यांत ह्यामुळें विलक्षण वाढ झाली. त्याकरतां पोस्ट खात्याला सेवाग्रामला स्वतंत्र पोस्ट ऑफिस ठेवणें भाग पडलें. वऱ्हाडमध्यें दुसरें एक ‘ शेगांव ’ आहे, त्यामुळें शेगांवच्या नांवावर आलेल्या पत्रांचा मोठा घोंटाळा होई. हा घोंटाळा टाळण्यासाठीं पोस्ट खात्याच्या विनंतीवरून बापूजींनीं शेगांवचें नांव बदलून त्याला सेवाग्राम हें नवें नांव दिलें. ‘ सेवाग्राम ’ नांवाचा हा असा इतिहास आहे.

# २ आंतरः कोऽपि हेतुः

## शाल्मली तरु : १ :

सेवाग्रामला येणारा प्रत्येक मनुष्य बहुधा विचारतो कीं बापूजींना खेड्यांतच जायचें होतें, तर त्यांनीं एखाद्या सुंदर खेड्यांत तरी जायचें होतें. त्याऐवजीं सेवाग्रामसारख्या कुग्रामांत ते येऊन कां राहिले, समजत नाहीं. त्यांचें हें विचारणें कांहीं चुकीचें नाहीं. सेवाग्राममध्यें नैसर्गिक सौंदर्य पाहूं जातां जवळ जवळ नाहींच. सर्व प्रदेश शुष्क आणि उजाड. कांटेरी झुडुपांव्यतिरिक्त झाडें म्हणून फारशीं येथें नाहींत. पावसाळ्यांत थोडेंबहुत हिरवें दिसेल, तेवढेंच. बाकी आठहि महिने रखरखीत ऊन आणि धुळीची जमीन. ह्या शुष्कतेला उद्देशून एकदां माझे एक मित्र मला म्हणाले, 'ह्या सेवाग्रामच्या उजाडपणाला उपमाच द्यायची झाली, तर केशविहीन मस्तकाचीच देतां येईल.' मी त्यांना म्हणालों, 'तुमची ही उपमा थोड्या प्रमाणांत ठीक आहे. परंतु बापूजींच्या टक्कल पडलेल्या मस्तकाप्रमाणें सेवाग्राममध्यें नेहमींच हिरवळ राहत नाहीं, किंवा राहणार नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. सडकेच्या बाजूला समोरच हें कांटेसांवरीचें झाड दिसत आहे ना? सेवाग्रामचें प्रतिनिधित्व तें बरोबर करतें. पंचतंत्रांतील शाल्मली तरूचीं मनोरम वर्णनें वाचून तुम्हांला त्या तरूविषयीं कुतूहल निर्माण झालें असेल. ज्या शाल्मली तरूच्या आश्रयावर पंचतंत्राची उभारणी झाली आहे. तो असतो तरी कसा, हें पाहण्याला तुम्ही उत्सुक झालां असाल. पंचतंत्राप्रमाणेंच सेवाग्राममधील आमचें हें प्रसिद्ध झाड आहे.'

'ह्यालाच शाल्मली म्हणतात काय? याच्यावर एकहि पान दिसत नाहीं. निव्वळ वाळलेल्या काड्या दिसतात.' असें तुम्ही यावर विचाराल.



होय. हाच तो शाल्मली तरु. ह्याला मराठींत सावरी किंवा कांटे-सावरी म्हणतात. आज हा तुम्हांला निष्पर्ण दिसतो आहे, परंतु पावसाळ्यांत हिरव्यागच्च पानांनीं तो बहरलेला दिसेल. ह्या वेळेस त्याला तुम्हीं पाहिलें, तर सेवाग्राममधील सुंदर झाड म्हणून त्याच्या-कडे तुम्हीं अंगुलिनिर्देश कराल. आणि वसंत ऋतूंत त्याचें अगदीं वेगळेंच स्वरूप तुम्हांला दिसेल. त्या वेळेस आतांप्रमाणेंच ह्यावर

पानें नसतील, परंतु गर्द लाल फुलांनीं हा नुसता बहरलेला दिसेल. हा वृक्ष अशा प्रकारें तीन ऋतूंत तीन अवस्था धारण करतो. उन्हाळ्यांत शुष्क, पावसाळ्यांत पर्णयुक्त आणि हिवाळ्यांत पुष्पमंडित.

## सेवेची आवश्यकता कोणाला ? : २ :

आज उन्हाळ्यांत कांटेसांवरीचें हें झाड जसें शुष्क दिसतें आहे, त्याप्रमाणेंच सेवाग्रामची आजची अवस्था आहे, आणि याकरितांच अनेक अप्रतिम सुंदर गांवें आपल्याकडे बोलावीत असतां बापूजी तिकडे न जातां ह्या उजाड, नीरस आणि चैतन्यहीन गांवांत येऊन बसले आहेत. खेड्यांत जाण्याचें त्यांनीं जें ठरविलें तें वनभोजनाकरतां, मौज करण्याकरतां किंवा हवा खाण्याकरितां नव्हे; दरिद्री नारायणाच्या सेवेचें व्रत उजविण्याकरितां ते खेडयांत येऊन बसले आहेत. जें सुंदर आहे, संपन्न आहे, बलवान आहे, त्याला दुसऱ्याच्या सेवेची आवश्यकता नाहीं. मोठ्यांची सेवा करण्याला सर्वच धडपडतात. त्यांना सेवेची आवश्यकता नाहीं. त्यांची सेवा करण्याला इतर लोक आहेतच. त्याकरतां बापूजींची जरूर नाहीं. परंतु निर्धनाची, निर्बलांची, रूपहीनांची सेवा करण्याला कितीसे पुढें येतात ?

सर्व दृष्टींनीं नागवलेल्या सेवाग्रामलाच बापूजींची खरी आवश्यकता होती. आज शुष्क आणि नीरस दिसत असलेलें हें सेवाग्राम या शाल्मली तरूप्रमाणें कांहीं दिवसांनीं बापूजींच्या चरणस्पर्शानें हिरवेंगार आणि रसपूर्ण दिसूं लागेल; किंवा आजच तें दिसूं लागलें आहे, असें म्हणतां येईल आणि तो दिवस कांहीं दूर नाहीं कीं जेव्हां वसंतऋतूंतील या शाल्मली वृक्षाप्रमाणें हें देखील फुलांनीं बहरलेलें दिसूं लागेल.

ता. ३० एप्रिल १९३६ रोजीं बापूजी सेवाग्रामला आले. त्यांना खेंचून आणणारी अशी कोणती शक्ति होती ? शक्तीपेक्षां सेवाग्रामची

अशक्तीच ह्या बाबतींत जास्त बलवान ठरली, असें म्हणायला पाहिजे. तुम्हीं विचाराल, सेवाग्रामसारखींच अत्यंत हीन दशेला पोंचलेलीं हिंदुस्थानांत असंख्य खेडीं आहेत. बापूजींच्या स्वतःच्या गुजरातेंत अशीं गांवें नाहींत कीं काय, ज्यांना बापूजींसारख्यांच्या सेवेची अत्यंत आवश्यकता आहे ? सेवाग्रामवर त्यांचें इतकें प्रेम कां ?

ह्याचें उत्तर भवभूतीच्या शब्दांत एवढेंच देतां येईल कीं—

**व्यतिषजति पदार्थान् आंतरः कोऽपि हेतुः**
**न खलु बहिरुपाधिन् प्रीतयः संश्रयन्ते ।**

## जमनालालजींचें चुंबकत्व : ३ :

हा आंतरिक हेतु कोणता ? सेवाग्राम हें जमनालालजींचें—शेठ जमनालाल बजाज यांचें—गांव आहे एवढें सांगितलें, म्हणजे ह्याचा उलगडा होण्यासारखा आहे. जमनालालजींच्या प्रेमामुळेंच बापूजी सेवाग्रामला आले. स्वतःच्या मुलांपेक्षांहि बापूजींचें जमनालालजींवर जास्त प्रेम होतें, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. जमनालालजी स्वतःला बापूजींचा लाडका पुत्र म्हणत. लोकसंग्राहक म्हणून बापूजींची ख्याति आहे. परंतु अशा लोकसंग्राहकाचा देखील संग्रह करणारे जमनालालजी केवढे मोठे संग्राहक होते, याची यावरून कल्पना येईल. बनिया काय आणि मारवाडी काय, संग्रह करण्यांत सारखेच वस्ताद; पण ह्या अलौकिक नव्हे तर ‘ लौकिक ’ संग्रहांत बनियावर मारवाड्यानें मात केली, एवढें बरीक खरें.

हिंदुस्थानच्या कोणत्याहि कोनाकोपऱ्यांत एखादा चांगला मनुष्य जमनालालजींना आढळला, कीं त्या मनुष्याला आपणाकडे ओढल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे. ते म्हणजे एक प्रचंड चुंबक होते. त्यांची आकर्षणशक्ति जबरदस्त होती. त्यामुळेंच बापूजींसारख्यांना

देखील ते आकर्षित करूं शकले. बापूजी कांहीं म्हटलें तरी संसारी मनुष्य आहेत. त्यांचा संसार स्वतःच्या स्त्री-पुत्रांपर्यंतच मर्यादित नाहीं. हें संपूर्ण विश्वच त्यांनीं आपल्या कुटुंबांत समाविष्ट केलेलें असलें, तरी अखेरीस ते आहेत संसारीच. त्यामुळेंच ते आपल्या पुत्र—मित्रांच्या आणि भक्त-अनुयायांच्या प्रेमपाशांत बद्ध होतात. त्यामुळें जमनालालजींच्या प्रेमपाशांत अडकून ते त्यांच्या गांवीं राहण्याला आले, यांत फारसें आश्चर्य नाहीं. परंतु विनोबासारखा अत्यंत निःस्पृह, कोणाची पर्वा न करणारा तेजस्वी ब्रह्मवेत्ता जेव्हां जमनालालजींकडे आकर्षित होऊन त्यांच्याजवळ येऊन राहतो, तेव्हां मात्र जमनालालजींच्या आकर्षणशक्तीची खरी कल्पना येते.

## मीराबेनचा भटकेपणा : ४ :

जमनालालजींप्रमाणेंच दुसरी एक विशेष व्यक्ति बापूजींना सेवाग्रामला आणण्यास कारणीभूत झालेली आहे. ती म्हणजे त्यांची पाश्चात्य शिष्या मीराबेन. महादेवभाईंनीं म्हटल्याप्रमाणें जिप्सींचा आनुवंशिक भटकेपणा मीराबेनमध्यें पूरेपूर उतरला आहे. बापूजी वर्ध्याला मगनवाडींत असतांना त्या मगनवाडीपासून चार सहा फर्लांगांवर असलेल्या शिंदी गांवीं सफाईकरितां जाऊं लागल्या. शिंदी शहराच्या फार जवळ आहे. येथें ग्रामसेवेचें काम फारसें होऊं शकणार नाहीं, असें वाटल्यावरून नंतर त्या सेवाग्रामजवळ येऊन राहिल्या आणि त्यामुळेंच बापूजींनीं देखील येथें येण्याचें ठरविलें. सेवाग्रामला आल्यानंतर देखील मीराबेननीं आपली जागा तीन चार वेळां बदलली आहे. सुरुवातीला त्या सेवाग्राम आणि वरुडा ह्या दोन गांवांच्यामध्यें असलेल्या टेकडीच्या पायथ्याशीं झोपडी बांधून राहिल्या. तेथें त्यांनीं एक लहानशी विहीर देखील खणून घेतली. मीराबेनची ती प्रसिद्ध झोंपडी आज नष्ट झाली आहे. तरी तेथील ती विहीर अजू-



नहि त्यांच्या वास्तव्याची साक्ष देत तेथें उभी आहे. सेवाग्रामची पक्की सडक तयार होण्यापूर्वी मीराबेनच्या झोंपडीवरून सेवाग्रामला येण्याचा रस्ता होता. त्यामुळें बापूजींच्या दर्शनाला आणि भेटीला येणाऱ्या लोकांचें त्यांची झोपडी म्हणजे विश्रान्तिस्थानच झालें होतें. तेथें पांच दहा मिनिटें विश्राम केल्याशिवाय आणि त्यांच्या त्या पहाडी विहिरीचें गार पाणी प्याल्याशिवाय कोणी तेथून उठत नसे. आणि मीराबेन देखील प्रत्येकाशीं दोन शब्द बोलल्याशिवाय राहत नसत.

## मडक्यांतील गार पाणी : ५ :

एकदा आम्हीं कांहीं तरुण मंडळी वर्ध्याहून सेवाग्रामला येत होतों. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें तहान खूप लागली होती व त्यामुळें नेहमींप्रमाणें मीराबेनच्या झोंपडीजवळ थांबलों. विहिरीचें पाणी गार होतेंच. परंतु आमच्यापैकीं एकजण म्हणाला, 'मीराबेनच्या मडक्यांतलें पाणी खूप गार असेल. त्या पाण्याशिवाय तहान जाणार नाहीं बुवा.' मीराबेनचा संन्यासिनीचा संसार होता. त्यांच्या झोंपडींत एकच पाण्याचें मडकें. इतक्या लोकांनीं पाणी प्याल्यानंतर त्यांत एक थेंब पाणी राहणें देखील शक्य नव्हतें. तेव्हां मी त्यांना म्हणालों,

'कशाला उगीच मीराबेनना त्रास देतां? आपण त्यांचें गार पाणी पिऊन टाकलें, तर त्यांना आज गार पाणी कांहीं मिळायचें नाहीं.' हें आमचें बोलणें मीराबेनला ऐकूं गेलें. आणि त्यांना ऐकूं जावें अशाच तऱ्हेनें मोठमोठयानें आमची मंडळी बोलत होती. आम्हीं झोंपडीच्या सावलींत बाहेर बसलों होतों. त्यांनीं आपला पाण्याचा माठ तेथें आणला व आम्हीं नाहीं नाहीं म्हणत असतांना देखील आपलें गार पाणी आम्हांला पाजलें.

त्यांच्या मडक्यांतलें थंड पाणी नेहमींच अशा तऱ्हेनें येणारे जाणारे पिऊन जात आणि त्याहि तितक्याच तत्परतेनें आपलें मडकें पुन्हां भरून ठेवीत. पुढें त्या खास सेवाग्राममध्यें झोंपडी बांधून कांहीं दिवस राहिल्या. आश्रमानें गांवांमध्यें जी मोठी विहीर बांधली आहे, त्याच्याजवळच चार पांच उंच ताडवृक्षांच्या हालत्या छायेंत त्यांची झोंपडी होती. तिचाहि मागमूस आज राहिलेला नाहीं. ती झोंपडीहि त्यांनीं सोडली व आश्रमांत बापूजींच्या झोंपडींत त्या राहूं लागल्या; परंतु तेथेंहि त्या फार दिवस टिकूं शकल्या नाहींत. सेवाग्रामला असतांना वेद व पुराणांच्या अभ्यासाकडे त्यांचें लक्ष लागलें. बापूजीं-जवळ अभ्यास करण्याकरतां आवश्यक शांतता आणि वेळ कोठून मिळणार? तेथें तर रोजच येणाराजाणाऱ्यांचीं वर्दळ. उठल्यापासून तों झोंपेपर्यंत कामाचा रगाडा. त्यावेळेस आश्रमांत एकच झोंपडी होती. तेथेंच महात्माजींचें व त्यांच्याबरोबर असणाऱ्या लोकांचें खाणें-पिणें, निजणें, उठणें व त्यांतच बापूजींच्या भेटीकरतां व दर्शनाकरतां येणाऱ्या लोकांचीं गर्दी. बापूजींची व या सर्व लोकांची व्यवस्था मीराबेननाच ठेवावी लागे. तेव्हां त्यांना शांतता ती कशी व कोठून मिळणार?

त्या वेळचा एक प्रसंग मला आठवतो. मी व कांहीं मंडळीं सेवा-ग्रामला आलों होतों. सेवाग्रामजवळ आम्हांला मीराबेन भेटल्या. हातांत

उंच बासाची काठी. गुडघ्यापर्यंत वर एखाद्या ग्रामीण युवतीप्रमाणें खादीचें जाड पातळ नेसलेलें, वपन केलेल्या डोक्यावरून पदर घेऊन कंबरेला खोंचलेला, अशा थाटांत त्या बापूजींच्या बकऱ्यांना हांकीत विहिरीवर पाणी पाजण्यासाठीं नेत होत्या. त्यावेळेस बकऱ्यांना चारा टाकणें, दूध काढणें वगैरे कामेंहि त्याच करीत असत.

## मीराबेनचें वेदाध्ययन : ६ :

वेद आणि पुराणांकडे लक्ष लागल्यानंतर त्यांनीं आश्रमापासून तीनचार फर्लांगांवर एक टुमदार सुंदर झोंपडी बांधलीं. मीराबेनची झोंपडी म्हणून ती आज प्रसिद्ध आहे. तेथें एक सुंदर विहीर व संत्र्याचा विस्तीर्ण बगीचाहि आतां लावण्यांत आला आहे, व त्यामुळें सेवाग्राममधील तें एक सुंदर स्थळ झालें आहे. आजकाल बापूजी देखील त्याच बाजूला फिरावयाला जातात व सेवाग्राममधील तरुण जोडपींहि संध्याकाळीं विश्रब्धालाप करीत फिरतांना किंवा बसलेलीं तेथें दिसतात.

मीराबेन या कुटींत बऱ्याच दिवस होत्या. तेथें मधल्या खोलींत वेद व पुराणांच्या जाड जाड संस्कृत पोथ्या चौरंगावर ठेवून धूप-दीपांनीं व पत्रपुष्पांनीं त्यांची त्या पूजा करीत. सकाळ संध्याकाळ त्या बाजूला गेलें म्हणजे उदबत्त्यांचा मधुर परिमल वातावरणांत दर-वळलेला असे. त्या तेथें ध्यानधारणाहि करीत. भावावेशांत असलेल्या एखाद्या भक्ताप्रमाणें त्यावेळेस त्यांचें जीवन होतें. वेदाच्या निवडक सूक्तांचा इंग्रजींत काव्यमय अनुवादहि त्यावेळेस त्यांनीं केला होता. आज मीराबेन सेवाग्रामांत नाहींत. आगाखान पॅलेसमधून सुटल्यानंतर त्या डेहराडूनकडे गेल्या आहेत व तेथेंच एका खेड्यांत त्या काम करीत आहेत. मीराबेननीं सेवाग्राम वसविलें, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.



# ३ पर्णकुटीचें अंतरंग

## हिंवाळ्यांत ऊबदार आणि उन्हाळ्यांत थंड : १ :

‘ हें तुमचें घर मोठें सुंदर आहे. ’—आमच्याकडे आलेले एक मित्र उद्‌गारले.

‘ कसें काय ? ’

‘ इतक्या उन्हाळ्यांत देखील तुमच्या भिंती तापलेल्या दिसत नाहींत. आमच्या घराच्या भिंतींना या वेळेस हात लावला, तर तापलेल्या लोखंडाप्रमाणें त्यांचा हाताला चटका बसल्याशिवाय राहात नाहीं. ’

मीं त्यांना सांगितलें, कीं बापूजींच्या झोंपडीपासून तों गाईच्या गोठ्यापर्यंत येथें बहुतेक सर्व अशाच तऱ्हेचीं घरें बांधलीं आहेत. स्थानिक ग्रामोद्योगी वस्तु वापरण्यासंबंधीं बापूजींचा कटाक्ष आहे. त्यांची झोपडी बांस, लांकूड आणि मातीपासून बनविली आहे. भिंती कमच्याच्या कुडाच्या असून त्यावर पांढऱ्या मातीचा गिलावा केलेला आहे. चुना, विटा आणि सिमेंटच्या भिंतींप्रमाणें ह्या जास्त तापत नाहींत किंवा हिंवाळ्यांत विशेष थंडहि पडत नाहींत. त्यामुळें आमचीं हीं घरें हिंवाळ्यांत ऊबदार आणि उन्हाळ्यांत थंड राहतात.

## पक्क्या घरांचा प्रताप : २ :

किशोरलालभाई नेहमीं आजारी असल्यानें त्यांच्या सोईकरितां आश्रमामध्यें त्यांना पक्कें घर बांधून देण्यांत आलें आहे. घराच्या जमिनीला व भिंतींना संपूर्ण सिमेंटचा गिलावा केलेला आहे. नोव्हेंबर

१९४४ मधील चरखा संघाची प्रसिद्ध बैठक किशोरलालभाईंच्या याच घरांत झाली. नोव्हेंबरमध्यें सेवाग्राममध्यें थंडी असली, तरी ती साधारणच असते. परंतु त्या वेळेस दुपारीं तीन वाजतां देखील तें घर इतकें थंड असे, कीं जमिनीवर सतरंज्या व जाजमांची जाड बैठक टाकलेली असून देखील सभेकरितां तेथें बसणें कठीण जात असे. भिंतीला टेकण्याची तर सोयच नव्हती. अंग खालून अगदीं गारठून जाई व पायांना मुंग्या आणि कळा देखील लागत. चरखा संघाचे एक ट्रस्टी मुंबईचे श्री. जेराजाणी यांना तो गारठा सहन न झाल्यामुळें सभेंत मध्येंच ते उठले व शिंदीची एक चटई आणून त्यावर ते बसले.

त्यावर आश्रमांतील एक गृहस्थ त्यांना हंसत हंसत म्हणाले, 'पक्क्या घरांचा प्रताप बघितला ना? बापूजींच्या झोपडींत खालीं जमिनीवर कसें आरामशीर बसतां येतें. पण या सिमेंटच्या पक्क्या जमिनीवर जाड संतरंज्या टाकून बसल्यावर देखील अंग गारठल्यामुळें स्वस्थ बसतां येत नाहीं आणि पाय गारठूं नयेत म्हणून अखेरीस आमच्या त्या शेगांवी शिंदीच्या चटयांचाच आश्रय घ्यावा लागतो, मुंबईच्या वस्तूंनाहि सेवाग्रामच्या ग्रामीण वस्तूंनीं एकूण हरवलें तर!' अर्थात् ह्यामुळें चांगलाच विनोद निर्माण झाला. त्या गृहस्थांचें म्हणणें किती बरोबर होतें, याचा अनुभव तेथें बसलेल्या प्रत्येकाला येतच होता.

## खोलींतील वस्तु : ३ :

'परंतु स्वच्छतेच्या आणि टिकण्याच्या दृष्टीनें हीं कच्चीं घरें गैरसोईचीं नाहींत काय?' ते मित्र म्हणाले.

'ह्यांना स्वच्छ ठेवण्याकरितां थोडी जास्त मेहनत व काळजी घ्यावी लागते, हें खरें; परंतु पांढऱ्या मातीनें सारवलेल्या बापूजींच्या झोंपडीच्या भिंती व खालील जमीन तुम्ही पाहिलीत तर ती किती सुंदर व

स्वच्छ दिसते, हें तुम्हांला कळून येईल. तितकी स्वच्छता पक्क्या इमारतींत देखील तुम्हांला आढळून येणार नाहीं.' त्यांना मी बापूजींच्या झोंपडींत घेऊन गेलों. झोंपडींतील तो साधेपणा आणि ती टापटीप पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. हिंदुस्थानच्या सम्राटापेक्षांहि श्रेष्ठतम माणसाची ती झोपडी ! शिंदीच्या पानांच्या चटया व बासांच्या एक दोन घडवंच्या यांपेक्षां दुसरें तिथें काय होतें ? बापूजींनीं आपल्या एकादशव्रतांत असंग्रहाला पांचवें स्थान दिलें आहे. परंतु भीमपलासमध्यें सर्व स्वर ज्याप्रमाणें पंचमावर येऊन थांबतात, त्याप्रमाणें बापूजींचीं सर्व व्रतें व सर्व क्रिया असंग्रहावर येऊन थांबतात असें म्हणायला हरकत नाहीं. उगीच भाराभर वस्तु ते आपल्याजवळ ठेवीत नाहींत. तुम्हांला वाटेल, जगांतील यच्चयावत् विषयावर आपल्या विचारांची छाप पाडणारा हा तत्त्वदर्शी महात्मा ! रोजच यांना अनेक गोष्टींसंबंधीं संदर्भ पहावे लागत असतील आणि त्याकरितां त्यांना आपल्याजवळ संदर्भग्रंथांचें अद्ययावत् विशाल पुस्तकालय ठेवावें लागत असेल व अमुक एका गोष्टीची माहिती लागल्यास त्या त्या विषयाचे तज्ज्ञ त्यांना ती माहिती ताबडतोब काढून देत असतील. परंतु महात्माजींच्या खोलींत गेल्यास तेथें तुम्हांला फारसे ग्रंथ दिसणार नाहींत. तुम्हीं म्हणाल आपल्या खोलींत ते आपले ग्रंथ ठेवीत नसतील; परंतु जवळच त्यांचें मोठें ग्रंथालय असेल. एका गृहस्थांनीं मला अशाचसारखा प्रश्न केला.

## गुप्तपणाचा अभाव : ४ :

'पुस्तकालयाशिवाय महात्माजींचें चालणें शक्यच नाहीं. येथेंच त्यांचें पुस्तकालय असलें पाहिजे. महात्माजींचें पुस्तकालय दाखविण्याची इच्छा नसेल म्हणून किंवा महात्माजी कोणतीं पुस्तकें वाचतात हें लोकांना कळूं नये म्हणून तुम्हीं तें दाखवीत नसाल.'

मीं त्या गृहस्थांना म्हटलें, 'बापूजींजवळ गुप्तपणा असा कांहींच नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या कांहीं गोष्टी खाजगी म्हणून असतात. परंतु बापूजींच्या बाबतींत खाजगी म्हणून कांहीं राहिलें नाहीं. त्यांचें संपूर्ण जीवन सार्वजनिक आहे, उघड आहे. त्यांत खाजगीपणा नाहीं किंवा गुप्तपणा नाहीं. त्यांचें भोजन काय आहे, ते स्नान कोणत्या पाण्यानें करतात, इतकेंच कशाला, त्यांच्या शौचाची व्यवस्था कशी काय आहे, या गोष्टी देखील सार्वजनिक झाल्या आहेत. तेव्हां पुस्तकालयासंबंधीं गुप्तपणा राखण्याचें कांहीं तरी कारण आहे काय ?'

असत्याला अंधाराची, गुप्ततेची आवश्यकता आहे. सत्य हें सूर्याप्रमाणें प्रकाशमान आहे, तेथें गुप्तता संभवत नाहीं, असें बापूजींचें म्हणणें आहे. आणि तें खरेंच आहे. याकरतांच गुप्तपणें वावरणाऱ्या अनेक लोकांना त्यांनीं प्रकट होऊन पोलिसच्या स्वाधीन होण्याला सांगितलें. ऑागस्ट १९४४ मध्यें सेवाग्रामला आल्यानंतर असे तीन-चार लोक बापूजींजवळ आले व बापूजींनीं स्वतः त्यांना पोलिसांच्या स्वाधीन केलें. आष्टीच्या खटल्यांतील एक मनुष्य, ज्यांना पुढें जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली, ते बापूजींच्या आज्ञेप्रमाणें सेवाग्रामला येऊन पोलिसांच्या स्वाधीन झाले. गुप्तपणांत असत्य आहे आणि असत्यानें स्वराज्य जरी मिळत असलें तरी देखील तें मला नको, ही बापूजींची तत्त्वनिष्ठा आहे. सत्य हाच त्यांचा परमेश्वर आहे. त्यामुळें गुप्तपणाचा त्यांच्याजवळ लवलेशहि आढळणार नाहीं.

प्रसिद्ध अमेरिकन पत्रकार लुई फिशर यानें गांधीजींसंबंधीं जें पुस्तक लिहिलें आहे, त्यांत त्यानें गांधीजींमधील गुप्ततेच्या अभावाचा विशेष उल्लेख केलेला आहे. बापूजी बोलतांना आपलें अंतःकरण उघडें करतात. जें आंत आहे तेंच त्यांच्या शब्दांवाटे बाहेर प्रकट होतें. मनांतील विचार लपवून ठेवण्याची किंवा त्यांना उजाळा देऊन प्रकट करण्याची राजनीति त्यांच्याजवळ नाहीं आणि ह्यामुळेंच त्यांचा

प्रत्येक शब्द मनुष्याच्या मनाचा ठाव घेतो. त्यांच्या आत्मकथेंतील पहिलीं प्रकरणें व श्रीमती प्रेमा कंटक यांच्या 'प्रसाददीक्षा' ह्या पुस्तकांतील त्यांचीं पत्रें ह्यांत लौकिक दृष्टीनें न सांगण्यासारख्या गोष्टी देखील त्यांनीं कांहींएक आडपडदा न ठेवतां उघड करून सांगितल्या आहेत, तें यामुळेंच. ह्या बाबतींत त्यांच्यावर अनेक लोकांनीं प्रखर टीका केलेली आहे; परंतु बापूजींनीं आपलें उघडपणाचें व्रत सोडलेलें नाहीं. स्वप्नांतदेखील सत्यापासून जे चळूं इच्छित नाहींत, ते उघडपणें सत्याला मुरड घालतील, हें संभवेल तरी कसें ?

## वर्तमानपत्री नव्हे : ५ :

बापूजींच्या पुस्तकालयासंबंधीं मी सांगत होतों. ते आपल्याजवळ पुस्तकांचा संग्रह करीत नाहींत. त्यांच्याकडे रोजच अनेक पुस्तकें भेट म्हणून येतात. तीं सर्व पुस्तकें ते सेवाग्रामच्या पुस्तकालयास देऊन टाकतात. अनेक वर्षें मीं पुस्तकालयाचें काम केलें आहे. एका महिन्यांत शंभर शंभर पुस्तकें बापूजींकडे आलेलीं मीं नोंदलेलीं आहेत. अहवाल, मासिकें, लहान लहान पुस्तिका, आणि वर्तमानपत्रें किती येतात, याची गणतिच नाहीं. परंतु बापूजींजवळ त्यांपैकीं एकही वस्तु पडलेली तुम्हांला दिसणार नाहीं. त्यांची असंग्रहाची वृत्तिच ह्याच्या मुळाशी आहे, हें उघड आहे.

'हिंदुस्थानांत काय आणि जगांत काय, कोठें काय चाललें आहे, याची सूक्ष्म माहिती बापूजींना असल्याशिवाय ते हें सर्वांगीण कार्य कसें करूं शकतात ?' असा प्रश्न साहजिकच तुमच्यापुढें उभा राहील.

त्यांच्याकडे रोज येणाऱ्या ह्या छापील कागदांतून महत्त्वाचीं कात्रणें बापूजींना वाचून दाखविण्यांत येतात, हें खरें; तरी पण त्यांचें ज्ञान, पुस्तकें किंवा वर्तमानपत्रें यांवर अवलंबून नाहीं. अनेक विश्वासू

लोकांकडून त्यांच्याकडे येणारीं पत्रें व त्यांच्या भेटीला येणाऱ्या व्यक्तीं-कडूनच खरी व विश्वसनीय माहिती त्यांना मिळत असते आणि त्यामुळेंच त्यांचें प्रत्येक गोष्टीचें ज्ञान इतकें वास्तव व परिपूर्ण असतें कीं त्यावर ते आपल्या चळवळी व आपले विचार निश्चितपणें उभारूं शकतात. वर्तमानपत्री परोक्ष ज्ञानावर ते अवलंबून नाहींत. प्रत्येक गोष्टीचें प्रत्यक्ष ज्ञान ते करून घेतात आणि ह्यामुळेंच ते आपल्या निर्णयांत सहसा प्रमाद होऊं देत नाहींत.

## आश्रमाचें पुस्तकालय : ६ :

सेवाग्रामचें पुस्तकालय मोठें आहे. तें पाहिल्यानंतर एक गृहस्थ मला म्हणाले, 'ह्यासारखें पुस्तकालय मोठमोठ्या शहरीं देखील क्वचितच आढळतें. पुष्कळ पैसा आश्रमानें यावर खर्च केला असेल, नाहीं ?'

' एक पैसाहि आश्रमानें यावर खर्च केलेला नाहीं. बापूजींना भेट म्हणून आलेलीं हीं पुस्तकें आहेत. यांची व्यवस्था ठेवण्याचीच आश्रमाला मारामार पडली आहे. '

' मग हें बापूजींचेंच पुस्तकालय आहे ना ? तुम्हीं तर म्हणालांत कीं बापूजींचें स्वतःचें असें पुस्तकालय नाहीं.'

मीं त्यांना सांगितलें, कीं संदर्भ म्हणून बापूजी ज्याचा उपयोग करतात, असें पुस्तकालय बापूजींजवळ नाहीं. हीं त्यांना भेट आलेलीं नाना प्रकारचीं पुस्तकें आहेत. आणि तीं देखील त्यांनीं आपल्या-जवळ ठेवलेलीं नाहींत. पूर्वीं हीं सारीं पुस्तकें आश्रमांतच होतीं. एक दिवस तालिमी संघाचे सेक्रेटरी श्री. आर्यनायकम् हे बापूजींजवळ गेले व आश्रमाचें पुस्तकालय आम्हांला द्या, म्हणून बापूजींना म्हणाले. बापूजींनींहि ' ठीक आहे ' म्हणून हीं सातआठ हजार पुस्तकें तालिमी संघाला देऊन टाकलीं. बापूजींच्या असंग्रहाची किंवा



अनासक्तीची ह्यावरून कल्पना येऊं शकेल. अमुक एक वस्तु अमक्याच्या उपयोगाची आहे असें दिसल्यास ते ती त्याला निःसंकोच देऊन टाकतात.

## ॐ आणि हे राम :७:

त्यांच्या झोपडींत तुम्हाला विशेष कांहीं दिसणार नाहीं. परंतु थोडें बारकाईनें पाहिल्यास एक दोन गोष्टी तुमची दृष्टि आकर्षित करतील. बापूजी बसतात त्याच्या समोरच भिंतीवर मातीनें ॐ काढलेला आढळेल. तसेंच उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत एका फळीवर ' हे राम ' हीं अक्षरें दिसतील. ईश्वराचीं असंख्य नांवें आहेत, परंतु भक्तांना अमुक एका नांवाची विशेष आवड असते. बापूजींना ईश्वराचीं हीं दोन नांवें विशेष आवडतात, त्यांचा ते जप करीत असतात. जपाकरतां एक स्मरणीहि ते आपल्याजवळ ठेवतात. ॐ आणि ' हे राम ' ह्या नांवांबरोबर महादेवभाई व कस्तुरबांचीं नांवें आतां निगडित झालीं आहेत. आगाखान पॅलेसमध्यें महादेवभाई व कस्तुरबा यांच्या समाधीवर बापूजींनीं 'ॐ' आणि 'हे राम' हीं अक्षरें लिहिलीं आहेत. बापूजींच्या त्या लहानशा कुटींत हीं अक्षरें पाहिलीं म्हणजे कुटीच्या त्या पवित्र व शांत वातावरणांत मनुष्य क्षणभर तरी भावमग्न

झाल्याशिवाय रहात नाहीं व त्याच्याभोंवतीं एकत्रित झालेल्या अनेक महान् आत्म्यांच्या स्मृतींत त्याचें मस्तक आपोआपच तेथें नम्र होतें !

## ख्रिस्ताचें चित्र : ८ :

बापूजी बसतात त्याच्या डाव्या बाजूला भिंतीवर आणखी एक तसबीर तुम्हाला दिसेल. तसबीर मोठी नाहीं. कार्डाच्या आकाराची आहे. येशू ख्रिस्ताचें तें एक सुंदर चित्र आहे. बापूजींच्या जीवनाला वळण देण्याला येशू ख्रिस्त व बायबल हीं पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेलीं आहेत ! दुःखी, कष्टी आणि दलितांची सेवा करण्याची भावना हा बापूजींच्या जीवनाचा मुख्य स्थायीभाव आहे. त्या भावनेंतूनच सामाजिक, राजकीय इत्यादि त्यांच्या इतर प्रेरणा उद्भूत झालेल्या आहेत, असें म्हणतां येईल. त्यांच्या कुटींतील येशू ख्रिस्ताचें तें एकमेव चित्र त्यांच्या जीवनाच्या ध्रुवताऱ्याप्रमाणें त्यांचें मार्गदर्शन करीत आहे, असें वाटतें. अनेक ख्रिस्तानुयायी बापूजींना ख्रिस्ताचा अवतार मानतात, तें अगदीं बरोबर नाहीं काय ?

## साधेपणांतील सौंदर्य : ९ :

बापूजींच्या त्या साध्या झोपडींत जी कला व सौंदर्य आहे, तें मोठमोठ्या कलावंतांनीं आपल्या कलावृत्तींनीं शृंगारलेल्या कलागृहांत देखील आढळणार नाहीं. साधेपणा, अवडंबराचा अभाव, टापटीप, स्वच्छता इत्यादि गुणांतच खरी कला व सौंदर्य सांठविलेलें आहे, त्याची अनुभूति फारच थोड्यांना असते आणि म्हणूनच बाह्य भडकपणांतच सौंदर्य पाहण्याची लोकांच्या डोळ्यांना संवय झालेली असते; परंतु बापूजी साधेपणांतील सौंदर्य पाहण्याची दृष्टि लोकांना देऊं इच्छितात. त्यांची झोपडी, त्यांचा पोषाख, त्यांची एकूण सर्व राहणी ही अशीच सुंदर आहे. त्यांतील सौंदर्य पाहतां मात्र आलें पाहिजे.



# ४ जीवनाचीं प्रतीकें

## शिंदीची पानें  : १ :

बापूजींच्या झोपडीच्या दक्षिणेस कस्तुरबांची कुटी आहे व कस्तुरबांच्या कुटीच्या पूर्वेस आश्रमाचा दवाखाना आहे. आश्रमामधील इतर घरांपेक्षां कस्तुरबांच्या व दवाखान्याच्या या कुटींना अधिक टुमदार वा सुंदर म्हणतां येईल. बापूजींच्या कुटीला पायथा जवळ जवळ नाहींच. सुरुवातीला बापूजींच्या झोपडींत एकच खोलीं होती व त्या खोलींतच कुडाचे पडदे घालून आणखी तीन अत्यंत लहान खोल्या केल्या होत्या. त्या आजहि आहेत. त्यांतील एका खोलींत बापूजींच्या शौचाची व्यवस्था, दुसरींत त्यांचे कपडे वगैरे ठेवलेले असतात व तिसरींत त्यांच्या सेक्रेटरींचे कागदपत्र असतात.

१९४१ ची बहुतेक गोष्ट असावी. बापूजींच्या खोलींत वाळवीनें खूपच उपद्रव सुरू केला. वाळवीचा उपद्रव नाहींसा करण्याकरतां अखेरीस ती खोली संपूर्ण खगून काढण्यांत आली. बापूजींच्या खोलीच्या खालींच वाळवीचें स्थान होतें. वाळवीची राणी पकडून काढल्यानंतर तो उपद्रव नाहींसा झाला. त्यानंतर अद्यापपर्यंत सेवाग्रामला वाळवीचा त्रास झाला नाहीं. बापूजींच्या झोंपडीच्या ह्या खणाखणीनंतर तिच्यांत दक्षिणेकडून आणखी एक खोली वाढविण्यांत आली व उत्तरेकडे एक लहानसा व्हरांडा जोडण्यांत आला.

महात्मजींच्या झोपडीच्या मातीचा गिलावा केलेल्या त्या कुडाच्या भिंती पाहून एक गृहस्थ मला म्हणाले, 'कां हो, पावसाळ्यांत हा मातीचा गिलावा टिकाव धरूं शकतो काय? येथील जून–जुलैच्या पावसाच्या माऱ्यानें हा ढांसळून पडत असेल, आणि ढांसळून न पडला तरी भिंतींना ओल तर येतच असेल.'

मी त्या गृहस्थांना झोपडींच्या बाहेर नेलें व भिंतींना बाहेरून लावलेल्या शिंदीच्या पानांच्या चटया दाखविल्या. 'केवढाही सोसाट्याचा पाऊस असला तरी त्यापासून ह्या शिंदीच्या चटया भिंतींचा बचाव करतात. ह्या भिंतींना पाणी लागूं देत नाहींत. डालमियाच्या सिमेंटपेक्षां देखील आमचीं हीं सेवाग्रामचीं शिंदीचीं पानें भिंतींना सुरक्षित ठेवण्याचें काम जास्त चांगलें करतात, हें तुम्हांला दिसून येईल.' मीं त्या गृहस्थांना म्हटलें.

नंतर मीं त्यांना खादीविद्यालयाची नवीनच बांधलेली प्रचंड इमारत दाखविली. चुना, दगड, विटा व सिमेंटची ती पक्की इमारत, परंतु येथील पावसाच्या मारानें तिच्या दीड फूट रुंद भिंतीना देखील कशी ओल येते, हें मीं जेव्हां त्या गृहस्थांना दाखविलें, तेव्हां माझ्या म्हणण्याची सत्यता त्यांना पटली. बापूजींना शिंदीचें झाड फार प्रिय आहे. त्यांच्या खोलींत बसण्याकरतां शिंदीच्या चटया, भिंतींना

शिंदीच्या ताट्या, कागदाचे तुकडे टाकण्याकरतां शिंदीच्या टोपल्या, वारा घेण्याकरतां शिंदीचा पंखा, अशा अनेक शिंदीच्या वस्तु त्यांच्या-जवळ तुम्हांला दिसतील.

## नीरेचें माधुर्य : २ :

शिंदीची नीरा तर त्यांचें आवडतें पेयच आहे. हिंवाळ्यांत जेव्हां नीरा काढणें सेवाग्रामला सुरू होतें, तेव्हां यांच्याकडे येणाऱ्या मोठ-मोठ्या व्यक्तींना देखील ते नीरेचा एक प्याला तरी घेऊन पाहण्याचा आग्रह करतात. मागें सेवाग्रामला जें नीरा प्रकरण झालें, त्यामुळें नीरेसंबंधीं महाराष्ट्रांत पुष्कळच गैरसमज पसरला आहे. नीरा प्याल्या-मुळें त्यावेळेस जे एक दोघांचे मृत्यु झाले, त्याला कारण नीरा नसून नीरेमध्यें कांहीं तरी विषारी पदार्थ पडल्यामुळें ती घटना घडलेली होती, हें त्या वेळेस झालेल्या खुलाशावरून कळून येईल.

शिंदीच्या झाडापासून निघालेला ताजा रस, हीच नीरा—उसाच्या रसाप्रमाणेंच अत्यंत मधुर असते. उसाच्या रसापेक्षांहि तो जास्त पौष्टिक व थंड असल्यामुळें त्याचें सेवन करणें आरोग्यप्रद आहे. जास्त वेळ ठेवल्यानें तो आंबून त्याची दारू बनते. परंतु स्वच्छ चुना लावलेल्या मडक्यांत तो १०—१२ तास देखील शुद्ध राहूं शकतो. दारूचें व्यसन सोडवावयाचें असल्यास लोकांत नीरा पिण्याचा प्रघात पाडणें आवश्यक आहे. शिंदीच्या रसापासून गूळहि उत्तम होतो.

## चरख्याची प्रतिमा : ३ :

बापूजी मिळेल तेव्हां नीरा तर घेतातच, परंतु त्यांच्या खाण्यांत शिंदीचा गूळहि तुम्हांला नेहमींच आढळेल. शिंदीच्या झाडावर असें

त्यांचें अकृत्रिम प्रेम आहे आणि म्हणूनच कीं काय त्यांच्या झोपडींच्या भिंतीवर शिंदीच्या झाडाचीं उठावदार सुंदर चित्रें मीराबेननीं काढलीं आहेत. मीराबेन उत्तम चित्रकार आहेत. बापूजींच्या अगदीं पहिल्या झोपडींत व आतांच्या झोपडींच्या भिंतीवर त्यांनीं काढलेलीं उठावदार चित्रें तुमची दृष्टि आकर्षित करतील. बापूजींच्या झोपडींच्या दक्षिणेकडील भिंतीवर चरख्याचें सुंदर उठावदार चित्र तुम्हांला दिसेल. बापूंचें जीवन म्हणजे अहिंसेची मूर्तिमंत प्रतिमा आणि या अहिंसेचें प्रतीक चरखा! त्यामुळें बापूजींच्या जीवनाचें प्रतीक स्वरूप असलेलें तें चरख्याचें चित्र त्यांच्या झोपडीच्या दर्शनी भागावर दाखविण्यांत औचित्य नाहीं काय? चरखा हा गुण (सूत) निर्माण करणारा आहे, आणि म्हणूनच हिंदुस्थानांतल प्रत्येक घरीं तो जर चालूं लागला, तर हिंदुस्थान गुणवान् झाल्याशिवाय राहणार नाहीं, असें बापूजी म्हणतात. चरख्याच्या द्वारें बापूजी स्वावलंबनाचा, स्वाश्रयाचा, सेवेचा, देशभक्तीचा, सत्याचा आणि अहिंसेचा, आपल्या संपूर्ण विचारांचा आणि आचारांचा मनुष्याच्या जीवनांत प्रवेश करवूं इच्छितात. चरखा म्हणजे जीवनाला वर उचलणारी त्यांची चेतनाशक्ति आहे. समुद्राच्या तळाशीं चिखलांत रुतलेल्या पृथ्वीला आदिवराहानें ज्याप्रमाणें आपल्या वज्रमय दंताग्रांनीं वर उचललें, त्याप्रमाणें पारतंत्र्याच्या पंकांतून भारताचा उद्धार करण्याकरतां बापूजींनीं चरख्याला गतिमान केलें आहे. बापूजींचें तें सुदर्शन चक्र आहे. भारतानें आपल्या राष्ट्रीय ध्वजावर त्याची स्थापना केली आहे.

चरख्याच्या द्वारें बापूजी अहिंसक समाजरचनेची इमारत उभारूं पाहतात. आजची समाजरचना हिंसक आहे. गरिबांच्या शोषणावर तिची उभारणी झालेली आहे. धनी निर्धनांचें, बलवान निर्बलांचें, शिक्षित अशिक्षितांचें शोषण करीत आहे. अहिंसक समाजरचनेंत शोषणाच्या जागीं सेवेची स्थापना करूं इच्छितात. अहिंसक समाजांत

उच्च-नीच भाव राहणार नाहीं. सर्वांचा दर्जा समान राहील, कोणी अशिक्षित राहणार नाहीं किंवा कोणी दरिद्री वा गुलाम राहणार नाहीं. तुम्ही विचाराल, हें चरख्यानें कसें शक्य आहे? शिक्षण, पैसा वगैरे समाजाच्या शक्तीचें केंद्रीकरण झाल्यामुळेंच समाजाची रचना हिंसक बनलेली आहे. चरख्यामुळें म्हणजेच हस्तोद्योगामुळें, ह्या सर्व शक्तीचें विकेंद्रीकरण होईल, असें बापूजींचें म्हणणें आहे; त्यामुळें पैसा व सत्ता सर्वत्र विभागलीं जातील व अशा प्रकारें समाजाचा प्रत्येक घटक स्वावलंबी, स्वतंत्र व समान दर्जाचा बनेल व मग समाजांत शोषण न राहतां सहकार्य निर्माण होऊन त्याच्या पायावर संपूर्ण समाजाची रचना करतां येईल. चरख्यावर समाजाची रचना करण्याचा अर्थ हा आहे कीं, आजच्या केंद्रित सत्ता, केंद्रित उद्योग वगैरेंच्या जागीं विकेंद्रित समाजांची रचना आम्हांला करावी लागेल, आणि त्यांतूनच शरीरश्रम आणि हस्तोद्योगाची म्हणजेच चरख्याच्या संस्कृतीची समाजरचना उद्‌भूत होईल.

बापूजींच्या जीवनाला गति देणारा हा चरखा असल्यामुळें रोज चरखा कांतण्याचें त्यांनीं व्रत घेतलें आहे. कितीही काम असो, चरखा कांतण्याचें ते कधींही विसणार नाहींत. आश्रमाच्या दैनंदिन जीवनाचें तें अनिवार्य अंग आहे. आश्रमांतील सर्व व्यक्ति रोज अर्धा तास एकत्र येऊन चरखा कांततात. बापूजींनीं ह्या सूतकताईला सूत्रयज्ञ नांव दिलें आहे. यांत यज्ञाची लोकसेवेकरितां बलिदानाची भावना आहे. बापूजी प्रवासांत असले, तरी आपल्या कांतण्याचा नियम पूर्ण केल्याशिवाय राहत नाहींत. आजारांतही त्यांनीं चरखा सोडलेला नाहीं. १९२४ मध्यें हिंदु-मुस्लिम दंगाच्या संबंधानें दिल्लीला केलेल्या २१ दिवसांच्या उपवासांत २१ व्या दिवशीं देखील त्यांनीं चरखा चालविलेला आहे; चरख्यावर त्यांची अढळ निष्ठा आहे.

## घड्याळाचे कांटे : ४ :

त्यांचें रोजचें जीवन नियम आणि व्रतांनीं बांधलेलें आहे. एखाद्या घड्याळाप्रमाणें त्यांचीं कामें चोवीस तास बरोबर चाललेलीं असतात. काळ्या दोऱ्याला बांधलेलें त्यांचें घड्याळ खिसा नसल्यामुळें नेहमीं त्यांच्या कंबरेला खोंवलेलें असतें. त्यांचें सर्व कार्यक्रम इतके नियमित असतात, कीं आश्रमाचे लोक त्यावरून आपलीं घड्याळें लावून घेतात. एकदा संध्याकाळच्या प्रार्थनेची घंटा होऊन बराच वेळ झाला. सर्व लोक प्रार्थनेला येऊन बसले व प्रार्थना करणारे गृहस्थ देखील सुरुवतीची जपानी प्रार्थना म्हणण्याकरितां जपानी डफ हातांत घेऊन सज्ज झाले. पण बापूजी अजूनहि आपल्या कुटींतून बाहेर निघाले नव्हते. प्रार्थना करणारे गृहस्थ अखेरीस बापूजींना बोलावण्याकरतां उठले. पण तितक्यांत बापूजी आलेच.

' बापूजी, आज आपको देर हुई है ' ते प्रार्थना करणारे गृहस्थ म्हणाले.

बापूजींनीं लगेच घड्याळ बाहेर काढलें व त्याच्यापुढें करून ते म्हणाले, ' देखो—देखो, अभी एक मिनिट है । '

कोठेंहि सभेमध्यें त्यांचें भाषण असेल, तर ते अगदीं ठरलेल्या वेळेला येतील व भाषणाकरतां जितका वेळ दिला असेल, बरोबर तितकाच वेळ ते बोलतील. भाषणाच्या ओघांत वाहवत जाऊन ठरल्यापेक्षां जास्त वेळ ते बोलले आहेत, असें अजून मीं पाहिलें नाहीं. वक्तशीरपणा व नियमपालन ह्यांमुळेंच ते इतकीं कामें करूं शकतात, यांत शंका नाहीं.

## व्रतनियमांचें रहस्य : ५ :

मनुष्याचें जीवन व्रतनियमांनीं बद्ध नसेल, तर तें सुकाणूं नसलेल्या होडीप्रमाणें सैरावैरा धांवून एखाद्या खडकावर फुटल्याशिवाय राहाणार नाहीं, असें तें म्हणतात. पहांटेची आणि संध्याकाळची प्रार्थना, चरख्यावर सूत कांतणें, मीठ न खाणें, बकरीचें सोडून इतर कोणतेंहि दूध किंवा दुधाचे पदार्थ न घेणें वगैरे लहान लहान व्रतें त्यांनीं घेतलीं आहेत. प्रार्थना, चरखा व गाईचें दूध हीं तीन व्रतें तें प्रत्येकाला घ्यावयास सांगतात.

आजच्या श्रद्धाहीन आणि स्वैर शिक्षणामुळें लोकांत व्रतनियमांचें महत्त्व उरलेलें नाहीं आणि त्यामुळेंच कोणतीहि गोष्ट नियमपूर्वक करण्याची चिकाटी लोकांत राहिलेली नाहीं. जीवनांत दृढनिश्चय, चिकाटी, घेतलेलें काम पार पाडण्याचा निर्धार, इत्यादि गुण येण्याकरतां व्रतनियमांची आवश्यकता आहे. बरेच लोक म्हणतील कीं पहांटे पांचला उठणें, ईश्वरप्रार्थना करणें, सूत कांतणें, सूर्याला नमस्कार घालणें, यांत विशेष काय आहे? यांत विशेष नसलें, तरी तीं नियमित केल्यापासून जे शारीरिक व आध्यात्मिक फायदे होतात, ते विशेष महत्त्वाचे आहेत. त्यांत जीवनाला नियमित व मजबूत बनविण्याचें सामर्थ्य आहे, हें नाकबूल करतां येणार नाहीं. अत्यंत क्षुल्लक काम कां असेना, तें नियमित आणि व्यवस्थित झालें पाहिजे, हें बापूंच्या जीवनाचें रहस्य आहे, असें म्हणतां येईल.

समग्र ग्रामसेवा शिबिरांत शिक्षणाकरतां आलेले विद्यार्थि प्रार्थनेकरतां शिबिरांतून आश्रमांत दोन दोनच्या ओळीनें येत. त्यांना एकदां बापूजी म्हणाले, 'तुम्हीं ओळीमध्यें येतां, हें उत्तम; परंतु मार्चिंग करतांना सैनिकांचे पाय ज्याप्रमाणें बरोबर पडतात, त्या-

प्रमाणें तुमचे पाय देखील बरोबर पडले पाहिजेत. एकाचा उजवा तर एकाचा डावा असें व्हायला नको! बसतांना देखील प्रत्येकानें ताठ बसलें पाहिजे.' असा त्यांचा दंडक आहे. कंबर वांकवून बसणें त्यांना आवडत नाहीं. ते स्वत: देखील नेहमीं ताठ बसलेले तुम्हांला आढळतील. आश्रमांतील मुलांपैकीं कोणी कंबर वांकवून बसले, कीं ते इषारा करून त्याला ताठ बसायला सांगतील.

## सेफ्टी पिन्स : ६ :

बापूजींचे कपडे अगदीं मोजके आहेत. ठरलेल्या पद्धतीनें व्यवस्थित घडी करून नेमक्या जागीं ते ठेवले पाहिजेत. भलत्या तऱ्हेनें घडी केली किंवा कपडे दुसरीकडे कोठें ठेवले, तर त्यांना सहन होत नाहीं. ते धोतरवजा जो पंचा नेसतात, तो लहान असल्यामुळें धोतरासारखा आंवळून व खोंचून बांधतां येत नाहीं. त्याकरतां ते सेफ्टी पिन्सचा उपयोग करतात. पंचा घडी करून ठेवतांना त्याच्या कोपऱ्याला सेफ्टी पिन् लावून ठेवलेली असते. एकदां त्यांच्या सेवेंत असलेले एक आश्रमवासी पंचाला पिन लावण्याचें विसरले. बापूजींनीं त्या दिवशीं त्यांची त्याबद्दल चांगलीच कानउघाडणी केली. अशा लहान-सहान गोष्टी देखील अत्यंत काळजीपूर्वक व्यवस्थित आणि नियमित झाल्या पाहिजेत, याकडे त्यांचें विशेष लक्ष असतें. त्यांनीं आपलें जीवन इतकें नियमित ठेवलें आहे, म्हणूनच राष्ट्रकार्याचीं एवढीं प्रचंड कामें ते करूं शकले आहेत.

एक वेळ मोठ्या गोष्टी देखील ते बाजूला ठेवतील, पण या लहान गोष्टी व्यवस्थित झाल्याशिवाय त्यांना चैन पडणार नाहीं.

# ५ गुलकंद आणि शिगोशिग प्याला

## गरिबाला गरम पाणी : १

बापूजींची काटकसर आणि मितव्ययिता प्रसिद्धच आहे. लोकांनीं विश्वासानें दिलेल्या एक एक पैशाचा हिशेब आपणाला द्यायचा आहे व तो योग्य तऱ्हेनें खर्च केला कीं नाहीं याचा जाब जनताजनार्दनाला आपणाला दिला पाहिजे, ही भावना त्यांच्या सर्व कामांच्या मुळाशीं दिसून येईल. अनाठायीं पैसा खर्च झाल्यास त्यांना मरणप्राय दुःख होतें. हिंदुस्थानांतल्या खेड्यांतील गरीब मनुष्य जेवढ्यांत आपलें भागवितो, त्यापेक्षां जास्त पैसा स्वतःवर खर्च करणें बरोबर नाहीं, असें ते म्हणतात! अपरिहार्य म्हणून ते आज आपल्या भोजनांत फळें व दूध घेत आहेत. परंतु एका काळीं मीठ-भाकरीसारखें अन्न खाण्याचा प्रयोगहि त्यांनीं केलेला आहे. आश्रमांतील अनेकांनीं बापूजींचा आदर्श पुढें ठेवून आपलें जीवन गरिबांहूनहि गरीब बनविलें आहे. अनेक आश्रमवासी नुसती कांदाभाकर खाऊन राहिले आहेत व चटईवर झोंपले आहेत. कपड्यांच्या बाबतींत बापूजींची काटकसर प्रसिद्धच आहे. एक पंचा व एक उपरणें हाच काय तो त्यांचा पोषाख.

बापूजींची ही काटकसर दरिद्रनारायणाशीं एकरूप होण्याच्या भावनेंतून निर्माण झालेली आहे. डिसेंबरची कडक थंडी, तशांत बापूजींना पडसें झालेलें. त्यामुळें रात्रीं बापूजींना गरम पाण्याची रबरी पिशवी त्यांच्या सेवेंत असलेल्या मुलीनें दिली. गरम पाण्याची पिशवी पाहून बापूजी म्हणाले, 'गरिबांना रात्रीं गरम पाण्याची पिशवी मिळते का? मग हें मला कशाला?'—असें म्हणून त्या दिवशीं बापूजी त्या मुलीला किती तरी बोलले. आश्रमाच्या रसोड्यांत अन्नाचें

एक शीत देखील वांया न घालविण्याची, एवढेंच नाहीं, तर मीठ देखील टाकून न देण्याची सूचना त्यांनीं भिंतीवर लावून ठेविली आहे. आलेल्या पत्रांचे लिफाफे ते फेंकून देत नाहींत. त्यांना उलगडून त्यांचा पाठकोरा भाग ते चिठ्ठया लिहिण्याच्या कामांत आणतात. जगाला हालवून सोडणारे त्यांचे विचार ह्याच पाठकोऱ्या रद्दी कागदाच्या तुकड्यांवर लिहिलेले असतात, हें ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल.

## शिगोशिग भरलेला प्याला : २ :

कांहीं दिवसांपूर्वीं आश्रमांत एक मद्रासी गृहस्थ आले होते. शरीर-श्रम केल्याशिवाय कोणालाहि जेवणाचा हक्क नाहीं, हा आश्रमाचा नियम. त्यामुळें आश्रमांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीला एकदोन तास तरी आश्रमाचें घरकाम करावें लागतें. दळणें, पाणी भरणें, स्वयंपाक करणें, सफाई करणें, एवढेंच नाहीं, तर संडास साफ करण्याचें कामहि आश्रमांत येणाऱ्या पाहुण्यांना देण्यांत येतें. मोठमोठे लोक देखील हीं कामें मोठ्या हौसेनें व आनंदानें करतात. आश्रमाच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ह्या मद्रासी गृहस्थांना पाणी भरण्याचें काम देण्यांत आलें होतें. गृहस्थ इतके मेहनती होते कीं दिवसभर खांद्यावर कावड घेऊन पाणी भरण्याचें काम ते करीत. आश्रमाचें पिण्याचें पाणी, स्वयंपाकाचें पाणी, बापूजींच्या स्नानाचें पाणी, आजारी लोकांच्या स्नानाचें पाणी तर ते भरीतच, परंतु ह्याशिवाय आश्रमांतील झाडांना पाणी देण्याचें काम देखील त्यांनीं आपणहून स्वतःकडे घेतलें होतें.

एक दिवस आश्रमांतील झाडांना पाणी देत असतां बापूजींनीं त्यांना आपणाकडे बोलाविलें. बापूजींजवळचें पाणी संपलें असल्या-कारणानें व त्यांना चूळ भरावयाची असल्यामुळें ते ह्या गृहस्थांना म्हणाले, ‘ तुमचें पाणी जरा इकडे तर घेऊन या; पाहूं या तुमच्या

पाण्याची चव.'—ते गृहस्थ आपला पिंप घेऊन येतांच बापूजींनीं आपला पेला पुढें केला व त्यांत पाणी टाकण्याला खुणाविलें. गृहस्थांनीं प्याल्यांत इतकें पाणी ओतलें कीं प्याला हालवितांच तें सांडल्याशिवाय राहतें ना. बापूजी त्यांना म्हणाले,

"तुम्हीं प्याला किती शिगोशिग भरला आहे, पाहतां ना? सांडल्याशिवाय तो उचलतां येईल का?"

हें ऐकतांच त्या गृहस्थांनीं बापूजींच्या हातांतून प्याला घेतला व दाराबाहेर जाऊन थोडेंसें पाणी लवंडून पुन्हां तो बापूंना आणून दिला. बापूजी त्यांना म्हणाले,—

"इतकें पाणी तुम्हीं वायां घालविलें ना?"


"साठ सत्तर कावडी पाणी भरतों मी रोज; एवढेंसें पाणी गेलें तर त्यांत काय मोठें व्हायचें आहे?"—ते गृहस्थ म्हणाले.

थोडेंसें पाणी वायां घालविणें देखील राष्ट्रीय संपत्तीची उधळपट्टी करण्यासारखें आहे, हें त्या वेळेस बापूजींनीं ह्या गृहस्थांना गंभीरपणें समजावून सांगितलें! कोठून आपण बापूजींना उत्तर दिलें, असें त्या गृहस्थांना होऊन गेलें व त्यामुळें उगीच जास्त पाणी भरण्याचेंहि त्यांनीं कमी केलें कीं काय कोण जाणे!

## पाण्याच्या रांजणाला नळाची तोटी : ३ :

आज लोकांत हलगर्जीपणाच्या व उधळेपणाच्या सवयी जणूं काय नैसर्गिक होऊन बसल्या आहेत. प्याल्यांत पाणी टाकतील तर अगदीं सांडेपर्यंत, कपांत चहा ओततील तो इतका कीं खालच्या बशींतून उसळून पुन्हां जमिनीवर पडावा, भातावर तूप वाढतील तें ताटभर ओघळेपर्यंत! बापूजींना हा उधळेपणा अगदीं असह्य होतो. अन्नाच्या

बाबतींत हा उधळेपणा तर पराकाष्ठेला पोंचला आहे आणि म्हणूनच मागें सांगितल्याप्रमाणें आश्रमाच्या भोजनालयांत मीठ देखील न टाकण्याबद्दल सूचना लिहून ठेवली आहे.



पाणी तें काय, पण तें देखील वायां घालविणें ह्यांना पंसत पडत नाहीं हें वरील उदाहरणावरून दिसेलच. रोजच्या व्यवहाराकरितां बादलींतून किंवा पिंपांतून लोट्यानें पाणी घेण्याची बहुतेक सर्वत्र पद्धत आहे. लोटा जमिनीवर ठेवल्यामुळें व नेहमीं हातांत घ्यावा लागत असल्यामुळें तो अस्वच्छ होतो. याकरतां तोच लोटा पाण्यांत बुडविणें स्वच्छतेच्या दृष्टीनें योग्य म्हणतां येणार नाहीं. शिवाय ह्यामुळें थोड्याकरतां एक लोटा पाणी उगीचच सांडलें जातें. व्यर्थ जास्त पाणी सांडलें जाऊं नये, व स्वच्छताहि राहावी, म्हणून आश्रमांत पाण्याच्या टाक्यांना तोट्या लावल्या आहेत. एवढेंच नव्हे, तर पाणी ठेवण्याच्या रांजणांना देखील तोट्या बसविल्या आहेत.

बापूजींच्या झोंपडीजवळ बाहेरच्या बाजूला एक तिपाईवर ठेवलेला पाण्याचा रांजण व त्याला ती तोटी पाहून सेवाग्राम पाहण्याकरितां आलेले एक गृहस्थ म्हणाले, 'हें एक विचित्र दृश्य आहे बुवा ! महात्माजींचं एक एक पाहावं तें जगावेगळं ! अहो, तोटीच लावायची होती तर रांजणाऐवजीं पितळी पंचपात्रीला ती लावली असती तर सुंदर नसतं का दिसलं ? मातीच्या ह्या रांजणाला ही पितळी तोटी, विजोड तर आहेच, पण ती अगदीं विद्रूप दिसते. तुम्हांला नाहीं असं वाटत ?'

मी त्या गृहस्थांना म्हणालों, 'अहो, एखाद्या गोष्टीच्या नवीनतेमुळं किंवा अपरिचितपणामुळं ती लोकांना विलक्षण व विद्रूप वाटते; परंतु तीच प्रचारांत आली, परिचयाची झाली म्हणजे सुरूप आणि सुंदर वाटते. असहकारितेच्या काळीं ज्या वेळेस नुकतीच खादीची सुरुवात होती— खादीचे कपडे घालून कोणी निघाला, तर लोक त्याला हंसत असत; परंतु आज तीच आदराची वस्तु झाली आहे. षोकी लोक देखील फॅशन म्हणून आज खादीचे कपडे घालीत आहेत. रांजणाला तोटी लावण्याचं देखील असंच आहे. त्याचा जर सर्वत्र प्रचार झाला, प्रत्येक घरांत जर ही गोष्ट दिसूं लागली, तर मग आज तुम्हांला हें जें कांहीं विलक्षण वाटतं, तें तसं वाटणार नाहीं.'

## मातीचीं सुंदर भांडीं :४:

सुंदरतेची गोष्ट जाऊं द्या, रांजणाला तोटी लावण्यांत पाणी जास्त सांडलें जाऊं नये व तें स्वच्छ राहावें, हा बापूजींचा उद्देश आहे. याकरतां पितळेची पंचपात्री किंवा लोखंडी ड्रमही ठेवतां आला असता, हें खरें; परंतु ग्रामीण वस्तूच वापरण्याचा बापूजींचा जो सिद्धांत आहे, तो त्यामुळें पाळला गेला असता काय ? तांब्या-पितळेच्या भांड्यांपेक्षां गांवांतील कुंभारानें बनविलेलीं मातीचीं भांडीं त्यांना जास्त

प्रिय आहेत. रोजच्या व्यवहाराकरतां लागणारीं सर्व भांडीं मातीचीं कशीं वापरतां येतील, याकडे त्यांचें लक्ष आहे व तशा तऱ्हेचे प्रयोग आश्रमांत चालू आहेत. आश्रमामध्यें एक 'पॉटरी'चे तज्ज्ञ कार्यकर्ते आहेत. त्यांनीं केलेल्या मातीच्या कप-बशा, बरण्या, प्याले, वाट्या निरनिराळ्या आकाराचीं मडकीं व मातीच्या तऱ्हतऱ्हेच्या वस्तु तुम्ही बघितल्यास कलेच्या दृष्टीनें तुम्हांला त्या आवडतील, यांत शंकाच नाहीं. परंतु रोजच्या उपयोगाच्या दृष्टीनें देखील त्या वापरण्यास उपयुक्त आहेत हें तुम्हांला आढळून येइल. मातीच्या भांड्यांत दोन दोष असतात. एक म्हणजे तें तांब्या-पितळेच्या भांड्याप्रमणें साफ करतां येत नाहीं व दुसरें तें फुटण्याचा संभव जास्त. चिनी मातीच्या भांड्यांप्रमाणें मातीच्या भांड्यांना पॉलिश वगैरे देऊन गुळगुळीत करतां आल्यास स्वच्छतेचा प्रश्न सुटेल. अशीं पॉलिश केलेलीं मातीचीं भांडीं आश्रमांत व इतरत्रहि थोडींबहुत तयार होऊं लागलीं आहेत. रोजच्या व्यवहारांत तीं वापरण्यास कांहींच हरकत नाहीं.

'पण मजबुतीच्या प्रश्नाचें काय? मातीचीं भांडीं धातूच्या भांड्याप्रमाणें टिकाऊ कधीं तरी होणें शक्य आहे?' असें तुम्ही यावर विचाराल. मातीचीं भांडीं हीं नेहमींच ठिसूळ असणार, हें गृहीत धरलेंच पाहिजे. हातांतून खालीं पडलीं, आदळलीं, म्हणजे तीं फुटणारच. तीं वापरायचीं म्हणजे काळजीपूर्वक आणि संभाळून वापरावीं लागणार. यासंबंधीं बापूजी काय म्हणतात, माहित आहे का तुम्हांला? ते म्हणतात, 'मातीचीं भांडीं अशीं जपून वापरावीं लागतात, त्यांना स्वच्छ ठेवण्याकरतां अधिक काळजी घ्यावी लागते, म्हणून तर तीं वापरणें जास्त आवश्यक आहे.'

आज सुखलोलुपतेकडे, आळसाकडे लोकांची प्रवृत्ति बळावत आहे. परिस्थितीला तोंड देण्याऐवजीं तिला टाळण्याची, तिच्यापासून पळून जाण्याची आमची आज धडपड चालू आहे. ह्या प्रवृत्तीमुळें मानवी

जीवन मिंधें, परावलंबी व गुलाम बनत चाललें आहे, असें म्हणतां येईल. तरवारीची धार तीक्ष्ण ठेवण्याकरतां तिला पाषाणावर नेहमीं घांसावें लागतें, त्याचप्रमाणें जीवनाला तेजस्वी ठेवावयाचें असल्यास परिस्थितीवर तें नेहमीं घांसलें गेलें पाहिजे. मातीचीं भांडीं वापरा, तुम्हांला तीं काळजीपूर्वक वापरल्याशिवाय गत्यंतर उरणार नाहीं. थोडा का निष्काळजीपणा तुम्हीं दाखवला, कीं त्याचें खापर तुमच्या डोक्यावर फुटलेंच म्हणून समजा. तें उत्तम प्रकारें स्वच्छ केलें नाहीं, तर पुन्हां वापरणेंच अशक्य व्हायचें.

## शुभ्र खादीचें तत्त्वज्ञान : ५ :

वापूजींना रंगीत कपडे आवडत नाहींत, याचें कारण तरी हेंच. पांढरा स्वच्छ खादीचा पोषाख आज आमचा राष्ट्रीय पेहराव झाला आहे. चरखा संघाला त्यांचें नेहमीं सांगणें असतें कीं रंगीत खादी तयार करण्याच्या भानगडींत तुम्हीं पडूं नका. खादी म्हणजे पांढरी खादी, रंगीत खादी खादीच नव्हे. पांढरें वापरण्याचा त्यांचा इतका आग्रह कां? पांढऱ्या कपड्यांत अस्वच्छता लपून राहूंच शकत नाहीं. ते मळले कीं धुऊन स्वच्छ करणें भागच पडतें. रंगीत कपड्यांप्रमाणें ते मळ संपादूं शकत नाहींत. मनुष्याला नेहमीं स्वच्छतेच्या धारेवर ते धरतात, म्हणूनच बापूजींचा पांढरे कपडे वापरण्यावर भर आहे. महाराष्ट्रीय स्त्रियांमध्यें पांढऱ्या पातळांचा प्रवेश करणें अवघड काम होतें. परंतु महात्माजींनीं त्यांना देखील पांढऱ्या खादीची दीक्षा दिली आहे. 'कुन्देन्दु तुषार हार धवला' सरस्वतीप्रमाणें शुभ्र खादी देखील 'जाड्यापहा' आहे आणि म्हणूनच 'सा मां पातु' म्हणून बापूजी तिचें आवाहन करीत आहेत.

चरख्यावर सूत कांततांना तुटलेले लहान लहान धागे बापूजी सुवर्णाच्या कणांप्रमाणें वेंचून जपून ठेवतात. ह्या तुटीचाहि ते उपयोग करतात. बुनियादी अभ्यासक्रमांत तुटीचा उपयोग करण्याचें काम मुद्दाम त्यांनीं दाखल केलें आहे. मराठी शाळांच्या मुलांनीं तुटीपासून केलेल्या 'पिनकुशन्स' वगैरे वस्तु ते स्वतः वापरतात. कचरा म्हणून फेंकून देण्यांत येणाऱ्या वस्तूंचा देखील उपयोग करण्याकडे त्यांचें बारिक लक्ष असतें.

## टेबलपर फूल रखना चाहती हो ? : ६ :

शोभेकरतां म्हणून अनेक वस्तू आपण उगीच वायां घालवीत असतों. आश्रमाच्या दवाखान्याच्या भोंवतीं गुलाबाचीं बरींच झाडें लावलीं आहेत. गुलाबाला आलेलीं फुलें काळजीपूर्वक काढून त्यांचा गुलकंद करण्याकडे उपयोग करण्यांत येतो. गुलाबाचीं तेथील तीं सुंदर गेंदेदार फुलें पाहिलीं, कीं त्यांतील एखादें फूल तोडून तें केसांत खोवण्याचा मोह आश्रमांतील स्त्रियांना होणें साहजिक आहे. परंतु केसांत खोवण्याकरतां किंवा फुलदाणींत ठेवण्याकरतां फुलें तोडणें बापूजींना आवडत नाहीं, हें आश्रमांतील स्त्रियांना माहित असल्यामुळें त्या बहुधा फुलांच्या वाटेला जात नाहींत. परंतु बापूजींच्या भेटीकरितां कांहीं दिवसांकरतां आश्रमांत येऊन राहणाऱ्या कांहीं धीट स्त्रिया आश्रमांतील फुलांनीं आपले केस विभूषित करतांना मधून मधून आढळून येतात. बापूजींच्या कृतक कन्या श्री. प्रेमा कंटक तर बापूजींचा आदेश बाजूला ठेवून गुलाबाच्या फुलांचा यथेच्छ समाचार घेतात. कस्तुरबांना अर्थात् कोणतेच नियम लागू नव्हते. त्या नियमांच्या पलीकडे होत्या. बागतील तितकीं फुलें त्या तोडीत, परंतु बांच्या बाबतींत एक गोष्ट होती. शोभेकरतां फुलें तोडण्याची त्यांना हौस नव्हती. देवपूजेकरतां त्या फुलें तोडीत. त्यांच्या ह्या देवपूजे-

मुळें आश्रमांतील तरुण मुलींचें आयतेंच काम होत असे. बांना खूष केलें व त्यांची थोडी सेवा केली कीं मुलींना सुंदर सुंदर फुलें त्या स्वत: आपणहून देत.

एक दिवस दवाखान्यांत गुलकंद करण्याकरतां आश्रमाचे एक कार्यकर्ते गुलाबाचीं फुलें तोडीत होते. आश्रमांतील एक भगिनी तेथेंच दवाखान्यांत काम करीत होत्या. त्यांना त्यांनीं मदतीला बोलावलें, तेव्हां त्या विनोदानें म्हणाल्या—'दोन चार फुलें मला टेबलावर ठेवायला देत असाल, तर मी येतें फुलें तोडायला. फुकट फुलें तोडण्याचा उत्साह माझ्यांत नाहीं.' बापूजी मागून येत होते. त्यांनीं हें ऐकलें, व मागून त्यांच्या पाठीवर थाप मारीत हंसत हंसत ते म्हणाले, 'हां, हां, टेबलपर फूल रखना चाहते हो? लेकिन जब वे दवाई के काम में आते है, तो टेबलपर रखनेके लिए नहीं लेना चाहिए।' अर्थात् ह्यामुळें त्या अगदीं ओशाळ्या झाल्या. बापूजी मागून येताहेत हें त्यांना माहित नव्हतें.

# ६ भेट आणि उपायनें

## आणखी पैसे मिळवा :१:

बापूजी अत्यंत काटकसरी असले तरी कंजूष नाहींत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अमुक एक गोष्ट फायदेशीर होणारी आहे हें नक्की ठरलें, म्हणजे धाडसी व्यापारी ज्याप्रमाणें मग लाखों रुपये खर्च करण्याला मागेंपुढें पाहत नाहीं, त्याप्रमाणें बापूजींचें आहे. अमुक एक गोष्ट राष्ट्राच्या फायद्याची आहे हें निश्चित झाल्यावर त्याकरतां पैसा खर्च करण्यांत ते मागेंपुढें पाहत नाहींत. खादीच्या कामावर आजपर्यंत लाखों रुपये त्यांनीं जमविले व खर्च केले. टिळक फंडाचा पैसा अशा तऱ्हेनें खर्च होत असलेला पाहून त्यावेळेस अनेक लोकांनीं बापूजींवर कडक टीका केली. एवढेंच नव्हे, तर अप्रामाणिक-पणाचे आरोपहि त्यांच्यावर करण्यांत आले. परंतु बापूजींनीं त्याकडे मुळींच लक्ष न देतां आपलें काम जोरदारपणें तसेंच चालू ठेवलें. लोकांच्या टीकेची बापूजींनीं पर्वा केली नाहीं.

मध्यप्रांतांतील काँग्रेस-मंत्रिमंडळाचे माजी पंतप्रधान पं. रविशंकर शुक्ल यांच्या महाकोशलमधील खादी-कार्यासंबंधीं त्या वेळीं योजना चालल्या होत्या. मी त्यांना म्हणालों, बहुतेक सर्व प्रांतांत चरखा-संघाच्या शाखा असून खादीचें काम तेथें किती तरी उन्नतावस्थेला गेलें आहे. महाकोशलमध्यें त्या दृष्टीनें कांहींच कसें झालें नाहीं? महाकोशलच्या शेजारच्या मराठी मध्यप्रांताचीच गोष्ट घ्या; तेथें खादीचें काम किती सुंदर तऱ्हेनें संघटित केलेलें आहे. तसें पाहि-ल्यास मराठी मध्यप्रांतापेक्षां हिंदी मध्यप्रांताची गांधीजींवर आणि काँग्रेसवर जास्त निष्ठा आहे.

ते म्हणाले, 'आम्हीं १९२२ मध्यें तीस-चाळीस हजार रुपये खादीच्या कामाकरतां जमविले व जबलपूर व रायपूरकडे खादीचें काम सुरू केलें. त्या वेळेस सर्वच अननुभवी असल्यामुळें दोनतीन वर्षांतच आमचे ते तीस-चाळीस हजार रुपये नाहींसे झाले.'

'ह्यांत इतके रुपये बुडालेले पाहून बापूजींनीं तुम्हाला ठपका दिला असेल.' मी म्हणालों.

'त्यांत रुपये बुडण्याचा प्रश्नच नाहीं. चरखे बनविण्यांत व कांतण्या-विणण्याची मजुरी देण्यांत ते खर्च झाले. ज्या कामाकरतां ते जमविले होते, त्या कामांतच त्यांचा विनियोग झाला. आतां एवढें खरें, कीं चांगले अनुभवी लोक आम्हाला मिळाले असते, तर आमचें भांडवल कायम राहून खादीचें काम चालू राहिलें असतें. बापूजींना आम्हीं हें सांगितलें. तेव्हां ते म्हणाले, 'कांहीं हरकत नाहीं; तीस हजार खर्च झाले, तर आणखी तीस हजार मिळवा.'

## कोट्याधीश गांधी : २ :

पैसे संग्रह करण्याकरतां नाहींत; ते योग्य कार्यांत खर्च करण्याकरतां आहेत, ही बापूजींची दृष्टि आहे. आपल्या जीवनांत असंग्रहाचें तत्त्व शब्दशः उतरविणारे बापूजी कंजूष असणें शक्यच नाहीं. देशकार्याकरतां आजपर्यंत त्यांनीं जितका पैसा जमविला, तितका पूर्वीं कोणीहि जमविला असल्याचें हिंदुस्थानच्या इतिहासांत एक तरी उदाहरण दाखवितां येईल काय? एक हिंदुमहासभावादी गृहस्थ म्हणाले, 'आजपर्यंत गांधी कोट्याधीश नव्हते; परंतु आतां त्यांना अगदीं खऱ्या अर्थानें कोट्याधीश म्हणतां येईल!'

'तें कसें काय?'–मी विचारलें.

'अहो, गांधींच्या पंचाहत्तराव्या वाढदिवशीं कस्तुरबा ट्रस्ट फंडाचा सवा कोट रुपयांचा चेक त्यांच्या हातांत देण्यांत आला आहे ना?'

मीं त्यांना सांगितलें कीं 'कस्तुरबा ट्रस्ट फंडाच्या आधींहि बापूजींनीं कांहीं कमी पैसा गोळा केलेला नाहीं. टिळक फंड, खादी फंड, हरिजन फंड हे लाखों रुपयांचे फंड झालेले आहेत. याशिवाय लहानमोठ्या शेंकडों कार्याकरतां त्यांनीं किती पैसा गोळा केला आहे, याची गणतिहि करतां येणार नाहीं. त्यांनीं मागण्याचाच अवकाश, कीं गरिबांपासून तों श्रीमंतांपर्यंत व लहानांपासून तों मोठ्यां-पर्यंत सर्व लोक पैशाचा जणूं काय त्यांच्यावर वर्षाव करतात. पैसे मागण्याचीहि जरूर त्यांना आतां राहिली नाहीं. लोक आपणहूनच त्यांना पैसे आणून देतात व स्वतःला धन्य समजतात!'

## मंगळसूत्राची भेट : ३ :

एकदां दिल्लीहून मद्रासला परत जात असलेल्या कांहीं मद्रासी श्रीमंत स्त्रिया बापूजींच्या दर्शनाकरितां वर्ध्याला उतरल्या होत्या. सेवा-ग्रामला आल्यानंतर अनुनय-विनय करून बापूजींच्या कुटींत त्यांनीं प्रवेश तर मिळविला. रिक्त हातानें बापूजींचें दर्शन घेणें योग्य होणार नाहीं, हें त्या स्त्रियांना देखील माहित होतें. तेव्हां त्यांनीं आपल्या अंगावर असलेले अंलकार काढून ते बापूजींच्या पुढें ठेवले व नमस्कार केला. बापूजींनीं त्यांची ती भेट स्मितपूर्वक ग्रहण केली. परंतु एवढ्यानें त्यांचें थोडेंच समाधान होणार? समोर बसलेल्या त्यांच्यांतील एका तरुणीकडे त्यांनीं दृष्टिपात केला व हंसत हंसत ते तिला म्हणाले, 'तुमच्या गळयांत हें मंगळसूत्र आहे, तें नाहीं दिलं तुम्हीं मला?'

बहुतेक ती नवपरिणित वधू असावी. बापूजींचा हा प्रश्न ऐकतांच क्षणभर ती घोटाळली. परंतु तें क्षणभरच. तिनें ताबडतोब गळयांतून



मंगळसूत्र काढलें व तें बापूजींच्या हातांत टाकलें. तिनें दिलेली ही भेट खरोखरच अपूर्व होती. बापूजींनीं तें मंगळसूत्र घेतलें, थोडें त्याकडे निरखून पाहिलें आणि पुन्हां त्यांनीं तें त्या मुलीला परत केलें.

'माझी भेट म्हणून ठेवा हें तुमच्याजवळ.' ते म्हणाले.

## फळांचे करंडे व मेव्याचीं पार्सलें : ४ :

बापूजींना भेट देणाऱ्या लोकांची इच्छा असते कीं बापूजींनीं आपण दिलेल्या वस्तूचा स्वतःकरतां उपयोग करावा. परंतु त्यांना माहित आहे कीं बापूजींना मिळालेली पैन् पै राष्ट्रकार्यांत खर्च होते. स्वतःकरतां त्यांतला एक पैसाही ते ठेवीत नाहींत. कोणी जर त्यांना सांगितलें कीं हा पैसा मी तुमच्या स्वतःकरितां देत आहें, किंवा

त्यांचा उपयोग तुमच्या कुटुंबीयांकरतांच करण्यांत यावा, तर ते त्याला साफ सांगतील कीं तुझा पैसा तूं आपल्याजवळच ठेव, मला तो नको.

पैशाचा बापूजी स्वतःकरतां उपयोग करीत नाहींत, हें माहित असल्यामुळें लोक त्यांच्याकडे फळें व सुका मेवा पाठवितात. उद्देश हा कीं आपल्या भेटीचा बापूजी स्वतः थोडा तरी आस्वाद घेतील. आश्रमामध्यें अशा प्रकारें बहुतेक रोजच हिंदुस्थानच्या दूरदूरच्या प्रांतांतून फळांचे करंडे व सुक्या मेव्याचीं पार्सलें येत असतात. परंतु त्यांचा उपयोग बापूजींच्या खाण्याकडे कमीच होतो. आश्रमांतील आजाऱ्यांकरितांच त्याचा उपयोग करण्यांत यावा, अशी बापूजींची ताकीद आहे. शक्यतोंवर स्थानिक मिळणाऱ्या वस्तुच ते वापरतात. अहमदनगरच्या मुसंब्यांऐवजीं सेवाग्रामचीं संत्रींच ते जास्त पसंत करतील, सिमल्याच्या सफरचंदांपेक्षां आश्रमाच्या बगीच्यांत होणारीं केळीं त्यांना जास्त मधुर लागतील आणि पेशावरच्या द्राक्षांहून सेवाग्रामचीं जांभळें त्यांना जास्त प्रिय वाटतील. शरीरप्रकृतीच्या दृष्टीनें किंवा डॉक्टरांच्या सल्ल्यामुळें बापूजींना पुष्कळशा बाहेरील वस्तूहि प्रसंगीं घ्याव्या लागतात हें खरें; परंतु तें अपरिहार्य म्हणून. बापूजी स्वतः आपण पाठविलेल्या फळादिकांचा उपयोग करतील, अशी जी त्यांच्या भक्तांची कल्पना ती फलद्रूप होणें कठिणच.

बापूजी ह्या भेट देणाऱ्या लोकांपेक्षां जास्त धूर्त आहेत, असें म्हणावें लागेल. स्वतःकरतां लोकांनीं कांहीं द्यावें, अशी जरी त्यांची इच्छा नसली, तरी त्यांच्या आवडीच्या कार्याकरितां जें कांहीं मिळेल, तें ते आनंदानें स्वीकारतात. एवढेंच नव्हे, तर आपणाकडे येणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें दरिद्रनारायणाच्या सेवेकरतां कांहीं तरी दिलेंच पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो. भेट घेऊन येणाऱ्या मनुष्याशीं ते एक दोन शब्द बोलतील. थोडा विनोद करतील आणि त्यामुळें भेट घेऊन येणाऱ्या मनुष्याला आपल्या भेटीचें सार्थक झालें, असें वाटेल.

## तुम्हीही कांहीं वस्तु घेऊन या : ५ :

कोचीनच्या राजघराण्याशीं संबंध असलेले एक गृहस्थ बापूजींच्या दर्शनाकरतां एकदां सेवाग्रामला आले होते. कस्तुरबांच्या कुटीच्या व्हरांड्यांत आणखी कांहीं दर्शनेच्छूंबरोबर तेहि जाऊन बसले. दुपारीं बारा वाजतां बापूजी आपल्या झोपडींतून निघून जेवणाला आश्रमाच्या भोजनगृहांत जाण्याकरितां बाहेर निघाले, तेव्हां दर्शनाकरितां जमलेल्या लोकांनीं त्यांना नमस्कार केला. बापूजींनींहि त्यांच्याकडे पाहत त्यांच्या नमस्काराचा स्वीकार केला. इतक्यांत दर्शनाकरतां आलेल्या लोकांमध्यें एक गृहस्थ फळांचा करंडा घेऊन आले होते. ते पुढें झाले व त्यांनीं तो करंडा बापूजींच्या पुढें ठेवला व नमस्कार केला. ह्यामुळें अर्थात् बापूजी थोडे थांबले, 'कोठून आलांत.' वगैरे त्या गृहस्थांची त्यांनीं विचारपूस केली व त्यांना आश्रमाच्या रसोड्यांत जेवणालाहि सांगितलें.

ते कोचीनचे गृहस्थ नंतर मला म्हणाले, 'आमच्याशीं बापूजी एक शब्दहि बोलले नाहींत. परंतु त्या गृहस्थानें बापूजींना फळांचा करंडा दिला म्हणून त्याच्याशीं ते बोलले, आणि त्याला आपल्याबरोबर जेवणालाहि त्यांनीं बोलाविलें. बापूजीहि एकूण सामान्य लोकांप्रमाणेंच भावना ठेवतात म्हणायचे.

गृहस्थ बरेच रागावले होते. मीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला व सांगितलें कीं यापुढें याल तेव्हां तुम्हीहि बापूजींकरतां थोडी भेट घेऊन या, म्हणजे झालें. 'मृदंगो मुखलेपेन करोति मधुर ध्वनिम्' हें तत्त्व मोठ्या लोकांनाहि तितक्याच प्रमाणांत लागू होतें. फरक एवढाच कीं सामान्य लोकांत स्वार्थाची भावना असते, तर बापूजींसारख्यांचा त्यांत केवळ परमार्थ असतो.

'बापूजींनीं तुम्हाला भोजनाला आमंत्रण नाहीं दिलें, तर नाहीं. त्याऐवजीं मी तुम्हांला आमंत्रण देत आहें '–असें म्हणून मग मी त्या गृहस्थांना तालीमी संघांत जेवायला घेऊन गेलों.

## पंढरीचा प्रसाद : ६ :

असाच एकदां एक पंढरपूरचा वारकरी आला होता. संध्याकाळची प्रार्थना झाल्यानंतर तो उभा राहिला व 'आपणाकरितां पांडुरंगाचा प्रसाद आणला आहे, तो आपण ग्रहण करावा'–असें म्हणून त्यानें तो प्रसाद बापूजींपुढें ठेवला. बापूजींनीं तो जाजूजींकडे दिला व जाजूजींनीं इतर मंडळींना वांटून देण्याकरितां तो आपल्याजवळ बसलेल्या एका कार्यकर्त्याच्या स्वाधीन केला. मी त्या पंढरपूरच्या वारकऱ्यांना विनोदानें म्हणालों, 'पांडुरंगाचा प्रसाद ज्यांना द्यायला पाहिजे, त्यांना न देतां तो तुम्हीं भलत्याला दिला. बापूजींना पांडुरंगाचा प्रसाद पूर्वींच मिळून चुकला आहे. सत्याची खरी आवश्यकता आम्हांला आहे आणि हें जाणून आम्हांला वांटण्याकरितां बापूजींनीं सांगितलें आहे.'

गृहस्थ मार्मिक होता. माझें हें म्हणणें ऐकून तो म्हणाला, 'सरळ तुम्हांला न देतां पांडुरंगाचा प्रसाद मीं बापूजींना दिला व त्यांच्याकडून तो तुम्हाला मिळाला, ह्यांतच खरें स्वारस्य आहे. ह्यामुळें आतां तो फक्त पांडुरंगाचा प्रसाद राहिला नाहीं, बापूजींचाहि तो प्रसाद झाला आहे.'

मी जें विनोदानें त्या वारकरी गृहस्थांना म्हणालों, तें बरोबर नव्हतें काय ? बापूजींना स्वत:करतां कांहीं नको आहे, ज्यांना खरोखर कांहीं नाहीं, त्यांच्यासाठीं त्यांचा सर्व परिग्रह आहे.

## भेटींचे त्रिविध नमुने : ७ :

६८३९

पैशांची गोष्ट सोडल्यास बापूजींना भेट म्हणून कोणकोणत्या वस्तू येतात, हें पाहणें मनोरंजक आहे. पुस्तकें व वर्तमानपत्रें यांसंबंधीं पूर्वीं लिहिलेंच आहे. पुस्तकांच्या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. सेवाग्रामला आलेलीं पुस्तकें ते सेवाग्रामच्या पुस्तकालयाला देतात; परंतु ते प्रवासांत असले व तेथें त्यांना कांहीं पुस्तकें भेट म्हणून आलीं, तर बहुधा त्या ठिकाणच्याच एखाद्या पुस्तकालयाला ते तीं देऊन टाकतात. वर्तमानपत्रांचेंहि असेंच आहे. महत्त्वाचीं कात्रणें काढून घेतल्यावर रद्दी म्हणून त्यांची विल्हेवाट लावण्यांत येते. वर्तमानपत्रांच्याही रद्दीचें कांहीं अगदींच किरकोळ उत्पन्न नाहीं. तीं विकून आश्रमाला बरेंच उत्पन्न होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं.


ह्यानंतर दुसरा नंबर फळफळावळांचा येतो. फळांमध्यें मुख्यतः मुसंबीं विशेष येतात. हिंदुस्थानप्रमाणें परदेशाहूनही क्वचित् बापूजींकडे भेट येते. एकदां बसऱ्याहून एका हिंदी व्यापाऱ्यानें तेथील भिन्न प्रकारच्या खजुरांचे अनेक मोठमोठे डब्बे बापूजींना पाठविले होते. आश्रमांतील सर्व कुटुंबांकडे तो खजूर वाटण्यांत आला होता. एखादी वस्तु जास्त आल्यास सर्वांना वांटून देण्याचा प्रघात आश्रमांत आहे. ह्यामुळें मधून मधून बापूजींच्या भेटीचा प्रसाद सर्वांना मिळतो. अर्थात् त्यावर पहिला हक्क आजाऱ्यांचा असतो. आजाऱ्यानंतर लहान मुलांचा नंबर लागतो व नंतर उरल्यास इतरांना तो देण्यांत येतो. बापूजींना भेट म्हणून आलेल्या वस्तूंच्या विल्हेवाटीचें काम कस्तुरबांच्या ताब्यांत होतें. त्या असल्या, म्हणजे आपल्या इच्छेप्रमाणें त्याची व्यवस्था करीत. बापूजी ह्या बाबतींत स्वतः लक्ष घालीत नसले, तरी त्यासंबंधीं त्यांनीं वरीलप्रमाणें नियम घालून दिलेले आहेत. असें असलें तरी कस्तुरबांना आपल्या मताप्रमाणें त्यांची विल्हेवाट लावण्याची मुभा होती.

फळांप्रमाणेंच हातसुताच्या गुंड्यांचीही बापूजींना त्यांचे भक्त लाखोली वाहत असतात. अशा प्रकारें आलेलें सूत बापूजी चरखा संघाच्या स्वाधीन करतात. कांहीं लोक आपल्या सुताची खादी विणून ती बापूजींना भेट देतात. बापूजींनीं आपल्या सुताची खादी वापरावी, अशी त्यांची इच्छा असते. अनेक लोकांकडून येणारी ही खादी बापूजींनां त्यांची इच्छा असली, तरी वापरतां येणें अशक्यच आहे. तरी पण बापूजींच्या कांहीं अत्यंत निकटच्या अनुयायांनीं दिलेली खादी बापूजी स्वतः वापरीत असतात; अशांपैकीं मुंबईच्या गौरीबाई खाडिलकर, श्री. अवंतिकाबाई गोखले ह्या आहेत. त्या दरवर्षी गांधीजयंतीला स्वतःच्या सुताची खादी बापूजींना भेट पाठवीत असतात. इतरांकडून आलेली खादी विकून त्याची रक्कम खादी कार्यालयाला देण्यांत येते.

बापूजी सुरुवातीला विनोबांच्या सत्याग्रहाश्रमांत वर्ध्याला येऊन राहिले होते. त्या वेळेस आश्रमांतील विद्यार्थ्यांनीं आपल्या सुताचें एक ठाण स्वतः विणून तें बापूजींना अर्पण केलें. त्यांच्याजवळ एक धनिक मारवाडी गृहस्थ बसले होते; ते बापूजींना म्हणाले, 'आपला प्रसाद म्हणून ही खादी आपण मला द्यावी.' बापूजी त्यांना म्हणाले, 'ठीक, बोला; केवढ्याला घेतां?' त्या गृहस्थांनीं लगेच खिशांतून दहा दहांच्या पांच नोटा काढून बापूजींच्या समोर ठेवल्या. आपल्याला भेट येणाऱ्या खादीचा बापूजी अशा प्रकारें उपयोग करून घेतात. खादी कार्याकरतां पैसे मिळविण्याची त्यांची ही एक युक्ति आहे, म्हणाना !

बापूजींचें व्यक्तित्व असेंच कांहीं अद्भुत आहे. त्यांत परस्पर विरुद्ध गुणांचा बेमालुम मिलाफ झालेला दृष्टीस पडतो. ते जितके काटकसरी, तितकेच उदार आहेत, असंग्रही असूनही त्यांचा संग्रह पाहिला, म्हणजे आश्चर्यानें मनुष्य थक्क होतो. ते अत्यंत निःस्पृह असले, तरी त्यांची स्पृहा जबरदस्त आहे; थोड्यानें त्यांचें समाधान होणारें नाहीं.

---



# ७ हरिनामाचा गजर

## वाळवंटांतील भक्तिरस : १ :

बापूजींच्या झोंपडीच्या दक्षिणेस आश्रमाची प्रार्थनाभूमि आहे. सकाळच्या आणि संध्याकाळच्या प्रार्थना येथेंच होतात. प्रार्थना-भूमीवर धूळ किंवा चिखल होऊं नये, म्हणून स्वच्छ वाळू टाकलेली

आहे. साबरमतीला असतांना साबरमती नदीच्या विस्तीर्ण वाळवंटावर प्रार्थना करणें बापूजींना आवडत असे. सेवाग्रामला नदीच नसल्यामुळें वाळवंटाचा प्रश्नच नाहीं. परंतु ह्यामुळेंच जणूं काय प्रार्थनाभूमीवर वाळू टाकून नदीकांठची शोभा येथील प्रार्थनाभूमीला त्यांनीं आणली आहे. प्रार्थनेला वाळवंटासारखें शांत व पवित्र स्थान दुसरें नाहीं. चंद्रभागेच्या वाळवंटावर पंढरीच्या भक्तांचा भक्तिरसाचा कल्लोळ साऱ्या महाराष्ट्रांत आजहि दुमदुमत आहे. वाळवंटालाहि रसमय करून टाकणारा भक्तिरसाचा पूर पूर्वीं अनेक भगवद्भक्तांनीं वाहविला. बापूजी त्याला आज महापुराचें स्वरूप देऊं इच्छितात. पूर्वीं भक्तीचा ओलावा नसलेलीं वाळवंटें थोडीं होतीं. त्यांना जलमय करण्याला लहानसे पूर पुरे होत. पण आज सर्व जगच वालुकामय झालें आहे. खोल खणून देखील त्यांत ओलावा मिळण्यासारखा राहिला नाहीं. आणि म्हणून त्याला पुन्हां जीवन द्यावयाचें असल्यास महापुराचीच आवश्यकता आहे; लहानशा ओघळानें हें होण्यासारखें नाहीं.

## तरुण अश्वत्थाच्या पर्णराजीखालीं : २ :

ईश्वराच्या प्रार्थनेवर बापूजींची आत्यंतिक निष्ठा आहे. मनाला शांति देणारें प्रार्थनेसारखें दुसरें औषध नाहीं, असें ते म्हणतात. पहांटे पांच वाजतां अंधुक संधिप्रकाशांत उघड्या आकाशाखालीं बसलेली त्यांची ती ध्यानस्थ मूर्ति, शांत आवाजात गायिलेलें आश्रमवासी मंडळीचें तें भक्तिसंगीत मनुष्याच्या मनाला अत्यंत पवित्र करून सोडतें, यांत संशय नाहीं. प्रार्थनाभूमीवर मध्यभागीं बापूजींचें आसन असतें. त्यांच्या आसनाच्या जागीं दोन खुंट लावलेले असून प्रार्थनेच्या वेळीं बापूजींना टेकण्याकरितां लाकडाची एक फळी त्या खुंटांना टेकून ठेवण्यांत येते. लहानशा गादीवर दक्षिणाभिमुख बापूजी प्रार्थनेला बसतात. त्यांच्यासमोर आयताकृतींत इतर लोक बसलेले

असतात. बापूजींच्या मागें १५–२० फुटांवर पिंपळाचें एक उंच झाड आहे. बापूजी प्रार्थनेला बसले आहेत, मागें तो अश्वत्थ वृक्ष निश्चल उभा आहे, वर आकाशांत चित्रा-स्वातीसारखा एखादा पहिल्या प्रतीचा तारा शांत प्रकाशानें आकाशाला उजळीत आहे; अशा शांत वातावरणांत प्रार्थनेच्या सुरुवातीला भगवान् बुद्धाला दिलेल्या प्रणामांजलीचा तो गंभीर डमरुध्वनि जेव्हां सुरू होतो, तेव्हां आपणा-समोर बापूजी बसलेले नसून प्रत्यक्ष भगवान् बुद्धच बोधिवृक्षाखालीं बसले आहेत, असें वाटूं लागतें. बुद्धाच्या बोधिवृक्षाप्रमाणेंच बापूजींचा हा अश्वत्थवृक्ष अजरामर होईल, यांत शंका नाहीं.

आश्रमाच्या विहिरीजवळ पूर्वीं एक प्रचंड अश्वत्थवृक्ष होता. पक्ष्यांच्या किलबिलाटांनीं तो नेहमीं गजबजलेला असे. उन्हाच्या वेळेस त्याच्या छायेच्या आश्रयाकरतां शेतांत राबणारे ग्रामवासी व गाई–गुरें तेथें येऊन बसत. सूर्याच्या किरणांनाहि अडथळा करणारा तो वृक्ष. जागा मोकळी करण्याच्या दृष्टीनें पुढें तोडून टाकण्यांत आला. तो मोठा अश्वत्थ गेला, तरी त्याच्या जागीं प्रार्थनाभूमीवरील तो लहानसा अश्वत्थ बापूजींच्या वास्तव्याची व तेथें घडलेल्या चिरस्मरणीय घटनांची साक्ष देत पुढें शेकडों वर्षें राहील, यांत शंका नाहीं. त्याच्या चंचल पर्णांच्या मर्मर ध्वनींत प्रार्थनेचें मनोरम संगीत पुढील लोकांना ऐकूं येईल. वृक्षावरील पक्ष्यांच्या किलबिलाटांत बापूजीं-भोंवतीं घोळका करून जमणाऱ्या बालकांचा कर्णमधुर गलबलाट प्रस्फुटित होईल आणि त्याच्या पांढुरक्या बुंध्यांत बापूजींच्या ध्यान-मग्न, श्वेतवस्त्रावृत मूर्तीचा आभास लोकांना होईल, असें अनुमान केल्यास चुकीचें होणार नाहीं.

ह्या वालुकाकीर्ण आश्रमभूमीवर ‘वैष्णव जन तो तेने कहिए’ हें बापूजींचें आवडतें भजन १९४२ च्या ऑगस्टच्या १ तारखेला–मुंबईला जाणाच्या आदल्या दिवशीं गाण्यांत आलें होतें! येथेंच

कस्तुरबांच्या मृत्यूची वार्ता कळल्यावर श्री. बाळकोबांनीं तुकारामाच्या अभंगांच्या अभंगध्वनींनीं आश्रमवासीयांचीं हृदयें पिळवटून टाकलीं होतीं. येथेंच संत तुकडोजीमहाराजांनीं आपल्या खंजिरीनें भक्तिरसाचा कल्लोळ उधळला होता !

## प्रार्थनेंतील गीतापाठ : ३ :

बापूजींना भगवद्गीता प्राणांहून प्रिय आहे. पहांटेच्या प्रार्थनेंत रोज गीतेचें एक दोन अध्याय म्हणण्यांत येतात. गीतेचें अत्यंत शुद्ध उच्चारण झालें पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष आहे. आश्रमांत आलेल्या प्रत्येकाला गीतेचें शास्त्रशुद्ध उच्चारण ते शिकण्याला सांगतात. अशुद्ध उच्चारण केल्यास त्यांना तें मुळींच खपत नाहीं. उच्चारणाप्रमाणेंच गीता मुखोद्गत करण्यावरहि त्यांचा भर आहे. प्रार्थनेंत गीता तोंडपाठ म्हणण्यांत येते, पुस्तकाचा उपयोग करण्यांत येत नाहीं. गीता, भजनें, श्लोक वगैरे सर्व मुखोद्गत असलीं, म्हणजे कोठेंहि आणि केव्हांहि तीं आम्ही म्हणूं शकूं, असा त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. दुःखाच्या प्रसंगीं मनुष्याला धैर्य देण्यास आणि सुखाच्या प्रसंगीं आनंद द्विगुणित करण्यास संतांच्या वचनांसारखा दुसरा मित्र नाहीं आणि ह्यामुळेंच धर्मग्रंथांचें पाठांतर त्यांना अतिशय आवडतें.

महादेवभाईंविषयीं बोलत असतांना ते एकदां म्हणाले, ‘ महादेवभाईंची गीतेवर अत्यंत निष्ठा होती. गीतेचा त्यांनीं इतका अभ्यास केला होता कीं काम करीत असतांना देखील गीता त्यांच्या जिभेवर असे. गीतेचे श्लोक त्यांच्या मुखांतून वाहत्या गंगेप्रमाणें अस्खलितपणें बाहेर पडत. ते इतक्या त्वरित गतीनें गीता म्हणत, कीं गीतेचे अठरा अध्याय म्हणायला त्यांना सव्वा एक तासाहून जास्त वेळ लागत नसे. गीता सावकाश व तुटक तुटक म्हणणें बरोबर नाहीं, ती

जितकी जलद व संपूर्ण म्हणतां येईल, तितकी चांगली; कारण गीता हें एक संपूर्ण चित्र आहे. चित्राचे तुकडे करून पाहिल्यास त्याचें सौंदर्य आपल्या प्रत्ययाला येणार नाहीं. तें संपूर्णच पाहिलें पाहिजे. गीता जलद म्हटली म्हणजे तिच्या अखंड ध्वनीचा जो परिणाम आपणावर होतो, तोच विशेष महत्त्वाचा आहे.

## एक स्वर–एक ध्वनि :४:

प्रार्थना सर्वांनीं एका स्वरांत म्हटली पाहिजे. कोणी सावकाश म्हणत आहे, तर कोणी जलद म्हणत आहे. कोणी उंच स्वरांत, तर कोणी खालच्या आवाजांत म्हणत आहे, अशा तऱ्हेची प्रार्थना बापूजी म्हणतात, व्यर्थ होय. त्यापासून मनाची एकाग्रता न होतां लक्ष प्रार्थनेंतून उडून जातें, व त्यामुळें प्रार्थना करण्याचा उद्देशच नष्ट होतो. समग्र ग्रामसेवाशिबिरांतील लोकांना एकदां ते म्हणाले, प्रार्थना अगदीं तालबद्ध व स्वरबद्ध असली पाहिजे. याचा तुम्ही सामुहिक अभ्यास केला पाहिजे. प्रार्थना करणाऱ्या समुदायाचा निघालेला एकच ध्वनि आमच्या ऐक्यभावना दृढ करील, एकाच ध्येयाकरतां झटण्याचा निर्धार त्यांतून आम्हांला लाभेल व आम्ही सर्व एकरूप होऊन भेदभाव विसरून ईश्वराच्या चरणीं लीन होऊं. एक स्वरानें प्रार्थना म्हणण्यानेंच हें होऊं शकेल.

व्यक्तिगत प्रार्थनेला त्यांचा विरोध नसला, तरी प्रार्थना ही सामुदायिकच असली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदी जीवनांत सामुदायिक संघटनेचा अभाव आहे, त्यामुळेंच हिंदुस्थान पारतंत्र्यांत खितपत पडला आहे. त्याला स्वतंत्र व्हायचें असल्यास सामुदायिकपणें कार्य करण्याची संवय लोकांना लावली पाहिजे. हिंदी समाजांत व्यक्तीच्या विकासाकडे वाजवीपेक्षां जास्त लक्ष देण्यांत आलें आहे.

तें तेथून काढून समाजाच्या सामुहिक विकासाकडे देणें आवश्यक आहे. आणि ह्यामुळेंच बापूजी प्रत्येक गोष्ट सामुदायिक रीत्या करण्यावर जोर देत असतात. दक्षिण आफ्रिकेपासून ते सामुदायिक प्रार्थना करीत आले आहेत. प्रार्थना हें बापूजींच्या दैनिक कार्यक्रमाचें मुख्य अंग झालें आहे. सेवाग्रामला येणारा प्रत्येक मनुष्य बापूजींच्या प्रार्थनेला हजर राहिल्याशिवाय जात नाहीं. आणि प्रार्थनेला हजर राहिल्याशिवाय सेवाग्रामला आल्याचें सार्थक झालें, असें त्याला वाटत नाहीं.

## अनावृत दर्शन : ५ :

बापूजींचें चांगल्या प्रकारें दर्शन घ्यावयाचें असल्यास तें प्रार्थनेच्या वेळींच होऊं शकतें. दिवसभर ते आपल्या झोंपडींत कार्यमग्न असतात; परंतु प्रार्थनेंत सर्व कार्यें बाजूला ठेवून जणूं काय अनंत आकाशाशीं एकरूप होण्याकरितां ते बाहेर निघतात. यावेळेस भिंती त्यांना अडवीत नाहींत, छप्पर त्यांना झांकीत नाहीं, चिकाचे पडदे दारा-खिडक्यांतून त्यांचें दर्शन दृष्टीआड करीत नाहींत. यावेळेस ते मुक्त आहेत, प्रकट आहेत, अनावृत आहेत; त्यांनीं सर्व आवरणें फेंकून दिलीं आहेत. सर्वत्र प्रकाशमान परमात्म्यापुढें त्यांनीं आपलें हृदय, आपलें शरीर उघडें केलें आहे. आतां त्यांना कोणीहि पाहूं शकतो. त्यांच्या दर्शनाकरितां परवानगी घेण्याची आतां आवश्यकता नाहीं !

स्वतःच्या दर्शनाकरितां येणाऱ्या लोकांना ते आपलें दर्शन तर देतातच; पण त्याबरोबर परमात्म्याचेंहि दर्शन ते घडवून आणतात. लोकांनीं आपल्या दर्शनाकरतां यावें, हें त्यांना आवडत नाहीं ! आपलें दर्शन घेऊन लोकांना काय मिळणार आहे ? ' माझें दर्शन काय घेतां,

ईश्वराचें दर्शन घ्या, ' ते म्हणतात, आणि म्हणूनच कीं काय आपल्याला प्रकट करण्याकरितां प्रार्थनेची वेळ त्यांनीं शोधून काढली आहे. अशा प्रकारें स्वतःकडे येणाऱ्या लोकांना ईश्वराच्या प्रार्थनेचा पुण्यलाभ ते करून देत असतात. स्वतःच्या दर्शनालाहि अशा प्रकारें त्यांनीं भक्तीचें साधन बनविलें आहे.

## नमो हो रेंगे क्यो                                    : ६ :

बापूजींच्या प्रार्थनेचें स्वरूप सर्वधर्मी आहे. ते स्वतः हिंदु आहेत व आश्रमांतील बहुतेक आश्रमवासीहि हिंदूच आहेत. त्यामुळें प्रार्थनेचा अधिकतर भाग हिंदुधर्माचा असणें साहजिक आहे. बापूजींच्या सायंप्रार्थनेची सुरुवात जपानी डफाच्या मंद्रगंभीर निनादानें सुरू होते. ‘ नमो हो रेंगे क्यो—भगवान् बुद्धाला नमस्कार असो’ हा मंत्र म्हणून जेव्हां प्रार्थना करणारी व्यक्ति क्षणभर नतमस्तक होते, तेव्हां प्रत्यक्ष भगवान् बुद्धापुढें त्याचे भक्त प्रणाम करीत आहेत, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. भगवान् बुद्धानें जगाला दिलेला अहिंसेचा संदेश त्याच्यानंतर पुन्हां तितक्याच उत्कटतेनें जर कोणी दिला असेल, तर बापूजींनींच नाहीं का? आणि म्हणूनच कीं काय भगवान् बुद्धाच्या प्रार्थनेला बापूजींनीं प्रथमस्थान दिलें आहे.

युद्ध सुरू होण्यापूर्वीं कांहीं वर्षें बापूजींजवळ एक जपानी बुद्ध भिक्षु येऊन राहिले होते. बापूजी त्यांना केशू म्हणून हांक मारीत. आश्रमाच्या लहान मुलांचे ते ‘ केशूमामा ’ होते. सकाळ-संध्याकाळ बापूजी फिरायला निघण्याच्या थोडें आधीं हे बुद्ध भिक्षु मूठ असलेला प्रार्थनेचा डफ हातांत घेऊन टिपरीच्या आघातानें डफावर लिहिलेल्या बौद्धमंत्राचा ध्वनि सेवाग्रामच्या वातावरणांत तरंगित करीत. सेवाग्रामच्या टेकडीच्या पठारावरून त्यांच्या डफाचा मंद मंद येणारा गंभीर

आवाज परम कारुणिक भगवान् बुद्धाच्या चरणीं ते प्रेरित करीत आहेत, असें वाटे. ते रस्त्यांतून डफ वाजवीत चालले म्हणजे आश्रमांतील लहान मुलें त्यांच्याभोंवतीं गोळा होत. मुलांना त्या डफाचें आकर्षण फार होतें. भिक्षुमामा त्यांच्या हातांत डफ देत व वाजवायला सांगत, ह्यामुळें मुलांना ते आवडते झाले असल्यास नवल नाहीं. युद्ध सुरू झाल्यानंतर सरकारनें या जपानी भिक्षूंना सेवाग्रामहून नेलें. ते स्वतः आज येथें नसले, तरी त्यांची प्रार्थना त्यांनीं दिलेल्या डफाच्या निनादांत आज तशीच म्हणण्यांत येत आहे.

## बेरभई प्रभु क्यों नहीं आये : ७ :

इंग्रजी भजनांत Lead, Kindly Light हें भजन बापूजींच्या विशेष आवडीचें आहे. कोणी युरोपियन गृहस्थ आले म्हणजे त्यांना बापूजी तें प्रार्थनेंत गावयाला सांगतात. सेवाग्रामला येणारे अनेक लोक मधून मधून प्रार्थनेंत भजनें म्हणतात. बाहेरील लोकांनीं केलेली प्रार्थना उत्तमच असते, असें नाहीं; तरी पण बापूजी त्यासंबंधीं नेहमींच प्रशंसोद्गार काढतात. एकदां चिमूरचे कांहीं लोक बापूजींच्या दर्शनाकरतां आले होते. त्यांनीं प्रार्थनेंत श्रीसंत तुकडोजी महाराज यांचे 'बेरभई प्रभु क्यों नहीं आये' हें भजन गाइलें. भजन म्हणणारे गृहस्थ साधारण बऱ्या प्रकारें गात होते, परंतु त्यांना साथ देणाऱ्या मंडळींचा मसूर जमत होता ना ताल. असें असलें तरी प्रार्थना संपल्यावर 'फार चांगलें भजन म्हटलें तुम्हीं' म्हणून बापूजींनीं त्यांची प्रशंसा केली. 'बेसूर गाण्याचीही बापूजी वाहवा करतील' आश्रमांतील एक भगिनी तेव्हां म्हणाल्या. अर्थात् हें फक्त भजनापुरतेंच आणि तेंहि बाहेरील लोकांना लागू आहे, हें लक्षांत ठेवावें. बेसूर, बेताल, अशुद्ध व अव्यवस्थित प्रार्थना बापूजींना मुळींच सहन होत नाहीं.

## दिलरुब्याची मधुर सांथ : ८ :

गीतेप्रमाणेंच बापूजींचा आवडता ग्रंथ तुलसी रामायण होय. तुलसीदासांनीं आपल्या पीयुषमयी वाणीनें वर्णिलेलें रामचरित्र केवळ अपूर्व होय. त्याची गोडी अवीट आहे. आश्रमाच्या प्रार्थनेंत रोज तें म्हणण्यांत येतें. आगाखान प्रासादांत कारावद्ध असतांना बापूजींनीं कस्तुरबांच्या सांगण्यावरून प्रार्थनेंत पारायण करण्याकरतां तुलसी-रामायणाचा भाग निवडून काढला आहे. बापूजींनीं केलेलें हें संक्षिप्त तुलसीरामायण दिलरुब्याच्या मधुर सांथीवर प्रार्थनेच्या वेळीं गाण्यांत येतें. पूर्वीं रामायण सुरू झालें म्हणजे बापूजी पुस्तक ठेवण्याच्या घोडीवर आपलें रामायणाचें जाड पुस्तक ठेवून स्वतः पाठ करीत. त्यांना वाचतां यावें म्हणून लहानशा घडवंचीवर विशाल ग्रामोद्योगी कंदील समोर ठेवण्यांत येत असे. वनस्पतिज तेलाचा तो शांत प्रकाश रामायणांत मग्न झालेल्या बापूजींच्या निश्चल श्वेतवस्त्रावृत मूर्तीवर कांहीं विशेषच खुलून दिसे.

## क्रियात्मक प्रार्थना : ९ :

प्रार्थनेनंतर आश्रमांत राहणाऱ्या प्रत्येकानें रोज किती सूत कांतलें, हें लिहिण्यांत येतें. वाचिक प्रार्थनेप्रमाणेंच क्रियात्मक प्रार्थना बापूजींनीं प्रथमच सुरू केली, असें म्हणतां येईल. रोज अर्धा तास चरख्यावर सूत कांतणें आश्रमांत यज्ञरूप समजण्यांत येतें. वाचिक प्रार्थने-पेक्षांहि बापूजींनीं सूत्रयज्ञाला जास्त महत्त्व दिलें आहे. प्रार्थनेचें तें

एक अंग आहे आणि म्हणूनच प्रार्थनेनंतर किती सूत कांतलें तें लिहिण्यांत येतें. सर्वांच्या आधीं 'बापूजी' म्हणून बापूजींचें नांव पुकारण्यांत आलें म्हणजे बापूजींचा प्रतिनिधी अमुक इतके वार कांतलें म्हणून उत्तर देतो. ईश्वराची पूजा शरीरश्रमानें करण्याचा बापूजींनीं जगाला हा नवीन संदेश दिला आहे, असें नाहीं का म्हणतां येणार ?

---

अं. २८०३



# ८ संयमाचा साक्षात्कार

## कितनी लज्जाजनक बात है ! : १ :

कांहीं महिन्यांपूर्वींची गोष्ट. माझे बंधु श्री. कुंदर दिवाण हे मलेरियाच्या आजारांतून नुकतेच उठले होते. आम्ही दोघे पहांटे फिरावयाला निघालों होतों. रस्त्यांतच बापूजी फिरून येतांना आम्हांला भेटले. बंधूंनीं पुढें होऊन त्यांचें पादवंदन करतांच पाठीवर जरा जोरानेंच थाप मारीत स्मितपूर्वक ते म्हणाले–' बीमार पडे थे ना ? कितनी लज्जाजनक बात है । '

बापूजींच्या दर्शनाकरतां आलेले एक अपरिचित गृहस्थ–जे त्या वेळीं बापूजींबरोबर होते–मागाहून मला म्हणाले–' मनुष्य नेहमींच आजारी पडतो. त्यांत लज्जेची गोष्ट काय आहे ? आज पहांटे बापूजी म्हणाले, त्याचें तात्पर्य माझ्या लक्षांत नाहीं आलें. '

'लक्षांत न येण्यासारखं गूढ रहस्य त्यांत कांहीं नाहीं. मनुष्यानं आजारी पडूं नये, असं बापूजींना वाटतं.'

'बापूजींचं म्हणणं बरोबर आहे, परंतु आजारी न पडणं मनुष्याच्या हातचं का आहे?'

## पंचाहत्तरींतहि कणखर : २ :

'बरोबर विचारलंत. आजारी न पडणं मनुष्याच्या हातचं आहे, असं बापूजी मानतात. बापूजींच्या वयाला पंचाहत्तर वर्षं झालींत. मी त्यांना दहा बारा वर्षांपासून पाहत आहें. कधीं त्यांना ताप आला आहे, पडसं झालं आहे? ते आजारी पडल्याचं आठवत नाहीं मला. त्यांचं शरीर आजहि कणखर आहे, असं म्हणतां येईल.'

## मानवी काठ्यांचा आधार : ३ :

त्या गृहस्थांना मी जें हें म्हणालों, त्यांत अतिशयोक्ति नाहीं. दोन वर्षांपूर्वीं सकाळ-संध्याकाळ फिरावयाला जातांना त्यांना काठ्यांची गरज पडत असे. बापूजींची काठी होण्याचा मान आपणाला मिळावा म्हणून मुलें व मोठीं माणसें, मुली व स्त्रिया या सर्वांची अहमहमिका चालू असे. दोन्हीकडे दोघांच्या खांद्यांवर हात टाकून ते फिरावयास जात. काठ्यांच्या जागीं कोणी नसलें, तर हातांत बांसाची काठी घेऊन ते चालत. परंतु आतां फिरावयाला जातांना बांसाची काठी त्यांना लागत नाहीं आणि मानवी काठ्यांचा आधारहि आजकाल ते कमी घेतात. ह्यामुळेंच मी त्या गृहस्थांना सांगितलें कीं पूर्वीपेक्षांहि आतां बापूजींची प्रकृति चांगली आहे.

## आणखी एक उदाहरण : ४ :

माझ्या म्हणण्याच्या पुष्टीकरितां आणखी एक उदाहरण देऊं काय? परवांचीच गोष्ट आहे. वर्ध्याचे एक मुसलमान महाशय संध्याकाळच्या प्रार्थनेला आले होते. आश्रमाच्या प्रार्थनेंत कुराणांतील एक सूक्त म्हणण्यांत येतें. आश्रमामध्यें ज्या क्रमानें तें सूक्त म्हणतात, तो क्रम बरोबर नाहीं, व त्याचा शास्त्रशुद्ध म्हणण्याचा क्रम कोणता, ह्यावर त्यांनीं बरीच चर्चा केली. चर्चेनंतर त्यांनीं विचारलें—'का हो, बापूजींच्या सेवेंत ज्या मुसलमान बाई असत, त्या आतां कोठें दिसत नाहींत?'

'अमतुस् सलाम बेन संबंधीं, तुम्ही विचारतां होय? सध्यां बंगालमध्यें क्षुधापीडितांच्या सेवेचें काम त्या करीत आहेत.'

## विलोभनीय दृश्य : ५ :

'मागें मी जेव्हां जेव्हां येथें आलों, तेव्हां तेव्हां मीं पाहिलें होतें कीं प्रार्थना झाली, कीं आपला हात देऊन त्या बापूजींना उठवीत.'

रोज संध्याकाळची प्रार्थना संपली कीं बापूजी हात पुढें करीत व त्या प्रेमळ, सेवारत बाई त्यांचा तो हात धरून हळूच त्यांना उठवीत. तें दृश्य खरोखरच मोठें विलोभनीय असे. बापूजींचीं शेंकडों चित्रें मीं पाहिलीं आहेत. परंतु त्या प्रसंगाचें चित्र अजून कोणीं कां काढलें नाहीं, याचें मला अजूनहि नवल वाटतें. हिंदु-मुसलमानांचे मतभेद आज कळसाला पोंहोंचल्यासारखे झाले आहेत; असें असूनहि बापूजींवर अमतुस् सलाम बेनसारख्या मुसलमान भक्तांची निष्ठा पाहिली, म्हणजे आश्चर्य वाटतें.

त्या मुसलमान गृहस्थांना मीं सांगितलें कीं ‘पूर्वीपेक्षां बापूजींची प्रकृति आज जास्त धडधाकट आहे. त्यामुळें उठण्याकरतां अमतुस्-सलाम बेनच्या हातांचा आधार घेण्याची आतां त्यांना आवश्यकता भासत नाहीं. ते एखाद्या तरुणासारखे ताडकन् कसे उठतात व झपाझप पावलें टाकीत ताठरपणें कसे चालतात, हें तुम्ही आतांच पाहिलें नाहीं काय ?’

इतक्या उतार वयांतहि बापूजींचें तें सतेज, सडपातळ पण वळकट शरीर पाहून त्या गृहस्थांनीं आश्चर्य व्यक्त केलें.

## आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनम् : ६ :

बापूजींचें सर्वच जीवन कसें आश्चर्यकारक आहे हें पाहिलें म्हणजे गीतेचा खालील श्लोक माझ्या डोळ्यांपुढें येतो—

**आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनम्**
**आश्चर्यवत् वदति तथैव चान्यः ।**
**आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति**
**श्रुत्वाऽप्येन वेदन चैव कश्चित् ॥**

बापूजींकडे लोक आश्चर्यानें पाहतात, त्यांच्याविषयीं आश्चर्यानें बोलतात आणि आश्चर्यचकित होऊन त्यांच्या गोष्टी ऐकतात. पण असें असूनहि लोकांना त्यांची खरी ओळख झाली आहे काय ? तसें पाहिलें असतां आश्चर्य करण्यासारखें त्यांच्यांत कांहीं नाहीं. त्यांनीं आपली दिनचर्या, आहारविहार, निद्रा, व्यायाम वगैरे संपूर्ण जीवन इतकें नियमित, व्यवस्थित व संयमी केलें आहे, कीं शंभर वर्षेंच काय, त्याहीपेक्षां जास्त वर्षें ते जगतील, असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. १२५ वर्षें मला जगावयाचें आहे असें तें स्वतःच म्हणत आहेत.

## चमत्कारांचें युग संपलें नाहीं ✓ : ७ :

'बापूजींच्या बाबतींत चमत्कारांचें युग अजून गेलें नाहीं. आतां-पर्यंत त्यांनीं एकवीस दिवसांचे उपवास केले आहेत; परंतु आतांचा उपवास झालाच तर तो पूर्वींपेक्षां जास्त दीर्घ करण्याचा बापूजींचा विचार आहे. कदाचित् तो ४० दिवसांचाहि होईल. तो केवढाहि दीर्घ झाला, तरी बापूजींचें आयुष्य त्याहीपेक्षां दीर्घ आहे, हें नक्की.' —आश्रमांतील एक मित्र मला म्हणाले. खरें आहे त्यांचें हें म्हणणें.

कांहीं दिवसांपूर्वी आन्ध्रचे एक कार्यकर्ते बापूजींना भेटायला आले होते. मद्रासी लोकांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें बोलण्याचा त्यांचा अखंड प्रवाह चालला होता. बापूजींशीं बोलण्याचा ठरलेला वेळ संपल्याची जेव्हां श्रीमती खुर्शीदबेननीं त्यांना सूचना केली, त्या वेळीं ते थोडे बुचकळ्यांत पडले. 'मला अजून पुष्कळ सांगावयाचें आहे; माझें म्हणणें जर मीं बापूजींना पूर्ण सांगूं शकलों नाहीं, तर मग इतक्या दुरून येथें येण्याचा उपयोग काय ?' असें म्हणून त्यांनीं आणखी वेळ देण्याची बापूजींना विनंति केली.

'आतां नाहीं. सकाळ-संध्याकाळ फिरण्याच्या वेळीं देईन तुम्हाला वेळ.' बापूजी म्हणाले.

'माफ करा. पहांटे आपल्याबरोबर मला येतां येणार नाहीं. इतक्या पहांटे थंडींत उठणें माझ्याकडून होणार नाहीं.'—ते गृहस्थ म्हणाले.

## उघडया आकाशाखालीं झोंप : ८ :

मला आश्चर्य वाटलें. गृहस्थ चांगले धडधाकट दिसत होते. परंतु सकाळीं साडेसातला बापूजींबरोबर फिरायला जाण्याचें त्यांच्यांत

सामर्थ्य नव्हतें. आणि बापूजी ? आज ७५ वर्षांचें वय असून बरोबर पहांटे पांच वाजतां उठण्याच्या त्यांच्या नियमांत कधीं खंड पडलेला नाहीं. आज इतकी थंडी असूनदेखील ते उघड्यावर झोंपतात. आकाशाखालीं झोंपल्यामुळें मनुष्य निरोगी व दीर्घायु होतो व त्यामुळें दिवसभर काम करण्याचा त्याला उत्साहहि राहतो, असें बापूजी म्हणतात. आकाशांतील तारे पाहण्यांत त्यांना स्वर्गीय आनंद होतो. आणि ह्या आवडीमुळेंच खगोलशास्त्राचें आणि ताऱ्यांचें त्यांनीं पुष्कळ अध्ययन केलें आहे. सर्वांना हें ज्ञान आवश्यक आहे, असें त्यांना वाटतें. गांधीजींच्या नवशिक्षणक्रमांत अगदीं पहिल्या वर्षापासून मुलांना ताऱ्यांची माहिती व ओळख करून देण्याचा ह्यामुळेंच अंतर्भाव करण्यांत आला आहे.

## ऐन थंडींतही बाहेर निजविलें ! : ९ :

आजारी मनुष्याला उघड्या आकाशाखालीं झोंपण्याचा ते आग्रह करतात, आणि सकाळचें कोंवळें ऊन देखील त्यानें घ्यावें, असें ते म्हणतात. आश्रमांतील एक मुलगी अत्यंत आजारी होती. नोव्हेंबरच्या थंडींत तिला बाहेर झोंपविण्याला तिचे आईबाप धजत नव्हते. परंतु बापूजी थोडेच ऐकणार ? त्यांनीं त्या मुलीला बाहेर झोंपण्याला राजी केलें. नेहमींच्या त्यांच्या क्रमाप्रमाणें ते तिला सकाळीं फिरून आल्यानंतर भेटत व तिच्याशीं हास्यविनोद करीत. श्री. कनू गांधी यांचें लग्न तिला पाहतां यावें, म्हणून तिची खाट त्यांनीं मुद्दाम अशा ठिकाणीं ठेवली, कीं तेथून तिला ती मौज पाहतां यावी.

## पांजरपोळ ? : १० :

आजारी लोकांविषयीं त्यांचें आकर्षण अलौकिक आहे. 'कामये दु:खतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम्'—हें वर्णन त्यांच्या बाबतींत

शब्दशः लागू पडतें. आश्रमाची उत्पत्ति ह्या त्यांच्या आजाऱ्यांच्या कळवळ्यापासूनच झाली आहे. त्यांच्या माहितींतला कोणीहि मनुष्य आजारी आहे असें कळलें कीं तो कोठेंहि असो, त्याची विचारपूस केल्याशिवाय त्यांना चैन पडत नाहीं. आणि विशेष कांहीं असल्यास ते त्याला आपल्याजवळ बोलावून घेतात. आश्रमांत तुम्ही केव्हांहि जा, हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून प्रकृति सुधारण्यासाठीं आलेल्या कार्यकर्त्यांनीं आश्रम नेहमीं भरलेला आढळेल. सरदार वल्लभभाई आश्रमाला विनोदानें पांजरपोळ म्हणतात, तें खोटें नाहीं; आणि ह्यामुळेंच परचुरे शास्त्र्यांसारख्या महारोग्याला देखील बापूजींनीं आपल्याजवळ ठेवलें व त्यांची स्वतः सेवा केली.

## —कीं वेड्यांचें इस्पितळ? :११:

शारीरिक रोग्यांप्रमाणें मानसिक रोग्यांचेंहि बापूजी आश्रयस्थान आहेत. लोकांच्या दृष्टीनें विक्षिप्त दिसणारे अनेक लोक आश्रमांत राहून बापूजींच्या सहवासामुळें चांगले झाले आहेत. आणि म्हणूनच जमनालालजी आश्रमाला वेड्यांचें इस्पितळ म्हणत असत. आश्रमांत असलेल्या आजारी मनुष्यांची बापूजी किती काळजी घेतात, हें सांगतां येणार नाहीं. त्यांचें औषध, पाणी, खाणेंपिणें, झोंप, स्नान, शौच वगैरे एकूण एक गोष्टींकडे ते लक्ष देतात. गुजराथींत पित्याला 'बापूजी' म्हणतात. त्यामुळें महात्माजींचें बापूजी हें नांव सार्थ नाहीं काय? आश्रमांत काम करणारा सेवाग्राममधील एक गरीब म्हातारा मनुष्य आजारी असल्याचें बापूजींना कळलें. अंधारी रात्र होती, पाऊस खूप पडत होता व त्या मनुष्याला पहावयाला जायचें म्हणजे गांवांतील घाण तुडवीत जावें लागलें असतें. पण त्याची कांहीं एक पर्वा न करतां ते जायला निघाले होते.

## मित आहार, मित विहार : १२ :

बापूजींच्या आरोग्याची गुरुकिल्ली त्यांच्या संयमी जीवनांत आहे, हें मी सांगत होतों. तसें पाहिल्यास त्यांच्या शरीराचा बांधा मजबूत नाहीं. किरकोळ मनुष्यांत त्यांची गणना करावी लागेल. त्यांची उंची ५ फूट ४ इंच व वजन १०७ पौंडांच्या आसपास असतें. ते रात्रीं साधारणतः १० ते ५ म्हणजे ७ तास झोंप घेतात, व दुपारीं जेवणानंतर तासभर झोंपतात. विशेष काम असल्यास ते आपल्या झोंपेच्या वेळा बदलवतात. परंतु ठरलेल्या तासापेक्षां झोंप कमी झाल्यास इतर वेळीं झोंपून ते ती भरून काढण्याची दक्षता घेतात. सकाळीं साधारणतः आठ ते नऊ व संध्याकाळीं साडेसहा ते साडेसात एक एक तास रोज फिरण्याचा त्यांचा क्रम आहे, त्यांत ते कधीं खंड पडूं देत नाहींत. पाऊस असला, तर व्हरांडयांतल्या व्हरांडयांत फिरण्याचा आपला नियम ते पुरा करतात.

जेवण्यांत ते अत्यंत नियमित आहेत. त्यांचा आहार सामान्यतः असा असतो. दिवसांतून तीन पावशेर बकरीचें दूध व बारा औंस मुसंब्याचा रस. सकाळीं नास्ता म्हणून पांच तोळे गव्हाच्या रावेंत अडीच तोळे गूळ व दोनतीन लिंबें पिळून ते घेतात. दुपारीं बारा वाजतां पंधरा औंस भाजी, दीड औंस भात व लोणी हा त्यांचा आहार असतो. दुपारीं तीनच्या सुमारास अर्धा शेर उंसाचा रस, मधुमिश्रित पाणी किंवा असेंच दुसरें थंड पेय घेण्याचा त्यांचा परिपाठ आहे. संध्याकाळीं फक्त दूध व मुसंब्याचा रस ते घेतात.

वरील जेवणांत ऋतुमानाप्रमाणें थोडाबहुत फेरफार ते करतात, परंतु शरीराला आवश्यक असलेलें व मोजकें खाण्यावर त्यांचा अतिशय कटाक्ष आहे. ते आपलें अन्न सावकाश चावून खातात. ते गरम पाण्यानें स्नान करतात व तें करण्यापूर्वी सरसूच्या तेलानें

चांगली मालिश करून घेण्याचा त्यांचा नियम आहे. ह्या मालिशीमुळें त्यांचें शरीर नेहमीं अगदीं ताजें व तुकतुकीत दिसतें.

## अधिक काम करण्यासाठीं विश्रान्ति : १३ :

या संयमी जीवनामुळेंच ते इतक्या उतार वयांत देखील इतकें प्रचंड काम करूं शकतात. त्यांचा रोजचा पत्रव्यवहारच इतका मोठा आहे कीं हिंदुस्थान सरकारसारखें मोठें सेक्रेटरियट त्यांना लागावें. परंतु ११×१८ फूट मापाच्या छोट्याशा खोलींत हीं सर्व कामें ते सहज करतात व दोघां तिघांशिवाय जास्त लोकांची मदत घेण्याची त्यांना आवश्यकता भासत नाहीं. त्यांचा कार्याचा उरक पाहिला, म्हणजे मनुष्य आश्चर्यानें थक्क झाल्याशिवाय राहात नाहीं. वेळच्या वेळीं काम करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. ह्यामुळेंच ते आपली शक्ति इतकी टिकवूं शकले आहेत. पुष्कळ काम करण्याच्या मोहांत पडून शरीरप्रकृति बिघडवून घेणें ते पसंत करीत नाहींत. शरीर बिघडलें तर कांहींच काम होणार नाहीं, आणि म्हणूनच आपल्या शरीराची ते फार काळजी घेतात. मध्यें त्यांनीं एक महिन्याची विश्रान्ति घेतली, मौन पाळण्याचा नियम सोमवार पुरताच न ठेवतां सर्वकाळ कांहीं महिने चालू ठेवला, तें कशाकरतां ? आजच्यापेक्षांहि जास्त काम त्यांना आपल्या शरीराकडून करवून घ्यायचें आहे. त्यामुळेंच एखादा कंजुष मनुष्य एक एक पैसा शिल्लक टाकून ज्याप्रमाणें धनाचा संग्रह करतो, त्याप्रमाणें आपल्या शक्तीचा ते संग्रह करीत आहेत. ह्या संचित शक्तीमुळेंच आजपर्यंत लोकसेवेचें प्रचंड काम ते करूं शकले व ह्यामुळेंच ते पुढेंहि ह्यापेक्षां देखील भव्यतर काम करूं शकतील यांत शंका नाहीं.



# ९ कस्तुरबांची पतिपरायणता

## पति आणि धर्म :१:

कस्तुरबांचें व्यक्तित्व कांहीं वेगळेंच होतें. त्या करारी आणि आपल्या मताच्या पक्क्या होत्या. जुन्या स्त्रियांप्रमाणें धार्मिक संस्कार व सामाजिक रूढींना त्या चिकटून होत्या. पातिव्रत्य, पतिपरायणता, पतिसेवा हा जुन्या हिंदु स्त्रीचा सर्वांत प्रबल संस्कार कस्तुरबांतहि उत्कटतेनें वास करीत होता. आणि ह्यामुळेंच स्वतःला पसंत नसलेल्या अनेक गोष्टी पतिपरायणतेमुळें त्यांनीं स्वीकारल्या. पतिपरायणता व धर्मपरायणता ह्या दोन गोष्टी मुख्यतः त्यांच्यांत होत्या असें म्हणतां येईल.

## धगधगत्या चुलीपुढें :२:

सेवाग्राममध्यें असतांना 'बां'चें मुख्य काम बापूजींच्या भोजनाची व्यवस्था पाहण्याचें होतें. हें काम आपल्याला मिळावें म्हणून आश्रमांतील इतर स्त्रिया बांजवळ हट्ट घेत असल्या, तरी त्यांनीं तें आपल्याकडेच ठेवलें. कारण हिंदु स्त्रीचें पतीला स्वयंपाक करून घालणें हें धार्मिक कर्तव्यच आहे. कस्तुरबा थकल्या होत्या, तरी देखील त्यांनीं हें आपलें कर्तव्य सोडलें नाहीं. बापूजींच्या भोजनाची त्या नुसत्या व्यवस्थाच पाहत असें नव्हे, तर त्यांचें सर्व भोजन त्या स्वतः तयार करीत. फळांचा रस काढणें, फळें सोलून किंवा चिरून देणें, खाकरा, राब वगैरे तयार करणें, ह्या सर्व गोष्टी त्या जातीनें करीत. बिस्किटाप्रमाणें कडक आणि लाल होईपर्यंत भाजलेल्या गव्हाच्या चपातीला खाकरा म्हणतात. बापूजी खाकरा विशेष

पसंत करतात. आश्रमाच्या रसोडयांत धगधगत्या चुलीपुढें तास तास बसून त्या बापूजींचें भोजन तयार करीत. याशिवाय आश्रमाच्या स्वयंपाकांतहि त्या पुष्कळदां मदत करीत. हिंदु स्त्रींत असलेली स्वयंपाकाची आवड त्यांच्यांत शेवटपर्यंत होती.

## पंखा आणि विनोद : ३ :

हल्लीं बापूजी खोलींतच आपलें भोजन करतात. परंतु १९४२ पूर्वीं आश्रमाच्या इतर मंडळींबरोबर ते एकत्रच भोजन करीत असत. बापूजी जेवणाला येऊन बसले, म्हणजे बा त्यांच्याजवळ पंखा घेऊन बसत व त्यांना वाढण्याचें व वारा घालण्याचें काम करीत. जेवण्याचे पदार्थ कसे काय झाले आहेत, यासंबंधीं बापूजींचें त्यांच्याशीं मनोरंजक बोलणें होई. बापूजींना त्यांच्या हातचे पदार्थ आवडत, हें सांगायला नकोच; परंतु केव्हां केव्हां मुद्दामच ते—भाजी कच्चीच आहे, खाकरा करपलाच आहे—अशा तऱ्हेची टीका करीत. बा पण तितक्याच पक्क्या. त्यांना बापूजींचा हा मुद्दाम चिडविण्याचा स्वभाव माहीत असल्यामुळें त्या 'आज स्वयंपाक जास्त चांगला झाला आहे वाटतं?' म्हणून स्मित करीत. बापूजी आणि बा यांचा अशा तऱ्हेनें होणारा विनोद और असे.

## चले जाव ! : ४ :

बापूजी जेवायला बसले असतांना त्यांना पाहण्याला लोकांनीं यावें, हें बांना आवडत नसे. एकदां मध्य प्रांतांतील कांहीं प्रसिद्ध कार्यकर्ते सेवाग्रामला आले होते. बापूजी जेवायला बसले असल्यामुळें ते थोडे दूर उभे राहून त्यांच्याकडे पाहूं लागले. बांच्या दृष्टीला हें पडतांच 'चले जाव' म्हणून त्या जोरानें त्यांच्यावर ओरडल्या;

अर्थात् दर्शनेच्छु मंडळी त्यामुळें फार ओशाळली व त्यांना आपली चूक कळून आली.

## बांचा सत्यनारायण : ५ :

पतिदेवानंतर बांचें दुसरें पूजास्थान देवधर्म म्हणतां येईल. बांनीं आपल्याजवळ देव ठेवले होते व त्या रोज नियमानें गंधाक्षत-पुष्पांनीं धार्मिक विधीप्रमाणें देवपूजा करीत. मूर्तिपूजेचा बापूजींनीं निषेध केलेला नसला, तरी मूर्तिपूजा ते पसंत करीत नाहींत हेंहि तितकेंच खरें. ईश्वरप्रार्थनेवर त्यांची निष्ठा आहे व त्याचा अंगीकार त्यांनीं आपल्या जीवनांत केला व आश्रमांतहि तोच नियम त्यांनीं चालू केलेला आहे. परंतु असें असलें, तरी बांनीं आपली देवपूजा सोडली नव्हती. हिंदूंच्या धार्मिक विधींवर त्यांची अढळ श्रद्धा होती. आगाखान प्रासादांतील त्यांच्या शेवटच्या आजारांत आपल्याकरतां सत्यनारायण करण्याची इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली होती व त्याप्रमाणें सेवाग्राममध्यें सत्यनारायण करण्यांत आला होता. सेवाग्राम-मध्यें झालेला तो पहिला व शेवटचाच अपूर्व सत्यनारायण होय. सत्यनारायणाची कथा, आरति, प्रसाद वगैरे सर्व कांहीं अगदीं विधिवत् करण्यांत आलें होतें. प्राचीन धार्मिक विधींवर बांचा किती विश्वास होता, पूर्वीचे धार्मिक संस्कार त्यांच्या मनावर किती दृढ होते, हें यावरून दिसून येईल !

तसें पाहिल्यास आफ्रिकेंतील पाश्चात्य वातावरणांत त्या अनेक वर्षे होत्या व बापूजींबरोबर फिरतांना सर्व हिंदुस्थानांतील अनेक घराण्यांशीं त्यांचा संबंध आला होता. हें सर्व असून देखील आधुनिक पुरोगामी विचारांचा परिणाम त्यांच्यावर मुळींच झाला नव्हता, असें म्हटल्यास चालेल. त्या एकादशी आणि व्रतेंहि करीत. त्यांना

वाचनाची गोडी नव्हती; परंतु धर्मग्रंथ त्या नियमित वाचीत. बापूजीं-प्रमाणेंच तुलसीरामायणावर त्यांची श्रद्धा होती. आश्रमांतील एका हिंदीभाषी गृहस्थापाशीं त्या तुलसीरामायण वाचीत व त्याचा अर्थ समजून घेत.

## तुलसीरामायणाचें संस्करण : ६ :

धार्मिक ग्रंथावर बांची श्रद्धा असली, तरी त्या अगदीं अंधश्रद्ध नव्हत्या. बुद्धीला पटण्यासारख्या गोष्टी केवळ धर्मग्रंथांत सांगितल्या आहेत म्हणून मानायला त्या तयार नसत. स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति त्यांच्यांत होती व स्वतःला बरोबर वाटत नाहीं तें उघड बोलून दाखविण्याचें धैर्यहि त्यांच्यांत होतें. रामायणांतील अनेक अतिशयोक्तिपूर्ण वर्णनांवर त्यांचा विश्वास नव्हता व अशा गोष्टी उगीच कां वाचायच्या ?—असें त्या म्हणत. त्यांच्या ह्या आक्षेपामुळेंच बापूजींनीं आगाखान प्रासादांत बंदी असतांना तुलसी-रामायणांतील अनावश्यक भाग वगळून त्याचें नित्य पाठाकरितां एक संक्षिप्त संस्करण करण्याचें काम सुरू केलें होतें. वेळ नसल्यामुळें एक दोन कांडांपलीकडे तें जाऊं शकलें नाहीं, ही गोष्ट वेगळी.

## बापूजींची संन्यस्त वृत्ति : ७ :

बा ह्या कुटुंबवत्सल बाई होत्या. आपलीं मुलें, मुली, नातू, पणतू यांच्याकडे त्यांची स्वाभाविक ओढ होती. ह्या बाबतींत बापूजींची वृत्ति अगदीं भिन्न आहे. बापूजी अनासक्त आहेत. त्यांना आपलीं मुलें व दुसऱ्यांचीं मुलें सर्व समसमान आहेत. त्यांचें सर्वांवरच प्रेम आहे. सर्वांचीच काळजी त्यांना आहे. लहानपणापासूनच मुलांनीं

स्वावलंबी झालें पाहिजे, असें बापूजींचें म्हणणें आहे. तें त्यांनीं आपल्या मुलांनाहि तितकेंच लागू केलें आहे. त्यांनीं आपल्या मुलांना शिक्षण दिलें नाहीं, पैसा दिला नाहीं, किंवा त्यांचीं लग्नेंहि त्यांनीं करून दिलीं नाहींत. त्यांच्या मुलांनीं जें काय शिक्षण मिळविलें, तें सर्व त्यांनीं स्वावलंबनानें मिळविलें व आज जी काय त्यांचीं योग्यता आहे, ती त्यांनीं स्वतः प्राप्त करून घेतली आहे. आपल्या मुलांच्या लग्नासंबंधीं देखील बऱ्याचशा गोष्टी त्यांना माहित नाहींत.

## प्रांतभाषा व मातृभाषा : ८ :

श्री. देवदास गांधी हे एकदां सेवाग्रामला आले असतां बापूजीं-जवळ त्यांच्या घरगुती गोष्टी चालल्या होत्या. गांधी-कुटुंबांतील पुष्कळशीं लग्नें आंतरप्रांतीय आहेत. घरांत पितृभाषा आणि मातृभाषा वेगवेगळी असल्यामुळें मुलांशीं कोणत्या भाषेंत बोलावें, याचा विचार करावा लागतो, असें देवदासभाई बापूजींना सांगत होते. 'आम्हीं दिल्लींत रहात असल्यामुळें घरांत देखील गुजराथी किंवा तामिल न बोलतां आम्हीं हिंदीच बोलतों व त्यामुळें—आमच्या मुलांची मातृभाषा कोणती असें विचारल्यास आतां हिंदी म्हणूनच सांगावी लागेल,' असें देवदासभाई म्हणाले. बापूजींनीं त्यांना दुजोरा दिला. ज्या प्रांतांत रहावयाचें तेथील भाषा आपण स्वीकारली पाहिजे, असें बापूजींनीं त्यांना सांगितलें.

## लग्नानें हिंदी प्रचार ? : ९ :

हिंदीचा प्रश्न निघाला म्हणून बापूजींनीं देवदासभाईंना विचारलें— 'लग्न होण्यापूर्वी तूं आपल्या भावी पत्नीला मद्रासमध्यें असतांना

हिंदी शिकवीत होतास, तेव्हां तुझ्या घरांत हिंदीचें वातावरण निर्माण होण्याला अडचण नव्हतीच. मी तुला मद्रासमध्यें हिंदी प्रचार करण्यासाठीं पाठविलें, तें तूं उत्तम प्रकारें पार पाडलेंस यांत शंका नाहीं. स्वत:च्या लग्नानें देखील हिंदीचा प्रचार तूं केलासच कीं नाहीं?'— बापूजींच्या ह्या विनोदानें चांगलाच हंशा पिकला.

ह्यावर देवदास गांधी म्हणाले, 'लग्नापूर्वी मी राजाजींच्या मुलीला हिंदी शिकवीत होतों व ह्यामुळें आमच्या दोघांत प्रेम निर्माण होऊन त्याचें लग्नांत रूपांतर झालें अशी जी सर्वसाधारण समजूत आहे, ती बरोबर नाहीं. लग्नापूर्वी मी माझ्या पत्नीला मुळींच शिकवीत नव्हतों. मी राजाजींकडे जात होतों व त्यांच्या मुलीशीं माझी ओळख झाली होती ही गोष्ट वेगळी; परंतु मी तिला शिकवीत होतों, म्हणून नव्हे.'

अर्थात् बापूजींची देखील कल्पना होती कीं लग्नापूर्वी देवदास गांधी राजाजींच्या मुलीला हिंदी शिकवीत असावेत. सांगावयाचें हें कीं बापूजींमध्यें आपल्या कुटुंबांतील मुलें, नातू, पणतू वगैरेंकडे जी नैसर्गिक ओढ असते, ती नाहीं. त्यांच्या कुटुंबांतील एकहि व्यक्ति आज त्यांच्याजवळ नाहीं. त्यांचे चारी मुलगे स्वतंत्र असून आपआपलीं कामें करीत आहेत.

## जवळ राहूं नका, काम करा : १० :

बापूजींचा एक नियम लक्षांत ठेवण्यासारखा आहे. बापूजी आपल्याजवळ आश्रमांत मुलांमुलींना ठेवतात, त्यांचें आपल्या मताप्रमाणें योग्य शिक्षण करतात; पण हें सर्व तीं मोठीं होईतोंपर्यंतच. तीं स्वतंत्रपणें काम करूं शकतील अशीं झालीं कीं त्यांना ते कोणतें तरी विधायक कार्य करण्यासाठीं पाठवून देतात. चार पांच लोक, जे त्यांच्या खास कामाचे आहेत किंवा आजारी किंवा अपंग आहेत,

अशांनाच ते आपल्याजवळ ठेवतात. इतर ठिकाणीं काम करूं शकत असलेल्या लोकांनीं आपल्याजवळ राहिलेलें त्यांना मुळींच पसंत पडत नाहीं. ही गोष्ट त्यांनीं आपल्या मुलांनाहि लागू केली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

बापूजी सेवाग्रामचा आश्रम मोडणार, त्यांनीं आश्रमांतील लोकांना बाहेर जाण्याला सांगितलें—अशा तऱ्हेच्या बातम्या कांहीं दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांतून आल्या होत्या. ती खरी गोष्ट होती. त्यांनीं आश्रम मोडला नाहीं, तरी पण बाहेर काम करूं शकणाऱ्या सर्व लोकांना त्यांनीं भराभर कामाला पाठवून दिलें. आश्रमांत असलेल्या एका मुलीला त्यांनीं जायला सांगितलें, तेव्हां ती मुलगी म्हणाली, 'बापूजी, मला तर कांहींच येत नाहीं, मी बाहेर जाऊन करूं तरी काय?' तेव्हां बापूजींनीं तिला सांगितलें कीं तुला एक वर्षाची मुदत देतों, एक वर्षांत तूं कांहीं उपयोगी शिक्षण घे व मग आपल्या कामाला लाग.

बापूजी जेव्हां आपल्याजवळ राहणाऱ्या लोकांना अशा तऱ्हेनें जायला सांगतात, तेव्हां ते त्या लोकांना अत्यंत कठोर भासतात, यांत शंका नाहीं. परंतु बापूजी जितके मऊ तितकेच कठोरहि आहेत.

## विवाहितांना स्थान नाहीं : ११ :

आश्रमांतील तरुण-तरुणींचीं लग्नें झालीं कीं त्यांनीं स्वतंत्र कामाला लागावें, हा बापूजींचा कडक नियम आहे. लग्न झाल्यानंतर कोणीहि आश्रमांत राहूं शकत नाहीं. त्यांचे एक नातू लहानपणापासून बापूजींजवळ राहिले. बापूजींचा पत्रव्यवहार पाहणें, वगैरे कामें ते करीत. बापूजींच्या कामाचे ते होते. बापूजींचें त्यांच्यावर विशेष प्रेम होतें. असें असलें तरी लग्न होतांच बापूजींनीं त्यांना स्वतंत्र काम करण्याला सांगितलें. कुटुंबीयांच्या बाबतींत देखील बापूजींची ही

अशी अनासक्त वृत्ति आहे. परंतु याचा अर्थ बापूजींचें आपल्या नातलगांवर प्रेम नाहीं असें नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## बापूजींचा सहवास सोडला नाहीं : १२ :

बापूजींइतक्या बा आपल्या मुलांच्या बाबतींत अनासक्त नव्हत्या. आपलीं मुलें, सुना, नातवंडें वगैरे कुटुंबांतील लोकांकडे त्यांची ओढ असे. आपल्या हातच्या सुताच्या साड्या त्या आपल्या सुनांना पाठवीत, आणि असल्या प्रेमळ सासूच्या हातची साडी नेसण्यांत सुनांनाहि धन्यता वाटे, हें सांगायला का पाहिजे? आपल्या मुलां-सुनांजवळ राहण्याची त्यांची पुष्कळ इच्छा असली, तरी बापूजींना सोडून मुलांजवळ राहण्याचें त्यांनीं कधींहि पत्करलें नाहीं. त्यांनीं आपल्या मुलांजवळ राहण्याची इच्छा दर्शविली असती, तर बापूजींनीं त्यांना संमतिच दिली असती. त्यांच्या मुलांची तर विशेष इच्छा होती कीं बांनीं निदान या उतार वयांत तरी आपल्याजवळ येऊन रहावें. म्हातारपणांत ज्या कौटुंबिक प्रेमाची व सेवेची मनुष्याला आवश्यकता असते, ती आश्रमांत मिळणें शक्यच नव्हतें. पण असें असलें तरी बा अखेरपर्यंत बापूजींपाशींच राहिल्या. त्यांच्यापासून दूर राहणें त्यांनीं कधींहि स्वीकारलें नाहीं. बापूजी तुरुंगांत गेल्यानंतर बांना बाहेर राहणें शक्य होत नसे, त्यामुळें त्या बापूजींबरोबर प्रत्येक वेळीं तुरुंगांत गेल्या व तुरुंगांत देखील त्यांनीं बापूजींचा सहवास सोडला नाहीं. बा खऱ्या पतिव्रता होत्या.

## प्रेमाची भेट : १३ :

बापूजींप्रमाणेंच बांजवळ देखील स्वतःचें असें फारसें कांहीं नव्हतें; तरी पण त्यांच्याजवळ लहानमोठ्या पुष्कळशा वस्तु जमत.

बा आपल्या मुलांमुलींना व आश्रमांतील आवडत्या लोकांना त्या वांटून देत. आगाखान राजवाड्यांतून सुटल्यानंतर सेवाग्रामला बापूजी आले, तेव्हां आश्रमांत बांच्या ज्या पेट्या होत्या, त्या त्यांच्या सुनांनीं उघडल्या, त्यांत पुष्कळशा साड्या, बांगड्या व कांचेच्या वाट्या व प्याले वगैरे वस्तु निघाल्या. अर्थात् बांचा प्रसाद म्हणून बांच्या कुटुंबीयांनीं त्या वांटून घेतल्या व इतरांनाहि दिल्या. आम्हांलाहि त्यांतील दोन कांचेच्या वाट्या मिळाल्या, त्या आमच्याजवळ अद्याप-पर्यंत आहेत.

मरणापूर्वी आपल्या कुटुंबांतील मंडळींना पाहण्याची बांची इच्छा होती. आपल्या मुलांच्या व आप्तस्वकीयांच्या भेटीकरितां त्यांनीं दोन-तीन दिवस प्राण ठेवला होता, असें सांगतात. खरें म्हणजे मृत्यु झाला त्याच्या दोन तीन दिवस आधींच त्यांचे प्राण निघून जायचे.

## सेवाग्रामची ओढ : १४ :

कुटुंबांच्या ओढीप्रमाणेंच सेवाग्रामची ओढहि बांना विशेष होती. सेवाग्रामला येऊन आपण देह ठेवावा ही त्यांची अखेरची इच्छा होती. खरें म्हणजे काशी किंवा प्रयागसारख्या पुण्यक्षेत्रीं गंगेच्या पवित्र तीरावर देह ठेवण्याची बांनीं इच्छा ठेवावी, कारण त्या तशाच धार्मिक होत्या. त्यांच्या मनावरील धार्मिक संस्कार जुन्या पद्धतीचे होते. परंतु काशी-प्रयागऐवजीं त्यांनीं सेवाग्रामला देह ठेवण्याची इच्छा प्रदर्शित केली ! सेवाग्रामवरील त्यांचें हें प्रेम अलौकिक नाहीं काय ? त्यांच्या मृत्यूची वार्ता सेवाग्रामला समजली, तेव्हांचें दृश्य अजूनही माझ्या डोळ्यांपुढें आहे. तालिमी संघांत वार्षिक उत्सवा-निमित्त नाटकाची तयारी चालली होती. नाटक सुरू होण्याला थोडाच अवकाश होता. अशा वेळीं बांच्या मृत्यूची बातमी आम्हांला समजली.

होती. ब्रांच्या ह्या चहापानामुळें आश्रमांत येणाऱ्या चहाबाजांची आयतीच सोय होत असे. बांच्या कुटींत स्टोव्हचा आवाज ऐकला कीं ही मंडळी बांच्याजवळ उपस्थित होत. अर्थात् बांच्या-विशेष परिचयाच्या स्त्री-पुरुषांनाच हा लाभ मिळत असे. बांचा स्वभाव कडक असल्यामुळें अनोळखी माणसाला सहसा बांच्याजवळ जाण्याची हिंमत होत नसे.

## मिरची, मसाले व तळीव पदार्थ : २ :

मिरची, मसाले, तळीव पदार्थ वगैरेंच्या बाबतींतहि कस्तुरबांनीं आपलें स्वातंत्र्य राखून ठेवलें होतें. आश्रमामध्यें सर्व अन्न निव्वळ उकडलेलें व अमिश्र तयार करण्यांत येतें. अन्नाला कृत्रिम स्वाद निर्माण केल्यामुळें जिभेचा संयम पाळला जात नाहीं व त्यामुळें मनुष्य आवश्यकतेपेक्षां जास्त अन्न खातो, त्याचप्रमाणें कृत्रिम स्वाद निर्माण केलेलें अन्न पचनालाहि कठीण असतें, हा सर्वसामान्य सिद्धांत आहे. ब्रह्मचर्य पालनाकरतां व विकारांवर ताबा मिळविण्याकरतां अस्वाद व्रताचें पालन बापूजींनीं आश्रमाच्या व्रतांत दाखल केलें आहे. आणि म्हणूनच आश्रमांतील अन्न अत्यंत साधें ठेवण्यांत आलें आहे. भाजी फक्त उकडलेली असते; त्यांत तिखट, मीठ, मसाला वगैरे मुळींच नसतो. डाळ फक्त शिजवलेली असते. तिच्यांत हळद देखील टाकण्यांत येत नाहीं. कोणताहि पदार्थ तळणें किंवा कोणत्याहि पदार्थाला फोडणी देणें आश्रमांत वर्ज्य आहे. ह्यामुळें आश्रमाचें जेवण बाहेरून येणाऱ्या मंडळींना अगदींच अळणी वाटतें. मीठ वरून घेण्याला बापूजींनीं मोकळीक ठेवली आहे, पण त्यांनीं स्वत: मात्र मीठ सोडलेलें आहे. बांना आश्रमाचें हें अळणी जेवण फारसें आवडत नसे. त्या मनांत येईल तेव्हां आपल्याला आवडतील ते पदार्थ स्वत: करून घेत, व ह्या बाबतींत कोणाचीहि भीड ठेवीत नसत.

## आश्रमांतील कडक शिस्त : ३ :

बापूजी नियमपालनाच्या बाबतींत अत्यंत कडक आहेत. आश्रमाच्या नियमांचें थोडेंसें उल्लंघन देखिल ते सहन करूं शकत नाहींत. ह्यामुळें आश्रमांतील लहानांपासून थोरांपर्यंत सर्व लोक व्रतनियमांच्या पालनाची अत्यंत दक्षता बाळगतात. बापूजी कोणावर कधीं रागावत नाहींत किंवा शिक्षाहि करीत नाहींत; परंतु त्यांच्या नापसंतीचा दृष्टिपात मोठमोठ्या शिक्षांपेक्षांहि अधिक प्रभावशाली असतो.

एकदां आश्रमांतील एक दोन लहान मुलींनीं आश्रमांतील एका कार्यकर्त्याच्या घरीं दुपारच्या वेळेस तळलेलीं भजीं, शिरा वगैरे पदार्थ खाल्ले. ही गोष्ट बापूजींच्या कानांवर गेली. आश्रमाच्या नियमाविरुद्ध वर्तन केल्यामुळें त्या मुली आधींच घाबरून गेल्या होत्या. त्यामुळें बापूजींनीं त्यांना जेव्हां विचारलें कीं ‘ तुम्हीं भजीं आणि शिरा खाल्ला काय ? ’ तेव्हां स्वतःचा बचाव करण्याच्या दृष्टीनें आम्हीं कांहीं खाल्लेंच नाहीं, असें त्यांनीं खोटेंच सांगून टाकलें !

आश्रमांत असतांना दुसऱ्यांकडे न खाण्याचा नियम त्यांनीं मोडला होता. सकाळ, दुपार व संध्याकाळ या तीन वेळांशिवाय इतर वेळीं कांहींहि खावयाचें नाहीं, ह्या नियमाचाही त्यांनीं भंग केला होता. तळलेले मसालेदार खाद्यपदार्थ आश्रमांत निषिद्ध असतां त्यांचाही त्यांनीं स्वीकार केला होता आणि ह्यावरहि कळस म्हणजे खोटें बोलण्याचें महापाप त्यांनीं केलें होतें. ह्यामुळें बापूजींना अत्यंत दुःख झालें. त्या मुली फारशा मोठ्या नव्हत्या व भीतीमुळेंच त्या खोटें बोलल्या हें जरीं खरें, तरी स्वतःजवळ राहणाऱ्या मुलींनीं खोटें बोलावें, ह्याचें प्रायश्चित्त म्हणून बापूजींनीं दोन दिवस उपवास केला. आपल्या दोषामुळें बापूजींना केव्हां दुःख होईल, ही भीति

कार्यक्रम रहित झाला. सेवाग्रामचे सर्व लोक बांच्या झोपडीसमोर जमले. त्या झोपडींत बा आतां पुन्हां कधींच येणार नव्हत्या ! प्रार्थना झाली, आणि आम्हीं शून्य अंतःकरणानें परत फिरलों. बा असतांना ज्या झोपडींत स्त्रियांचा नेहमीं गजबजाट असायचा, तरुण मुलींच्या वर्दळीनें जी नेहमीं दुमदुमून जायची व धूपदीपांच्या सुवासानें आश्रमाचा सारा परिसर जी सुगंधित करीत असे, ती बांची झोपडी आतां शून्य झाली होती ! जिथें अनेक जिवंत इतिहास घडले होते, ती आतां मृत इतिहासाचा एक अवशेष झाली होती.

---



# १० चहा, कॉफी आणि मुलें

## चहाबाजांची सोय ! : १ :

आचार आणि विचार यांत स्वातंत्र्य राखणें हा बांच्या व्यक्तित्वाचा विशेष गुण म्हणतां येईल.

बापूजी चहाच्या किती विरुद्ध आहेत, हें नव्यानें सांगायला नकोच. चहामुळें राष्ट्राचें आरोग्य खालावत आहे, असें ते म्हणतात; आणि म्हणूनच आश्रमांत चहा निषिद्ध मानला जातो. परंतु चहाची ही बंदी कस्तूरबा पाळीत नसत. चहा किंवा कॉफी घेण्याची त्यांना संवय

होती. यांच्या ह्या चहापानामुळें आश्रमांत येणाऱ्या चहाबाजांची आयतीच सोय होत असे. यांच्या कुटींत स्टोव्हचा आवाज ऐकला कीं ही मंडळी यांच्याजवळ उपस्थित होत. अर्थात् यांच्या–विशेष परिचयाच्या स्त्री-पुरुषांनाच हा लाभ मिळत असे. यांचा स्वभाव कडक असल्यामुळें अनोळखी माणसाला सहसा यांच्याजवळ जाण्याची हिंमत होत नसे.

## मिरची, मसाले व तळीव पदार्थ : २ :

मिरची, मसाले, तळीव पदार्थ वगैरेंच्या बाबतींतहि कस्तुरबांनीं आपलें स्वातंत्र्य राखून ठेवलें होतें. आश्रमामध्यें सर्व अन्न निव्वळ उकडलेलें व अमिश्र तयार करण्यांत येतें. अन्नाला कृत्रिम स्वाद निर्माण केल्यामुळें जिभेचा संयम पाळला जात नाहीं व त्यामुळें मनुष्य आवश्यकतेपेक्षां जास्त अन्न खातो, त्याचप्रमाणें कृत्रिम स्वाद निर्माण केलेलें अन्न पचनालाहि कठीण असतें, हा सर्वसामान्य सिद्धांत आहे. ब्रह्मचर्य पालनाकरतां व विकारांवर ताबा मिळविण्याकरतां अस्वाद व्रताचें पालन बापूजींनीं आश्रमाच्या व्रतांत दाखल केलें आहे. आणि म्हणूनच आश्रमांतील अन्न अत्यंत साधें ठेवण्यांत आलें आहे. भाजी फक्त उकडलेली असते; त्यांत तिखट, मीठ, मसाला वगैरें मुळींच नसतो. डाळ फक्त शिजवलेली असते. तिच्यांत हळद देखील टाकण्यांत येत नाहीं. कोणताहि पदार्थ तळणें किंवा कोणत्याहि पदार्थाला फोडणी देणें आश्रमांत वर्ज्य आहे. ह्यामुळें आश्रमाचें जेवण बाहेरून येणाऱ्या मंडळींना अगदींच अळणी वाटतें. मीठ वरून घेण्याला बापूजींनीं मोकळीक ठेवली आहे, पण त्यांनीं स्वत: मात्र मीठ सोडलेलें आहे. यांना आश्रमाचें हें अळणी जेवण फारसें आवडत नसे. त्या मनांत येईल तेव्हां आपल्याला आवडतील ते पदार्थ स्वत: करून घेत, व ह्या बाबतींत कोणाचीहि भीड ठेवीत नसत.

## आश्रमांतील कडक शिस्त ✓ : ३ :

बापूजी नियमपालनाच्या बाबतींत अत्यंत कडक आहेत. आश्रमाच्या नियमांचें थोडेंसें उल्लंघन देखिल ते सहन करूं शकत नाहींत. ह्यामुळें आश्रमांतील लहानांपासून थोरांपर्यंत सर्व लोक व्रतनियमांच्या पालनाची अत्यंत दक्षता बाळगतात. बापूजी कोणावर कधीं रागावत नाहींत किंवा शिक्षाहि करीत नाहींत; परंतु त्यांच्या नापसंतीचा दृष्टिपात मोठमोठ्या शिक्षांपेक्षांहि अधिक प्रभावशाली असतो.

एकदां आश्रमांतील एक दोन लहान मुलींनीं आश्रमांतील एका कार्यकर्त्याच्या घरीं दुपारच्या वेळेस तळलेलीं भजीं, शिरा वगैरे पदार्थ खाल्ले. ही गोष्ट बापूजींच्या कानांवर गेली. आश्रमाच्या नियमाविरुद्ध वर्तन केल्यामुळें त्या मुली आधींच घाबरून गेल्या होत्या. त्यामुळें बापूजींनीं त्यांना जेव्हां विचारलें कीं ' तुम्हीं भजीं आणि शिरा खाल्ला काय ? ' तेव्हां स्वतःचा बचाव करण्याच्या दृष्टीनें आम्हीं कांहीं खाल्लेंच नाहीं, असें त्यांनीं खोटेंच सांगून टाकलें !

आश्रमांत असतांना दुसऱ्यांकडे न खाण्याचा नियम त्यांनीं मोडला होता. सकाळ, दुपार व संध्याकाळ या तीन वेळांशिवाय इतर वेळीं कांहींहि खावयाचें नाहीं, ह्या नियमाचाही त्यांनीं भंग केला होता. तळलेले मसालेदार खाद्यपदार्थ आश्रमांत निषिद्ध असतां त्यांचाही त्यांनीं स्वीकार केला होता आणि ह्यावरहि कळस म्हणजे खोटें बोलण्याचें महापाप त्यांनीं केलें होतें. ह्यामुळें बापूजींना अत्यंत दुःख झालें. त्या मुली फारशा मोठ्या नव्हत्या व भीतीमुळेंच त्या खोटें बोलल्या हें जरीं खरें, तरी स्वतःजवळ राहणाऱ्या मुलींनीं खोटें बोलावें, ह्याचें प्रायश्चित्त म्हणून बापूजींनीं दोन दिवस उपवास केला. आपल्या दोषामुळें बापूजींना केव्हां दुःख होईल, ही भीति

आश्रमवासीयांत सदैव जागृत असल्यामुळें ते अत्यंत दक्षतेनें वागतात. बापूजींच्या अहिंसेचा हा विजय म्हणतां येईल.

## जो चा नहीं पीता वह आदमी नहीं : ४ :


ह्या घटनेनंतर महाकोशलचे प्रसिद्ध पुढारी पं. रविशंकर शुक्ल हे सेवाग्रामला एकदां आले होते. तालिमी संघांत आर्यनायकम्‌जीकडे त्यांचा चहा-फराळ चालला असतां मी भेटायला गेलों. नायकम्‌जींनीं माझ्यापुढें चहाचा कप केला. नुकताच चहा घेऊन आलेलों असल्यामुळें मीं तो घेतला नाहीं. तेव्हां शुक्लजी म्हणाले, 'बापूजी उपवास करेंगे, इसलिए नहीं लेते क्या? तुमने चा लिया, तो हम बापूजीको कहनेवाले नहीं हैं।'

मी त्यांना म्हणालों, 'मला चहा घ्यायला कांहींच हरकत नाहीं; कारण एक तर मी आश्रमांत रहात नाहीं, माझें स्वतंत्र घर आहे... और आपने ही तो मुझे चा पिलाना शुरु किया, जो चा नहीं पीता, वह आदमी नहीं; ऐसा आप मानते है, फिर मैं चा क्यों न लूं?'

## नायकम्‌जीकडील चहाची बैठक : ५ :

रविशंकर शुक्ल हे चहाचे मोठे भोक्ते आहेत. त्यांचा चहाचा थाटही तसाच भव्य असतो. मूल्यवान कपबशांतून राजकारणाची आवेशयुक्त चर्चा करीत चहा पिणें, हा त्यांचा रोजचा कार्यक्रम. १९३५ मध्यें रायपूरला प्रथमच मी त्यांच्याकडे गेलों असतां त्यांनीं मला जवळजवळ बळजबरीनेंच चहाची दीक्षा दिली, असें म्हणतां येईल. शुक्लजींप्रमाणेंच आर्यनायकम् हेहि चहाचे मोठे रसिक

आहेत. सेवाग्राममध्यें येणाऱ्या चहाभक्त पुढाऱ्यांचें नायकम्‌जींचें ऑफिस म्हणजे एक विश्रांति स्थानच झालें आहे. तेथें चहाच्या लज्जतदार स्वादाबरोबरच हास्यविनोदाला येणारा बहर कांहीं और असतो. मौलाना आझाद, पंडित जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपालानी वगैरे बड्या बड्या मंडळींची मनोरंजक चर्चा ऐकावयाची झाल्यास नायकम्‌जीकडील चहाची बैठक मोठी नामी संधि असे.



## दुसऱ्यांच्या संवयीविषयीं सहिष्णुता : ६ :

मध्येंच हें चहा-प्रकरण सांगण्याचें कारण एवढेंच कीं बापूजी स्वत:च्या व आश्रमच्या बाबतींत कितीही कडक असले; तरी इतरांच्या बाबतींत ते सहिष्णु आहेत. आपणाकडे येणाऱ्या पाहुण्यांचें उत्तम प्रकारें आदरातिथ्य करण्यांत कसूर न करण्याचें ते आपल्या लोकांना सांगून ठेवतात व स्वतःहि त्यांची विचारपूस करतात. त्यांच्या चहापानाची व धूम्रपानाची देखील व्यवस्था झाली कीं नाहीं, याकडे ते जातीनें लक्ष घालतात. एवढेंच नव्हे, कोणी मांसाहारी

असेल, तर त्याच्या मांसाहाराची व्यवस्थाही ते करून देतात. ह्या त्यांच्या सहिष्णुतेमुळेंच अत्यंत विरोधी मतें राखणारे लोक देखील त्यांचें घनिष्ठ मित्र झाले आहेत.

## आचारविचाराचें स्वातंत्र्य : ७ :

आजारी आणि वृद्ध लोकांना खाण्यापिण्याचे व इतर आश्रमीय नियम बापूजी लागू करीत नाहींत. कस्तुरबांची गणना त्यांनीं आजारी वृद्ध लोकांत केली होती, असें वाटतें. बांची प्रकृति विशेष चांगली कधींच राहात नसे व त्यांच्यावर बापूजींपेक्षां वार्धक्याची छाया किती तरी जास्त होती. त्यामुळेंच कीं काय बापूजींनीं त्यांना आश्रमाच्या शिस्तींतून मुक्त केलें होतें. बापूजी सत्य-अहिंसेचे पुरस्कर्ते असल्या-मुळें ते आपली शिस्त कोणावर कधींच लादत नाहींत. माझें म्हणणें पटत असेल तर करा, नाहीं तर तुम्हीं आपल्या मताप्रमाणें वागू शकतां, असेंच ते कोणालाहि सांगतील. त्यामुळें जी गोष्ट कस्तुरबांना पटत नव्हती ती न करण्याचें स्वातंत्र्य बापूजींनीं त्यांना दिलें असलें, तर त्यांच्या सिद्धांताला तें अनुसरूनच होतें, हें उघड आहे. बांचा ह्या विचार-भेद वैयक्तिक बाबीपुरताच होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सार्वजनिक आणि राजकीय बाबतींत त्यांनीं बापूजींच्या पावलावर पाऊल टाकून काम केलें आहे.

## स्पृश्यांचा आश्रमावर बहिष्कार : ८ :

बांचे जुने धार्मिक संस्कार पाहिले म्हणजे अस्पृश्यतेच्या बाबतींत त्यांनीं दाखविलेलें मनोधैर्य प्रशंसनीय म्हणावें लागेल. आश्रमांत जातिभेद किंवा धर्मभेद पहिल्यापासूनच पाळण्यांत येत नाहींत. येथें स्पृश्यास्पृश्य, ख्रिस्ती, मुसलमान वगैरे अनेक जातींचे लोक येतजात

असतात. त्यांचें जेवणखाण सर्व एकत्रच असतें. सेवाग्राम आश्रमांत बहुतेक सर्व नोकर अस्पृश्य आहेत. स्वयंपाक करणें, पाणी भरणें वगैरे सर्व कामांकरितां आश्रमांत अस्पृश्य नोकरच ठेवले आहेत. शक्य तोंवर अस्पृश्यांनाच कामें देण्याचें बापूजींचें धोरण आहे. आश्रमांत अस्पृश्य काम करीत असल्यामुळें सेवाग्राममधील स्पृश्यांनीं सुरुवातीला आश्रमावर पूर्ण बहिष्कार टाकला होता. सेवाग्राममधील स्पृश्य जातींचा एक मनुष्य देखील आश्रमांत काम करण्याला तयार नव्हता. आश्रमाच्या लोकांना केंस कापावयाचे असल्यास एक तर स्वतःच कापून घ्यावे लागत, किंवा त्याकरितां वर्ध्याला तरी जावें लागे. कारण सेवाग्रामचे न्हावी आश्रमच्या लोकांचे केंस कापीत नसत. आश्रमाच्या लोकांचे केंस देखील असे अपवित्र समजले जात होते.

आज ही स्थिति राहिली नाहीं. ग्रामवासीयांची अस्पृश्यतेची भावना आतां पुष्कळच पुसट झाली आहे. महारांच्या स्पर्शाचा आतां त्यांना विटाळ होईनासा झाला आहे व पाटलांच्या मुलांना महारांच्या मुलांच्या मांडीशीं मांडी लावून जेवतांना आतां विशेषसें कांहीं वाटत नाहीं. बापूजी आल्यामुळें सेवाग्राममध्यें हें स्थित्यंतर घडून आलें आहे.

स्पृश्यास्पृश्यतेची भावना बांमध्यें राहिली नव्हती. सेवाग्रामला असतांना त्यांनीं महार मोलकरीणच आपल्याजवळ ठेवली होती व अस्पृश्यांच्या हातचें अन्नपाणी घेण्यालाहि त्यांना मुळींच संकोच वाटत नसे. असें असलें तरी ब्राह्मणांच्या बाबतींत असलेली पूज्यभावना त्यांची गेलेली नव्हती. आगाखान प्रासादांत असतांना पाहाऱ्यावर असणारे पोलिस बापूजींच्या स्वयंपाक–पाणी वगैरे कामांतहि मदत करीत. ह्या पोलिसांत कांहीं ब्राह्मणहि होते. बा त्यांना विशेष अगत्यानें वागवीत व फळें वगैरेहि त्यांना देत.

## लहान मुलांची आवड : ९ :

बापूजींप्रमाणेंच यांनाहि लहान मुलांची विशेष आवड होती. रामदास गांधींचा मुलगा कान्हा याला त्यांनीं आपल्याजवळ ठेवून घेतलें होतें. कान्हा हा लहानपणापासूनच अत्यंत खोडकर मुलगा आहे. त्याला सांभाळण्यांत यांचा पुष्कळसा वेळ जात असे. बापूजींचा तो खेळगडीच होता. ते त्याच्याबरोबर घोडा घोडा खेळत व पळत. बापूजींचें लहान मुलांवर प्रेम कांहीं अद्भुत आहे. लहान मुलांत ते मुलापेक्षांहि मूल होतात आणि ह्यामुळेंच आश्रमांत कोणीहि नवीन मूल आलें कीं तें एकदोन दिवसांतच बापूजींचें दोस्त झाल्याशिवाय राहात नाहीं. बापूजी सकाळ-संध्याकाळ फिरायला निघाले कीं मुलांचा घोळका त्यांच्याभोंवतीं जमलाच समजा. मग कोणी त्यांची काठी घेतो, तर कोणी त्यांना आपल्या येथें आज काय काय खाण्याला केलें तें सांगतो, तर कोणी आपलें आणि दुसऱ्या मुलाचें कसें भांडण झालें त्याचें वर्णन करतो. बापूजीहि त्यांच्या ह्या गोष्टींत लहान मुलाप्रमाणें भाग घेतात.

## बापूजींशीं कट्टी : १० :

एकदां संध्याकाळच्या प्रार्थनेंत ३-४ वर्षांचा आश्रमांतील एक मुलगा बापूजींना म्हणाला, 'बापूजी, तुम्ही त्या बच्चूशीं बोलतां म्हणून मी तुमच्याशीं कट्टी केली आहे. तो बच्चू वाईट मुलगा आहे. त्यानें मला आपल्या खेळांत घेतलें नाहीं. तुम्हीं त्याच्याशीं बोलतां म्हणून मी तुमच्याशीं आतां मुळींच बोलणार नाहीं.'

यावर 'तूं माझ्याशीं कट्टी केलीस तर मग बोलतोस कसा ?'–असें बापूजींनीं म्हटल्याबरोबर एकच हंशा पिकला.

एकदां महिलाश्रमांतील एक बाई आपल्या एक दीड वर्षाच्या मुलीला घेऊन बापूजींकडे आल्या होत्या. बापूजींनीं तिच्याकडे पाहिलें, तेव्हां त्या मुलीनें आपलें तोंड मागें फिरविलें, 'अरे वा! मला पाहून तोंड मागें फिरवतेस काय?' असें म्हणून बापूजी तिच्या आईच्या मागें जाऊन त्या मुलीला तोंड वेडेंवाकडें करून दाखवूं लागले. त्या मुलीनेंहि आपली जीभ बाहेर काढून बापूजींना वांकुल्या दाखविण्याला सुरुवात केली. बापूजीहि तिला जीभ बाहेर काढून, नाक वर करून व दांत दाखवून वांकुल्या दाखवूं लागले. तीन चार मिनिटें बापूजी ह्या मुलीशीं खेळत होते आणि तें पाहून जवळच्या मंडळींची हंसून हंसून मुरकुंडी वळत होती.

## बापूजींचे कान धरले : ११ :

आजकाल प्यारेलालजींची दोन वर्षांची पुतणी बापूजींची खेळगडी आहे. प्रार्थनेच्या वेळीं बापूजी येण्याच्या आधीं त्यांच्या आसनावर ती विराजमान होते व बापूजी आले तरी तेथून उठत नाहीं. त्यांच्या मांडीवर बसून त्यांचे नाक-कान ओढण्यालाहि ती कमी करीत नाहीं व बापूजीही मोठ्या आनंदानें आपले कान तिच्या हातांत देतात. हिमालयाएवढ्या चुका बापूजींनीं केल्या आहेत, आणि त्याकरितां त्यांना चांगलें शासन केलें पाहिजे, असें म्हणणारे बरेच लोक आहेत. ह्या लोकांना हें ऐकून समाधान मिळेल कीं बापूजींचे कान उपटणारी एक व्यक्ति आश्रमांत आहे!

लहान मुलांशीं खेळण्यांत व हास्यविनोद करण्यांतच बापूजी रमतात एवढेंच नाहीं, लहान मुलांना जेवूं घालण्यांतहि त्यांना आनंद होतो. एकदां त्यांनीं आश्रमांतील सर्व लहान मुलांना स्वत: बरोबर घेऊन जेवण्याचें सुरू केलें होतें. जेवण्याची घंटा झाली कीं सर्व मुलें

आपली ताट-वाटी घेऊन उड्या मारीतच बापूजींच्या खोलींत जात व बापूजींशीं हास्य-विनोद करीत त्यांचें जेवण चालत असे. मुलांना मुख्यतः ते लोणी, दूध आणि फळें देत. तसें सर्वच लोकांच्या आहाराकडे बापूजींचें लक्ष आहे, पण त्यांतल्या त्यांत आजारी व लहान मुलें यांच्या आहाराकडे ते विशेष लक्ष देत असतात. मुलांच्या आहाराच्या बाबतींत कंजूषपणा केलेला त्यांना पसंत पडत नाहीं.

# ११ आहारांतील अभिनव प्रयोग

## बापूजी भोंवळ येऊन पडले ! : १ :

आहारासंबंधीं प्रयोग करणें हा बापूजींचा अत्यंत आवडता विषय आहे. आश्रम म्हणजे त्यांची आहारशास्त्राची एक प्रयोगशाळाच आहे म्हणाना ! येथें नेहमीं आहाराचे प्रयोग चाललेले तुम्हांला आढळून येतील. आश्रमाला त्यांनीं आहारशास्त्राची प्रयोगशाळा बनविलें आहे, हें कांहींच नाहीं. त्यांचें स्वतःचें शरीर देखील आहारशास्त्राची टेस्टटयूब आहे, असें म्हणतां येईल.

कांहीं दिवसांपूर्वींची गोष्ट आहे. सकाळीं मालिश करून घेतल्यानंतर ते स्नानाला जात असतां भोंवळ येऊन पडले. हा अशक्तपणा येण्याचें कारण, त्यांच्या आहाराचा एक प्रयोगच होता. आश्रमांत नुकतेच एक वैद्यराज आले होते. बिर्लांनीं त्यांना मुद्दाम बापूजींकडे पाठविलें होतें. त्यांनीं बदामाचा शिरा व इतर कांहीं गोष्टींचा खुराक घेण्याचें बापूजींना सांगितलें. अमुक एक औषध घ्या, असें बापूजींना कोणी सांगितल्यास तें करण्याला एक पायावर ते तयार होतील. वैद्यराजांना त्यांनीं लगेच संमति दिली व वैद्यराजांनींहि बापूजींवर आपला प्रयोग सुरू केला. परंतु बापूजींना त्यापासून शक्ति न मिळतां अशक्तता मात्र अधिक आली व त्याचें पर्यवसान त्यांना भोंवळ येण्यांत झालें. बापूजींना भोंवळ आली हें समजतांच आश्रमांत एकच धांदल उडाली; जो तो बापूजी जेथें होते, तेथें धांवत सुटला. परंतु बापूजी लगेच सावध झाले, त्यामुळें विशेष कांहीं घडलें नाहीं.

## शरीर, एक प्रयोगशाळा : २ :

ही घटना झाल्यानंतर चर्चा निघाली असतां आश्रमांतील एक गृहस्थ म्हणाले, ‘ वाटेल त्याला बापूजी आपल्या शरीरावर प्रयोग करूं

देतात, हें कांहीं ठीक नाहीं. ह्या वैद्य आणि डॉक्टरांनीं बापूजींच्या शरीराला जणूं काय आपल्या प्रयोगाची शाळाच करून ठेवलें आहे. त्यांच्यापायीं बापूजींच्या जिवाला धोका झाला, तर देशाचें केवढें नुकसान होईल, याचीहि ह्या लोकांना कल्पना नाहीं. बापूजींवर प्रयोग करतांना यांना भीति कशी वाटत नाहीं, याचेंच आश्चर्य वाटतें.'

त्यांचें म्हणणें अर्थातच बरोबर होतें. शरीर सुदृढ आणि तरुण असतांना त्यांनीं आपल्या शरीरावर प्रयोग करावेत किंवा करूं द्यावेत, हें ठीक आहे; परंतु पंचाहत्तर वर्षांच्या वयांत क्षीण शरीरावर प्रयोग करूं देणें केव्हांहि योग्य होणार नाहीं, हें उघड आहे. बापूजींना हें समजत नाहीं, असें नव्हे; परंतु त्यांची ती संवय कशी जाणार? आणि तुम्ही तसें म्हणालांतच तर ते म्हणतील, 'शरीर हें ईश्वरानें प्रयोगाकरितांच दिलें आहे, ह्याकरतां त्याचा उपयोग करणें रास्तच आहे.'

## डॉक्टर डास : ३ :

आहार, आरोग्य आणि स्वच्छता यांची बापूजींना विशेष आवड आहे. त्यांच्या ह्या आवडीमुळें ह्या विषयांचे अनेक वैद्य आणि डॉक्टर बापूजींकडे नेहमीं येत असतात व ते आले म्हणजे आश्रमांत एक नवीन आहाराचा प्रयोग सुरू होतो. नवीन बोलपट लागला म्हणजे शहरांत ज्याच्या त्याच्या तोंडीं ज्याप्रमाणें कांहीं दिवस त्यांतील गाण्याचे स्वर नाचत असतात, तशीच कांहींशी स्थिति कोणी नवीन फूडफॅडिस्ट आले, म्हणजे सेवाग्राममध्यें होते. डॉ. दास म्हणून एक बंगाली डॉक्टर आश्रमामध्यें येऊन राहिले होते. त्यांच्या तऱ्हेवाईक व तापट स्वभावामुळें लोक त्यांना डॉ. डास म्हणत. त्यांनीं आहाराच्या बाबतींत सेवाग्राममध्यें विलक्षण खळबळ उत्पन्न केली होती. हे

गृहस्थ म्हातारे होते व हिंदी देखील त्यांना चांगलेंसें बोलतां येत नव्हतें. परंतु त्यांची कळकळ आणि उत्साह दांडगा होता. आहार-चिकित्सेनें कोणताहि रोग बरा होऊं शकतो, हें त्यांचें ठाम मत बापूजींच्या मताशीं जुळतें असल्यामुळें बापूजींची त्यांच्यावर बहाल मर्जी होती.

## हिरवी मिरची व विड्याचीं पानें : ४ :

डॉ. दास यांनीं सेवाग्रामच्या आहारांत कांहीं मजेदार गोष्टी सुरू केल्या. हिरवी मिरची आणि विड्याचीं पानें हीं आरोग्याला फार हितकर आहेत, ह्यावर त्यांचा विशेष जोर; त्यामुळें कांहीं दिवस सेवाग्राममध्यें याचा चांगलाच प्रचार होता. आमच्याकडे आमचे एक मित्र आले असतां त्यांना इतर पदार्थांबरोबर दोन विड्याचीं पानें व दोन हिरव्या मिरच्या हीं वाढण्यांत आल्या. ते मला म्हणाले, ' जेवणांत हिरव्या मिरच्या ठीक आहेत; परंतु विड्याचीं पानें वाढण्याचें कारण लक्षांत येत नाहीं.'

मीं त्यांना सांगितलें कीं सेवाग्राममधील ही एक नवीन पद्धत आहे. इतर ठिकाणीं जेवणानंतर विडा देतात. येथें विडा देण्याची पद्धत नाहीं. जेवणाबरोबरच विड्याचीं दोन हिरवीं पानें आम्हीं देतों. कच्च्या भाजीप्रमाणेंच तीं चावून खायचीं असतात.'

आश्रमांतील संयमी जीवनांत विड्याला आणि मिरचीला स्थान नव्हतें; परंतु डॉ. दास यांनीं तिखट आणि विड्याला नाहीं तरी हिरव्या मिरचीला व विड्यांच्या पानांना स्थान करून दिलें. परंतु नुसती हिरवी मिरची किंवा विड्याचें कच्चें पान खाणें फारसें कोणाला आवडण्यासारखें नव्हतें व त्यामुळें डॉ. दास येथून गेले तसा त्यांचा प्रचारहि बंद झाला.

## चौपट भाजी : ५ :

डॉ. दासांची दुसरी गोष्ट म्हणजे भाजीचा आग्रह. मनुष्यानें जेवणांत धान्याच्या चौपट भाजी खाल्ली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. जेवणांत दहा तोळे गव्हाची पोळी व पांच तोळे भात व पांच तोळे डाळ वगैरे धान्यें असल्यास त्याबरोबर जवळ जवळ ऐंशीं तोळे भाजी खाणें आवश्यक आहे, असें ते म्हणत. सर्वसाधारण जेवण याच्या अगदीं उलट असतें. त्यांत पांच-सात तोळे फक्त भाजी व बाकी सर्व धान्यें असतात. डॉ. दासांच्या सांगण्याप्रमाणें आश्रमांतील जेवणांत भाजीचें प्रमाण चौपट नाहीं, तरी दुप्पट तरी असतेंच. बाहेरून येणाऱ्या लोकांस वाडगाभर नुसती उकडलेली भाजी पाहून अर्थात् थोडें आश्चर्यच वाटतें.

## अमिश्र अन्न : ६ :

भातांत डाळ व तूप मिश्र करून खातों, तसें पोळीशीं भाजी, डाळ किंवा असेंच कांहीं कालवण असल्याशिवाय बहुतेक कोणी खात नाहीं. परंतु बापूजींप्रमाणेंच डॉ. दासही अमिश्र अन्नाचे पुरस्कर्ते होते. भात, भाजी, डाळ, पोळी, दूध वगैरे प्रत्येक एकमेकांत मिश्र न करतां खाल्लें पाहिजे, एवढेंच नव्हे तर एका वेळेला एकच पदार्थ खाल्ला पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. ते स्वतः एका वेळेला नुसती पोळी खात, त्यानंतर एका तासानें नुसतें दूध घेत, त्यानंतर आणखी एका तासानें भाजी खात, वगैरे वगैरे. अर्थात् अशा तऱ्हेनें दिवसभर खाणें सर्वांना शक्य नसे, म्हणून कांहीं कांहीं पदार्थ एका वेळेला खाण्याला त्यांनीं परवानगी दिली होती.

डॉ. दासांनीं आपल्या आहार चिकित्सेनें आश्रमांत पुष्कळशा लोकांना बरें केलें. विचित्र विचित्र रोगी बापूजींनीं डॉ. दासांच्या

स्वाधीन केले होते. एका प्रसिद्ध घराण्यांतील एक तरुण बापूजींकडे आले होते. ते आपल्या प्रेयसीशीं विवाह करूं इच्छित होते. परंतु ती मुलगी त्यांच्या कुळाला साजेशा उच्च घराण्याची नसल्यामुळें त्यांचे आप्त अशा तऱ्हेचा विवाह करण्याविरुद्ध होते. ह्या प्रेमभंगामुळें त्या तरुणाच्या मेंदूंत थोडा बिघाड झाला होता. बापूजींजवळ राहून तो तरुण थोड्याच दिवसांत चांगला झाला. तो लवकर बरा होण्यांत बापूजींचा सहवास हेंहि एक कारण असलें, तरी डॉ. दासांच्या आहाराच्या प्रयोगामुळेंहि तो बरा झाला, असेंहि म्हणतां येईल.

## कांदा व लसूण : ७ :

कांदा आणि लसूण उत्तेजक म्हणून व त्यांचा वासहि अत्यंत उग्र असल्यामुळें धार्मिक वृत्तीच्या लोकांत बहुतेक निषिद्ध समजण्यांत येतात. आश्रमांतहि ते निषिद्धच होते, परंतु कां कोणास ठाऊक, आज आश्रमामध्यें कांदा व लसूणाचें अत्यंत प्राबल्य आहे. बापूजींना स्वतःच्या अनुभवानें कांदा-लसूणाचें महत्त्व पटलें, त्यामुळें आश्रमाच्या आहारांत आज कांदा लसणाचें विशेष स्थान आहे. आश्रमांत लसूण तर इतका खाण्यांत येतो कीं एखादा आश्रमवासी जवळून गेला कीं त्याच्या अंगाला लसणाचा वास आल्याशिवाय राहात नाहीं. ह्यामुळें गीतेंतील स्थितप्रज्ञाच्या लक्षणाप्रमाणें आश्रमवासीयांचें लक्षण काय, अशी एक रिकामटेकडी चर्चा निघाली असतां 'ज्याच्या अंगाला लसणाचा वास येईल, तो आश्रमवासी'—अशी एकानें आश्रमवासीयाची व्याख्या केली आणि ती पुष्कळांना खूपच आवडली.

## गाजरपारखीपणा : ८ :

गाजराला वर्ध्याच्या बाजारांत मुळींच किंमत नव्हती; परंतु दोन तीन वर्षांपूर्वीं एकदां एकाएकीं त्याची किंमत चढली. रविवारचा

बाजार होता; भाजी घेण्याकरितां वर्ध्याला गेलों होतों. एका दुकानांवर माझे एक मित्र भेटले. हातांत रिकामीच थैली पाहून मी त्यांना विचारलें, 'का हो, भाजी घ्यायची नाहीं वाटतं? रिकामीच थैली घेऊन चालला आहां.' त्यावर ते म्हणाले, 'आज भाजीचा भाव कां चढला आहे, कांहीं कळत नाहीं. गाजरें तीं काय, पण तीं देखील दोन आणे शेराच्या खालीं मिळत नाहींत. संक्रांतींत स्त्रियांना वाणें देण्याकरितां गाजरें लागतात, त्यामुळें तीं महाग झालीं म्हणावं तर संक्रान्त तर कधींच होऊन गेली आहे.'

मी त्यांना म्हणालों कीं सेवाग्रामची नवीनच संक्रांत गाजरांवर आली आहे, त्यामुळें गाजरांचा भाव इतका वाढला आहे.

'मागच्याच बाजारांत दोन पैसे शेर गाजरें होतीं आणि एका आठ दिवसांत तीं चौपट महाग व्हावींत, म्हणजे आहे तरी काय?'

त्याचें कारण हें होतें कीं सेवाग्राममध्यें गाजरें खाण्याचा नवीनच प्रयोग निघाला होता. गाजरांत अन्नतत्त्वें विशेष आहेत व त्यामुळें इतर कोणत्याहि भाजीपेक्षां गाजराची भाजी श्रेष्ठ आहे, असें सांगण्यांत आलें होतें; त्यामुळें सेवाग्राममध्यें प्रत्येक संस्थेंत गाजराचीच भाजी सुरू झाली होती. एवढेंच नव्हे, तर मुलांना केळीं किंवा दुसरा कांहीं खाऊ देण्याऐवजीं आश्रमांतील आयांनीं गाजरें देण्याला सुरुवात केली होती. महाग खाऊ देण्याऐवजीं स्वस्त खाऊ निघाला, म्हणून मुलांच्या आईबापांना अर्थात् यामुळें आनंदच झाला. होता आणि येताजातां जरी मुलांनीं खायला मागितलें, तरी त्याला त्यांची हरकत नव्हती. मुलें देखील गाजरें तितक्याच आनंदानें खात. तेव्हांपासून सेवाग्राममध्यें गाजर हें विशेष लोकप्रिय झालेलें आहे. सेवाग्रामच्या सुगृहिणींनीं गाजरांचे निरनिराळे प्रकारहि सुरू केले आहेत. कधीं गाजरें खाणें, गाजराची कोशिंबीर किंवा भाजी करणें, हा अर्थात् गाजराचा अगदीं सामान्य उपयोग झाला. गाजराचें लोणचें,

गाजराची भाजी, एवढेंच नव्हे, तर गाजराचा शिराही त्या वेळीं सेवाग्राममध्यें सुरू झाला होता.

## आंवळा देऊन कोहळा : ९ :

आंवळा देऊन कोहळा काढणें, ह्या म्हणीप्रमाणें सेवाग्राममध्यें आंवळ्यापासून कोहळ्यापेक्षांहि अधिक मूल्यवान् चीज काढली आहे, हें ऐकून वाचकांना आश्चर्य वाटेल. तीन मुसंबींबरोबर एक आंवळा, हें आश्रमाचें समीकरण आहे. तीन मुसंब्यांचे गुण एका आंवळ्यांत आहेत, असें आश्रमाचें म्हणणें आहे. त्यामुळें आश्रमांत आंवळ्याचें महत्त्व किती असेल, हें सांगायला नको. आश्रमांत जेवण झाल्यावर मुखशुद्धीकरतां कांहीं दिवस एक एक ताजा आंवळा देण्यांत येत असे. मुखशुद्धीकरतां सुपारीऐवजीं आंवळा देण्याची ही पद्धति मजेदार नाहीं काय? परंतु वाचकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं आंवळा म्हणजे कच्चा आंवळा. आंवळ्याचा मुरंबा नव्हे.

आहारासंबंधीं बापूजींचे अशा तऱ्हेचे अनेक प्रयोग नेहमीं चालू असतात. इतरांना जरी हे तऱ्हेवाईक वाटले, तरी बापूजींची त्याच्या मागें असलेली दृष्टि अत्यंत महत्त्वाची आहे, हें विसरून चालणार नाहीं. हिंदुस्थानचें आरोग्य अत्यंत खालावलेलें आहे. आहाराच्या दृष्टीनें अत्यंत उपयोगी असे अनेक पदार्थ हिंदुस्थानांत मुबलक आहेत. निरुपयोगी म्हणून आज आम्हीं त्याकडे लक्ष देत नाहीं. आणि आरोग्याला विघातक असणाऱ्या कृत्रिम महाग पदार्थांना आपण आपल्या जेवणांत दाखल करीत आहोंत. आहारासंबंधीं हिंदी लोकांची ही उलटी दृष्टि बापूजी बदलूं इच्छितात. साध्या साध्या वस्तूंत भरपूर अन्नतत्त्वें आहेत, त्यांचा शोध करून ते पदार्थ आहारांत दाखल केल्यास हिंदुस्थानांतील गरिबांना देखील अत्यंत स्वस्त असें सकस व शास्त्रीय अन्न मिळूं शकणार नाहीं काय? अन्नावर मनुष्याचें जीवन-मरण अवलंबून आहे. त्यामुळें त्याकडे बापूजी जे इतकें लक्ष देत आहेत, तें योग्यच म्हणतां येईल.

# १२ महादेवभाई

## शरीरानें व मनानें उंच : १ :

शरीरानें उंच असून मनानेंहि उंच असणारीं माणसें क्वचितच आढळून येतात. अशा 'क्वचित' माणसांत महादेवभाईंची गणना करावी लागेल. सहा फुटांपेक्षांहि किंचित् जास्तच उंच असलेली त्यांची धीरगंभीर मूर्ति हजारों लोकांच्या समुदायांत उठून दिसत असे. त्यांचा वर्ण गौर व चेहरा सौम्य होता. त्यामुळें त्यांच्याकडे लोकांचें एकदम लक्ष जात असे. बापूजींचें शरीर आणि व्यक्तित्व अगदींच किरकोळ, ह्याला महादेवभाईनींच आपल्या शारीरिक व बौद्धिक व्यक्तिमत्त्वामुळें मोठेपणा आणून दिला, असें कोणी तरी म्हटलेलें मला आठवतें. वाल्मीकीनें आपल्या काव्यामुळें रामाला रामत्व आणून दिलें, असें एका संस्कृत श्लोकांत म्हटलें आहे. याच अर्थानें आपणाला म्हणतां येईल कीं महादेवभाईनीं आपल्या काव्यमय मनोज्ञ-रमणीय शैलीनें महात्माजींचें दैनंदिन चरित्र लोकांस सांगितलें नसतें, तर महात्माजींचा मोठेपणा कदाचित् जगाला चांगला कळला नसता.

## सौंदर्याचा आणि कलेचा भोक्ता : २ :

महादेवभाई महात्माजींच्या विचारांशीं, त्यांच्या जीवनाशीं अगदीं एकरूप झाले होते; त्यांनीं आपलें स्वतंत्र असें अस्तित्व ठेवलें नव्हतें असें सांगण्यांत येतें. विचारांच्या बाबतींत हें खरें असलें, तरी आचाराच्या बाबतींत तें तितकेंसें बरोबर म्हणतां येणार नाहीं. महादेवभाई महात्माजींच्या इतक्या निकट असले, तरी त्यांनीं प्रतिमहात्मा होण्याचा प्रयत्न केला नाहीं. महात्माजींसारखा आखुड पंचा नेसून कधीं तें बाहेर निघाले नाहींत. समाजांतील सर्वसामान्य शिष्ट लोकाप्रमाणें



६८३१

त्यांचा पोषाख होता. खादीचें लांब धोतर, त्यावर खादीचाच पांढरा अंगरखा व डोक्याला पांढरी गांधीटोपी, हा त्यांचा नेहमींचा पोषाख असे. ह्यांची घरांतील राहणी देखील आश्रमी थाटाची नव्हती. त्यांच्या अभ्यासाच्या खोलींत गेलें कीं आपण एका आधुनिक उच्च-शिक्षित माणसाच्या खोलींत आलों आहोंत, असें वाटे. ह्यांच्या खोलींत सुंदर सतरंज्या व कलापूर्ण गालिचे अंथरलेले असत, मोठमोठ्या ग्रंथकारांचीं सुंदर तऱ्हेनें बांधलेलीं पुस्तकें मोहक कपाटांतून आकर्षक तऱ्हेनें लावलेलीं असत, भिंतीवर दोन चार निवडक कलापूर्ण

चित्रें व फोटो आढळत. त्यांच्या खोलींतील प्रत्येक वस्तूंत सौंदर्य आणि कला आढळून येई.

महादेवभाईंना सुंदर व कलापूर्ण वस्तूंची विशेष आवड असे. ते स्वतः सुंदर होते व त्यामुळें जें जें सुंदर दिसेल तें तें ते आपलेंसें करीत. बापूजींबरोबर हिंदुस्थानांत आणि युरोपांत त्यांनीं प्रवास केलेला आहे. प्रवासांत कोठें कांहीं सुंदर वस्तु त्यांना आढळली, तर ती ते बहुशः घेतल्याशिवाय राहत नसत. बापूजींना भेट म्हणून आलेल्या अनेक सुंदर वस्तु ते ठेवून घेत. तसेंच देशोदेशीं पसरलेल्या त्यांच्या मित्रांकडूनही त्यांची ही सौंदर्याची आवड पाहून त्यांना सुंदर व कलापूर्ण वस्तु भेट येत. ह्या त्यांच्या सौंदर्यपिपासु वृत्तीमुळेंच ते इतके सुंदर व कलापूर्ण लिहूं शकले, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

## फुलांची आवड : ३ :

महादेवभाईंना फुलझाडांची आवडहि तशीच होती. त्यांनीं आपल्या घराभोंवतीं गुलाब, मोगरा वगैरे फुलांचीं झाडें लावलीं होतीं, व त्यांच्या जोपासनेकडे ते नेहमीं लक्ष देत. एका दिवसाची गोष्ट मला आठवते. त्या दिवशीं त्यांच्या घरची मोलकरीण व नोकर कांहीं कारणामुळें कामावर आलीं नाहींत; तेव्हां महादेवभाईंनीं स्वतः घागर घेऊन, डोक्यावरून आणून झाडांना पाणी घातलें, तसेंच घरांतील पाणी भरलें. महादेवभाईंचीं इतकीं तीं आवडतीं झाडें असल्यामुळें त्यांच्यामागें त्यांच्या पत्नी श्री.दुर्गाबेन देखील त्यांची विशेष काळजी घेतात व कधीं स्वतः देखील डोक्यावर घागर घेऊन झाडांना पाणी घालतात. ऑगस्ट १९४२ मध्यें सेवाग्रामहून महादेवभाई बापूजींबरोबर मुंबईला रवाना झाले, त्याच्या कांहीं दिवस आधीं त्यांनीं आपल्या खोलीपुढें गुलाबाचें एक रोप लावलें होतें. आज गुलाबांचे ते रोप उंच वाढलें असून गेंदेदार फुलांनीं तें बहरून गेलें आहे. दुर्गाबेनकडे कोणी गेलें

म्हणजे त्या महादेवभाईंनीं जातांना लावलेलें ते झाड मोठ्या आवडीनें दाखवितात.

## बिल्वदलांची पूजा : ४ :

महादेवाला बिल्वदल प्रिय होतें हें सर्वांना माहीत आहे.. दुर्गाबेननें आपल्या पतीची आठवण म्हणून बेलाचें एक रोप घरासमोर लावलें आहे व त्या रोपाची त्या विशेष काळजी घेत असतात. एकदां त्या म्हणाल्या, 'लहानपणीं मला महादेवाच्या पूजनाची फार आवड होती. मी मातीचें शिवलिंग करी व बेलाचीं पानें आणून त्यावर वाही. माझी महादेवावरील ही भक्ति पाहून घरची मंडळी मला म्हणत कीं तुला महादेवासारखाच पति मिळेल. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें महादेवासारखा नव्हे, तर प्रत्यक्ष महादेवच मला पति मिळाला.' दुर्गाबेनच्या ह्या आठवणीवरून महादेवभाईंचें आपल्या पत्नीवर किती प्रेम होतें हें दिसून येईल.

महादेवभाई खाण्याच्या बाबतींत देखील रसिक होते. ते चहा घेत व घरीं निरनिराळे चवदार पदार्थ करून खाण्याची त्यांना आवड असे.

## गांधीजींचे दुसरे सेक्रेटरी : ५ :

महादेवभाई मोठे साहित्यिक होते. परंतु साहित्यिकांत असलेला विक्षिप्तपणा, गबाळेपणा, किंवा अनियमितपणा त्यांच्या अंगीं नव्हता, महात्माजींचे दुसरे सेक्रेटरी श्री. प्यारेलाल नायर ह्या बाबतींत महादेवभाईंच्या अगदीं उलट आहेत. प्यारेलालजींचें आपल्या कपड्यांकडे, शरीराकडे किंवा वागण्याकडे फारसें लक्ष नसतें. सदरा फाटका असला तरी तसाच ते घालतील, स्नान जेव्हां वेळ मिळेल तेव्हां

करतील, दाढीहि नित्य केलेली असेलच, असें नाहीं ! प्यारेलालजींच्या खोलींत गेल्यास ती पुस्तकांनीं आणि सामानानें अस्ताव्यस्त भरलेली आढळेल. प्यारेलालजी आपलें लिहिण्याचें काम बहुतेक रात्रीं करतात. सर्व लोक झोंपले म्हणजे पेट्रोमॅक्स लावून त्याच्या डोळे दिपणाऱ्या प्रकाशांत प्यारेलालजींची केंस विस्कटलेली मूर्ति लिहीत बसलेली आढळते. महादेवभाईंचें असें नव्हतें. त्यांचें सर्व काम व्यवस्थित, नियमित व सुंदर असावयाचें. ते आपलें लिखाण शांतपणें व आरामानें करीत. भलत्या रात्रीं गबाळपणानें लिहीत बसलेले ते कधीं दिसावयाचे नाहींत.

## तीनशें पासष्ट वार : ६ :

महादेवभाईंची दोन गोष्टींवर विशेष भक्ति होती. एक गीता व दुसरी चरखा. गीतेचे अठराहि अध्याय त्यांना कंठगत होते. रिकामे असले कीं त्यांचें मनांतल्या मनांत गीतेचें पारायण चालू असे. महादेवभाईंचें ३६५ वार आश्रमांत प्रसिद्ध आहेत. ते चरख्यावर रोज ३६५ वार कांतीत. ३६५ हा आंकडा त्यांना इतका कां आवडत होता, हें अजूनहि एक कोडेंच आहे. त्यांच्यामागें त्यांच्या पत्नी दुर्गाबेन यांनीं ३६५ वार कांतण्याचा नियम चालू ठेवला आहे.

१९३९ ची गोष्ट असेल. मी विद्यामंदिर ट्रेनिंग इन्स्टिटयूटमधील विद्यार्थ्यांना घेऊन सेवाग्रामला आलों होतों. विद्यार्थ्यांना दोन शब्द सांगण्याची व शिक्षणासंबंधीं विद्यार्थ्यांच्या कांहीं शंका आहेत, त्यांचें निरसन करण्याची मीं महादेवभाईंना विनंति केली. त्यांनीं तें कबूल केलें. आम्हीं त्यांच्यासमोर बसल्यावर ते आंतल्या खोलींत गेले व आपला चरखा घेऊन आले. नंतर चरखा सज्ज करून त्यांनीं सूत कांतण्याला प्रारंभ केला. सूत कांततां कांततां त्यांनीं जें काय सांगावयाचें होतें तें सांगितलें व आमच्या प्रश्नांचीं उत्तरेंहि

दिली. शेवटीं मीं त्यांना प्रश्न केला, 'या वेळीं चरखा घेऊन तुम्हीं कांततां हें कसें काय? यामुळें तुमचें लक्ष बोलण्याकडे संपूर्ण राहत नसेल.'

ह्यावर ते म्हणाले, 'चरख्यावर सूत कांतणें हें मला अगदीं नैसर्गिक झालें आहे. त्यामुळें कोणी भेटायला आले म्हणजे त्यांच्याशीं बोलतांना मी सूत कांतीत असतों. अशानें माझा वेळ फुकट जात नाहीं व सूत कांतण्याकरितां आणखी वेळ मला काढावा लागत नाहीं.' मोठमोठ्या सभांमधून देखील ते नुसतीं व्याख्यानें ऐकण्यांत वेळ न घालवतां तकलीवर सूत कांतीत बसत. सूत कांतणें आणि लिहिणें हे त्यांचे दोन व्यवसाय होते, असें म्हणतां येईल. झोंप, स्नान, भोजन वगैरे दैहिक क्रियांचा वेळ सोडून बाकी बहुतेक वेळ लिहिण्यांत किंवा सूत कांतण्यांत ते घालवीत. उगीच ते कधींहि वेळ वायां जाऊं देत नसत.

## प्रेमाची उदारता : ७ :

आगाखान प्रासादांतून सुटल्यानंतर बापूजी ऑगस्ट १९४४ मध्यें सेवाग्रामला आले, त्यानंतर लगेच महादेवभाईची पुण्यतिथि येथें साजरी करण्यांत आली. ह्या दिवशीं राजगोपालाचार्यहि सेवाग्राममध्यें होते. महादेवभाईची थोरवी सांगतांना ते म्हणाले, 'बापूजींचें प्रेम ज्यांनीं संपादन केलें आहे, त्यांना वाटतें कीं बापूजींचें हें प्रेम नेहमीं आपणावर कायम रहावें, आणि हें अगदीं साहजिक आहे. परंतु ह्यामुळेंच बापूजींनीं दुसऱ्या कोणावर प्रेम केलेलें ह्या लोकांना आवडत नाहीं. बापूजी दुसऱ्या कोणावर प्रेम करूं लागले, तर हे लोक त्या लोकांचा मत्सर करूं लागतात. आपल्या प्रियकरानें दुसऱ्या प्रेयसीवर प्रेम केलेलें कोणत्या तरुणीला आवडेल? परंतु महादेवभाई मात्र याला अपवाद होते. बापूजींचें आपल्याप्रमाणेंच दुसऱ्यांवरहि

प्रेम असावें, असें त्यांना वाटे. इतर लोकांना ते मुद्दाम बापूजींकडे घेऊन जात व बापूजींशीं त्यांची ओळख करून देत. बापूजींनीं त्यांच्यावर प्रेम दाखवलें म्हणजे त्यांना आनंद होई.'

## भावप्रवण व प्रेमळ

: ८ :

राजाजींनीं सांगितलेली महादेवभाईसंबंधीं ही गोष्ट खरोखरच महत्त्वाची आहे. मनुष्य-स्वभावाचें ज्याला थोडेंसें ज्ञान आहे, त्याला हें बरोबर पटेल. महादेवभाईंची वृत्ति अंतर्मुख होती, त्यामुळें स्वत:चें त्याचप्रमाणें दुसऱ्याचें अंत:करण ते जाणत व सर्वांशीं साधेपणानें व प्रेमानें वागत. ते स्वभावानें प्रेमळ व भावुक होते. त्यांना आपल्या मोठेपणाचा अहंकार नव्हता. ह्यामुळेंच पाश्चात्य काय आणि पौर्वात्य काय, सर्व देशांतील मोठमोठ्या लोकांना महादेवभाई-विषयीं आत्मीयता वाटत असे. ह्या लोकांना महात्माजी आदरणीय होते; परंतु महादेवभाई त्यांना जिवलग मित्रासारखे वाटत आणि ह्यामुळेंच महादेवभाईंचा मृत्यु झाल्याबरोबर जगांतील सर्व देशांत त्यांच्याविषयीं जिव्हाळ्याची भावना प्रगट करण्यांत आली.

महादेवभाईंची शांत, धीरगंभीर, भव्य मूर्ति हें लिहीत असतांना माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते. माझ्या खोलीच्या अगदीं समोर पन्नास-साठ फुटांवर त्यांचें तें सुंदर घर व त्याभोंवतीं लावलेलीं फुलझाडें दिसत आहेत. फक्त त्यांत महादेवभाई मात्र आतां नाहींत !



# १३ सेवाग्रामच्या तीन शिला

## प्रभु रामचंद्राचा चरणस्पर्श : १ :

प्रभु रामचंद्राच्या चरणस्पर्शानें शिलेला जीवन प्राप्त झालें, असें आपण वाचतों. वास्तविक पाहतां शिला निर्जीव आहे, तिला जिवंत करणें शास्त्रज्ञांना देखील अजून साध्य झालें नाहीं. असें आहे, तर प्रभु रामचंद्रानें शिला जिवंत कशी केली? होय, प्रभु रामचंद्रानें शिला जिवंत केली, हें खरें आहे. शिलेला त्यांनीं जीवन दिलें. ज्या शिलेला पूर्वी कोणी ओळखीत नव्हतें, जी पूर्वी जड, अचेतन होती, ती प्रभु रामचंद्राचा स्पर्श होतांच सजीव झाली. तिचें नांव वाल्मीकिसारखे देव-कवि देखील गाऊं लागले.

या कथेचें तात्पर्य काय? तात्पर्य इतकेंच कीं महापुरुषांच्या सान्निध्यामुळें साध्या साध्या गोष्टींना देखील महत्त्व प्राप्त होतें. त्यांना कांहीं इतिहास निर्माण होतो. सेवाग्रामच्या तीन शिलांसंबंधीं असेंच आहे.

## निष्पर्ण वृक्षाखालील शिला : २ :

सेवाग्राम-आश्रमापासून सहा फर्लांगांच्या आंत ह्या तीन शिला तुम्हांला आढळून येतील. आश्रमापासून दोन फर्लांगांवर सडकेच्या कडेला सांवरीचा एक वृक्ष आहे. ह्याचा उल्लेख मागें आलाच आहे. ह्या वृक्षाला पावसाळ्यांत हिरवीं पानें दिसतील, तेवढींच; बाकी बहुतेक महिने तो निष्पर्णच असतो. अशा ह्या शुष्क वृक्षाखालीं बसण्याकरितां एक लहानसा ओटा तुम्हाला आढळेल. ओटा चुना व विटा यांनीं पक्का बांधला असून त्यावर पांढरी फरशी बसवलेली आहे. सेवाग्रामची हीच ती पहिली शिला. सार्वजनिक बागांमधून फिरावयाला येणाऱ्या लोकांना बसण्याकरितां बांकें ठेवलीं असतात. त्याप्रमाणें सडकेनें फिरायला निघालें, म्हणजे बसण्याकरितां हा ओटा बांधला असेल हें सहजच लक्षांत येण्यासारखें आहे.

## गांधीजी बसत नाहींत : ३ :

एकदां सेवाग्रामला पाहण्याला आलेले एक गृहस्थ व मी संध्याकाळीं ह्या ओट्यावर बसून गप्पा करीत होतों. गांधीजी सडकेनें फिरायला निघून ओट्याजवळ आले, तेव्हां आम्हीं दोघे उभे राहिलों. गांधीजींनीं चालतां चालतां कोण उभें आहे म्हणून सहज आमच्याकडे दृष्टिपात केला, तसा त्या गृहस्थांनीं त्यांना नमस्कार केला. गांधीजींनीं स्मितपूर्वक त्यांचा स्वीकार केला. गांधीजी गेल्यानंतर पुन्हां आम्ही ओट्यावर बसलों, तेव्हां ते गृहस्थ म्हणाले,—

‘ आपण हा ओटा अडवून बसलों, हें कांहीं ठीक नाहीं. गांधीजीं-बरोबर असलेल्या मंडळींपैकीं कोणाला येथें बसावयाचें असल्यास त्यांच्याकरतां आपण येथून उठायला पाहिजे होतें.’

मी त्यांना म्हणालों, ‘ गांधीजी फिरायला निघाले म्हणजे मध्यें कोठें बसत नाहींत. फिरून सरळ ते आश्रमांत जातात, आणि त्यांच्याबरोबर फिरणारी मंडळीहि त्यामुळें मध्यें कोठें बसत नाहीं.’

‘ फिरतांना कोणीं जर बसत नाहीं, तर हा ओटा कोणाकरतां बांधला आहे ? ’–गृहस्थांनीं पृच्छा केली.

## जागा खालीं केली पाहिजे : ४ :

‘गांधीजींबरोबर फिरायला जात नाहींत, असे जे आमच्यासारखे कांहीं अरसिक आणि अहंमन्य लोक आहेत, त्यांच्याकरतां हा ओटा बांधलेला आहे व तेच लोक यावर बसत असतात,’ असें मी त्यांना विनोदानें म्हणालों. तितक्यांत सडकेनें किशोरलाल मश्रूवाला येतांना दिसले. त्यांना पाहतांच मी ओट्यावरून उठलों व म्हणालों, ‘ चला, उठा, आपल्याला आतां ही जागा खालीं केली पाहिजे.’

आम्ही उठून सडकेवर येतों तो किशोरलालभाई तेथें आले व आमच्याकडे पहात ओट्यावर जाऊन बसले. मीं त्या गृहस्थांना नंतर सांगितलें कीं किशोरलालभाईकरितां हा ओटा बांधण्यांत आला आहे. किशोरलालभाईंची प्रकृति अत्यंत अशक्त आहे. त्यांना दम्याचा विकारहि अतिशय आहे. त्यामुळें आश्रमापासून ह्या ओट्यापर्यंत म्हणजे फार फार तर दोन फर्लांग ते चालूं शकतात आणि ह्यामुळेंच येथें त्यांना बसण्याकरितां हा ओटा बांधण्यांत आला आहे.

गांधीजींच्या सान्निध्यांत सेवाग्राममध्यें ज्या दोन चार खास व्यक्ति आहेत, त्यांत किशोरलालभाईचें स्थान पहिलें म्हणतां येईल. त्यांचें शरीर म्हणजे हाडांचा निव्वळ सांपळा आहे. वर उल्लेखिलेल्या सांवरीच्या निष्पर्ण झाडाप्रमाणेंच त्यांच्या हातापायांच्या काड्या झालेल्या

आहेत. जेलमध्यें गेल्यानंतर त्यांची प्रकृति अधिकच खालावली व त्यांची जगण्याची शक्यता न दिसल्यामुळेंच सरकारनें त्यांना मुक्त केलें. आज ते ओट्यापर्यंत देखील फिरायला जाऊं शकत नाहींत; असें असलें, तरी किशोरलालभाईंचा म्हणून तो ओटा लोकांना मी दाखवीत असतो.

## गणेशापुढें गणेशाचें खंडन :५:

अशा प्रकारें ओट्याशीं आपला संबंध जोडणें किशोरलालभाईंना पसंत पडणार नाहीं, हें मला माहित आहे. कारण किशोरलालभाई बाह्य प्रतीकांच्या व मूर्तिपूजेच्या बाबतींत अत्यंत विरोधी विचार राखतात. एकदां गणेशोत्सवांत वर्ध्याच्या महिलाश्रमांत त्यांना व्याख्यानाकरतां बोलावलें होतें. तेथें त्यांनीं गणेशाची मूर्ति करून तिचें अशा प्रकारें पूजन करणें ठीक नाहीं, यावर व्याख्यान दिलें, तें मला अजून आठवतें. गणेशापुढें गणेशाचें खंडन करणें यांत अनौचित्याचा दोष येतो, असें तुम्ही म्हणाल. परंतु किशोरलालभाईंची तत्त्वज्ञाची भूमिका लक्षांत घेतल्यास त्यांत अनौचित्य नव्हतें, हें तुम्हांला आढळून येईल. किशोरलालभाईंचे विचार स्पष्ट आणि कांटेकोर असतात, त्यांत संदिग्धता किंवा गुळमुळीतपणा दिसायचा नाहीं. विचार स्पष्ट असल्यामुळें त्यांचें लिहिणें व बोलणेंहि तितकेंच स्पष्ट असतें; ह्यामुळेंच त्यांच्या लिखाणांत व भाषणांत स्पष्टवक्तेपणा व निर्भयता दिसून येते. त्यांच्या ह्या निर्भय वृत्तीमुळें मोठमोठे लोकहि त्यांना वचकून असतात, असें वाटतें. कारण लोकांना न झेपण्यासारख्या किंवा न रूचण्यासारख्या गोष्टीहि ते स्पष्ट बोलून दाखवतात व त्यामुळेंच निव्वळ बरबर बोलणाऱ्या किंवा दिखाऊ काम करणाऱ्या लोकांना भीति वाटत असावी.

## स्पष्टवक्तेपणा व निर्भयता : ६ :

गांधीसेवासंघांत एकदां सदस्यांच्या वेतनासंबंधीं चर्चा चालली होती. वेतनाचें मान कमी करण्यांत यावें, असें कांहींचें म्हणणें होतें. किशोरलालभाई म्हणाले, 'मासिक अमूक एक रुपयांचें मान ठरविल्यास आज जे त्यापेक्षां जास्त रुपये घेतात, त्यांच्यापुढें दोन प्रश्न उपस्थित होतात. जर त्यांनीं कमी रुपये घेण्याचें कबूल केलें, तर त्याचा अर्थ असा होईल कीं आजपर्यंत ते उगीचच जास्त रुपये घेत होते आणि गांधीसेवासंघाच्या असंग्रहाच्या दृष्टीनें हें त्यांचें करणें अनैतिक, स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे चोरीसारखें समजावें लागेल. बरें, इतके आपल्याला अपुरे आहेत, इतकाच आपला कमींत कमी खर्च आहे, ह्यापेक्षां कमी करणें शक्य नाहीं, असें त्यांनीं सांगितलें, तर त्यांना संघांतून निघून दुसरा कांहीं तरी उद्योग करावा लागेल.' वेतनाच्या बाबतींत इतकें स्पष्टपणें बोलण्याचें धैर्य इतरांना झालें नसतें; परंतु किशोरलालभाईंना अशा प्रकारें स्पष्ट बोलणें अगदीं नैसर्गिक झालें आहे. प्रत्येक प्रश्नाच्या मुळाशीं जाऊन त्याचें विश्लेषण करणें व यावरून आपलें जें मत बनेल तें निर्भयपणें बोलून दाखविणें, ही किशोरलालभाईंच्या व्यक्तित्त्वांतील खास विशेषता आहे, असें मला वाटतें.

९ ऑगस्टच्या धामधुमींत हिंसा–अहिंसेचा शांतपणें विचार करणें व त्यासंबंधीं स्पष्ट कांहीं बोलणें किती कठिण तसेंच धोक्याचें होतें; परंतु तशा क्षुब्ध वातावरणांत देखील सेवाग्रामला किशोरलालभाईंनीं दिलेलीं भाषणें व निर्णय इतके स्पष्ट होते, कीं ते ऐकून, ऐकणाऱ्यांना भीति वाटूं लागावी; पण किशोरलालभाईंना तें सांगतांना कांहींच वाटलें नाहीं. त्या वेळीं त्यांच्या निर्भय वृत्तीची मला जी प्रचीति आली, ती कधीं विसरतां येणार नाहीं. पृथ्वीभोंवतीं सूर्य फिरत नसून

सूर्याभोंवतीं पृथ्वी फिरते, हें सांगतांना गॅलिलिओनें राजदंडाची किंवा लोकक्षोभाची पर्वा केली नाहीं; शास्त्रज्ञांमध्यें आढळणारी हीच निर्भय वृत्ति किशोरलालभाईंमध्यें आढळून येते असें मला वाटतें आणि यामुळेंच सामान्य लोक त्यांना वचकून असावेत.

नुकतीच घडलेली एक गोष्ट या बाबतींत सांगण्यासारखी आहे. असें ऐकिवांत आहे कीं गांधीजींशीं कांहीं बाबतींत किशोरलालभाईंचा मतभेद झाला, ह्यामुळें किशोरलालभाईंनीं लगेच आपली आवराआवर केली व सेवाग्रामहून जाण्याचें त्यांचें नक्कीदेखील ठरलें;परंतु तो मतभेद नाहींसा झाल्यामुळें असो किंवा गांधीजींच्या सांगण्यामुळें असो, किशोरलालभाईंनीं सेवाग्राम सोडण्याचें रहित केलें व ते सध्यां तेथेंच आहेत. कदाचित् गांधीजींशीं मतभेद झाल्याची गोष्ट निव्वळ कपोल-कल्पना असेल. दुसऱ्याच कांहीं कारणामुळें त्यांनीं सेवाग्राम सोडण्याचें ठरवलें असेल. परंतु हें मात्र तितकेंच खरें कीं गांधीजींची अमुक एक गोष्ट बरोबर नाहीं, असें दिसल्यास किशोरलालभाई गांधीजींना तसें स्पष्ट सांगितल्यावांचून राहणार नाहींत व ह्या स्पष्ट सांगण्यामुळें गांधीजींचें सान्निध्य एवढेंच काय, त्यांचे अनुयायित्व सोडण्याची पाळी आली, तरी त्याला ते कचरणार नाहींत. किशोरलालभाईंची निर्भयता आणि स्पष्टवक्तेपणा खरोखरच अपूर्व आहे, असें मला वाटतें.

## लेखन, वाचन आणि मनन : ७ :

लोकांत मिसळण्याची किशोरलालभाईंची वृत्ति नाहीं. ते अध्ययनशील व एकांतवासप्रिय आहेत. पुढारीपणा किंवा लोकप्रियता प्राप्त करण्याचें ह्यामुळें त्यांच्या कधीं मनांत येत नसावें आणि त्यांच्या शारीरिक अशक्तपणामुळें तें त्यांना शक्य देखील नाहीं. परंतु समजा, लोकप्रियता प्राप्त करण्याचें त्यांनीं मनांत आणलें, तरी त्यांच्या

स्पष्टवक्तेपणामुळें तें त्यांना कितपत साधेल, याची शंका आहे. अंथरुणावर पडल्या पडल्या लेखन, वाचन आणि मनन करणें त्यांचें चालू असतें. गांधीजींच्या विचारांची किशोरलालभाईंनीं आपल्या लेखांतून आणि पुस्तकांतून जी शास्त्रशुद्ध मांडणी केली आहे, तिच्यामुळें गांधीजींचे उपनिषदांप्रमाणें गूढ असलेले विचार स्पष्ट समजण्याला विशेष मदत झाली आहे, यांत संदेह नाहीं.

## बुद्धि व श्रद्धा यांचा समन्वय :८:

किशोरलालभाईंना मूर्तिपूजा पसंत नसली, तरी ईश्वरभक्ति, प्रार्थना, संतवचनें, गुरूपदेश ह्यांवर त्यांची श्रद्धा आहे. मुंबईचे प्रसिद्ध भगवद्भक्त श्रीनाथमहाराज यांच्याकडून त्यांनीं गुरूपदेश घेतला असून कांहीं विशेष प्रश्न असले, म्हणजे किशोरलालभाई त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय राहत नाहींत. अशा प्रकारें किशोरलालभाई जितके बुद्धिवादी, तितकेच श्रद्धाळूहि आहेत, असें दिसून येईल. बुद्धीला श्रद्धेचें अधिष्ठान नसल्यास सुकाणू नसलेल्या नावेप्रमाणें किंवा लगाम नसलेल्या घोड्याप्रमाणें बुद्धि वाहवत जाते, असें म्हणतात. ह्यामुळें किशोरलालभाईंमध्यें दिसून येणारा बुद्धि व श्रद्धा यांचा हा समन्वय ह्यांच्या विशिष्ट व्यक्तित्वाची खूण असेल, असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं.

ह्या प्रकरणाला 'सेवाग्रामच्या तीन शिला' असें नांव मीं दिलें आहे. ज्यांच्या संसर्गामुळें वर उल्लेखिलेल्या पहिल्या शिलेला कांहीं इतिहास निर्माण झाला, त्यांचें किंचित् दर्शन वर केलें; आतां दुसऱ्या ओट्याकडे आपण वळूं. किशोरलालभाईंच्या ओट्यापासून दोन फर्लांगांवर ज्या ठिकाणीं सडक उत्तरेकडून पश्चिमेकडे वळते, तेथें हा दुसरा एक ओटा आहे.

## कस्तुरबांचा ओटा : ९ :

हा दुसरा ओटा किशोरलालभाईंच्या ओट्यासारखाच असला, तरी तो ज्या जागेवर आहे, ती जागा मोठी नामी आहे. रस्त्याच्या उंच माथ्यावर व वळणाच्या मध्यभागीं तो असल्यामुळें तेथें बसलें म्हणजे दूरवर पसरलेला आश्रमाचा देखावा मोठा सुंदर दिसतो. आश्रमाचीं तीं लहान लहान कौलारू घरें, मध्येंच कांहीं नवीनच लावलेले निलगिरीचे सुरूसारखे उंच वृक्ष व त्यामधून वळण घेत जाणारी ती सडक! संध्याकाळच्या मंद प्रकाशांत हा देखावा मोठा मनोरम दिसतो. दुसऱ्या बाजूला खादी विद्यालयाची दगडी इमारत व तिच्या आजूबाजूला उभी झालेली वसाहत समोरच नजरेस पडते. असा हा ओटा मोठ्या रम्य स्थळीं बांधण्यांत आला असल्यामुळें फिरावयाला जातांना थोडा वेळ तेथें प्रत्येकाला बसावेंसें वाटत असल्यास नवल नाहीं. चांदण्या रात्रीं ह्या ओट्याजवळून गेल्यास एखादें तरुण जोडपें तेथें बसून विश्रब्धालाप करीत असलेलें तुम्हाला नेहमीं आढळेल. खादी विद्यालयाच्या विस्तारामुळें या ओट्याचें एकांत स्वरूप आतां फारसें राहिलें नाहीं; तरी अजूनहि प्रेक्षकाला त्याचें आकर्षण वाटल्याशिवाय राहत नाहीं.

हा ओटा कस्तुरबांना बसण्याकरतां बांधण्यांत आला होता. कस्तुरबा सेवाग्राममध्यें असतांना फिरायला निघाल्या, म्हणजे आश्रम-वासी मुलींसमवेत येथें बसत व बापूजी थोडे पुढें जाऊन परत फिरले म्हणजे त्यांच्यामागें आश्रमांत जात. ह्या ओट्याशीं कस्तुरबांची स्मृति निगडित झाली आहे म्हणून कीं काय, बापूजींना देखील त्याचें आकर्षण वाटत असावें असें वाटतें. बापूजी ह्या ओट्यावर अर्थात् कधीं बसले नाहींत; परंतु फिरावयाला जातांना ह्याकडे त्यांचें लक्ष गेल्याशिवाय राहत नाहीं. २६ जानेवारी १९४५ ला स्वातंत्र्य



दिनाच्या दिवशीं खादी विद्यालयांत नवीनच उभारलेल्या ध्वजस्तंभावर प्रचंड जनसमुदायाच्या रेखाबद्ध दृश्यासमोर उत्तुंग तिरंगी झेंडा फडकविण्यांत आला. सेवाग्राममधील तें भव्य दृश्य पाहण्याकरतां बापूजी याच कस्तुरबांच्या ओट्यावर उभे राहिले होते. झेंडावंदनाच्या त्या क्षणीं भावनावश झालेल्या लोकांच्या चक्षुपटलावर कस्तुरबांच्या उंच ओट्यावर उभी राहिलेली बापूजींची ती कृश मूर्ति नेहमीं कोरलेली राहील. बापूजी जेलमधून सुटल्यानंतर ऑगस्ट १९४४ मध्यें जेव्हां प्रथमच सेवाग्रामला आले, तेव्हां कस्तुरबांच्या ह्या ओट्याजवळ उभारलेल्या विशाल कमानीखालीं सेवाग्रामच्या लोकांनीं त्यांचें स्वागत केलें होतें. कस्तुरबांच्या ह्या ओट्याभोंवतीं अशा अनेक आठवणी गुंफलेल्या आहेत आणि म्हणूनच हा ओटा सेवाग्रामची एक ऐतिहासिक वस्तु होऊन बसेल असें म्हणायला हरकत नाहीं.

## बापूजींचा काळा पाषाण : १० :

पुढें दोन फर्लांगावरच तिसरी शिला आहे. ही शिला म्हणजे पूर्वीप्रमाणें बांधलेला ओटा नसून कमरेइतका उंच एक काळा दगड आहे. हा दगड तेथें कशाकरतां रोवण्यांत आला असावा हें

नक्की सांगतां येत नाहीं. गांवाच्या हद्दीची किंवा सडकेची कांहीं खूण म्हणून तो तेथें असावा. ह्या दगडाला बापूजींनीं एक विशिष्ट महत्त्व प्राप्त करून दिलें आहे. ते सडकेनें फिरायला आले म्हणजे त्यांची परत फिरण्याची खूण म्हणून हा दगड त्यांनीं ठरवला होता. ह्या दगडाजवळ आलें म्हणजे पुढें न जातां ते आश्रमाकडे परत फिरत. ह्यामुळें बापूजींचा दगड म्हणून लोक त्याला संबोधूं लागले होते.

आज जाणाऱ्या येणाऱ्यांची गर्दी, वर्दळ व धूळ असल्यामुळें बापूजी या सडकेनें बहुतेक फिरावयाला येत नाहींत. आश्रमाच्या मागें शेतें व भाजीपाल्याचे मळे व संत्र्यांच्या बगीच्यांतून आतां त्यांनीं आपला फिरण्याचा मार्ग केलेला आहे. सडकेपेक्षां हा नवा रस्ता खरोखरच नयनरम्य व शांत आहे. परंतु १९४२ पूर्वी ज्या वेळीं सेवाग्रामला अनेक संस्थांचें जाळें इतकें वाढलें नव्हतें व सडकेवर विशेष रहदारी नव्हती, त्या वेळीं बापूजी ह्या सडकेनेंच रोज फिरावयाला जात आणि त्यामुळें त्या काळ्या पाषाणाला एक विशिष्ट महत्त्व प्राप्त झालें होतें. सेवाग्राममध्यें नवीन आलेल्या लोकांना ही पूर्वींची माहिती नाहीं व त्यामुळें ह्या दगडाचें महत्त्वहि त्यांना वाटणार नाहीं. कदाचित् रेव्हिन्यू खात्याचे किंवा पी. डब्ल्यू. डी. खात्याच्या लोकांनीं हा दगड उभा केला असेल. ते तो काढूनहि टाकतील; परंतु तो दगड तेथें न राहिला तरी त्याची आठवण त्या जागेवरून गेलें असतां कोणालाहि झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## मेरा पीछा कर रहे हो। : ११ :

ह्या दगडाजवळ आले म्हणजे बापूजी ठराविक वळण घेऊन कसे मागें फिरत, त्यामुळें त्यांच्यामागून चालणारे लोक त्यांच्यापुढें आल्या-मुळें बापूजींना पुढें जाण्याकरतां कसे वाजूला होत, आपल्यामागें

कोण कोण आहेत हें दिसून त्यांत एखादा ओळखीचा चेहरा दिसला म्हणजे ते कसे हंसत किंवा एखादे वेळीं त्यांच्याशीं ' तुम भी मेरा पीछा कर रहे हो ' म्हणून कसा विनोद करीत, याचे निरनिराळे प्रसंग डोळ्यांपुढें उभे राहतात.

सेवाग्राममधील तीन शिळांची अशी ही गोष्ट आहे.

# १४ चिमूरचा तपस्वी

## असंस्कृत वेषांतील सुसंस्कृत महात्मा : १ :

आश्रमांतील व्यक्तींच्या बाबतींत भनसाळीभाईंचें चरित्र सांगितल्याशिवाय पूर्णता येणार नाहीं. बापूजींजवळ ज्या दोनचार अद्भुत व्यक्ति आहेत, त्यांत भनसाळींचें नांव प्रामुख्यानें घेतलें पाहिजे. ऑगस्ट १९४२ पर्यंत भनसाळी ही एक अज्ञात व्यक्ति होती. परंतु चिमूर प्रकरणामुळें एकाएकीं त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे.

एके काळीं प्रोफेसर असलेले भनसाळी आज एखाद्या खेडवळ बैराग्याप्रमाणें राहत आहेत. खादीची एक मळकट लुंगी कशीबशी वेढलेली, बोटभर दाडी वाढवलेली, डोक्याचे केस तेल किंवा कंगव्याचा संस्कार नसल्यानें रुक्ष झालेले, असें त्यांचें आजचें स्वरूप आहे. असा हा असंस्कृत दिसणारा मनुष्य म्हणजेच प्रसिद्ध भनसाळी होत, हें कोणाला सांगितल्यास क्षणभर त्याचा त्यावर विश्वास देखील बसणार नाहीं.

## देहदंडनाची साधना : २ :

साबरमतीला बापूजींकडे आल्यानंतर त्यांनीं आपल्या साधनेला सुरुवात केली. प्रथम त्यांनीं आपली राहणी बदलली. जैन यतीप्रमाणें ते राहूं लागले. अनेक दिवस उपवास करावेत, अत्यल्प खावें व धर्मग्रंथांचें अध्ययन करावें, हा त्यांचा तेथील कार्यक्रम होता. तेथें त्यांनीं ५७ दिवसांपर्यंत उपवास केलेले आहेत. साबरमती आश्रम बंद झाल्यावर ते तेथून निघाले व ५–६ वर्षें हिमालयाकडे भटकत राहिले. ह्या अज्ञातवासांत अनेक दिवस ते नुसता कडुनिंबाचा पाला



खाऊन राहिले होते. मौन पालन करण्याकरतां त्यांनीं आपलें तोंडही शिवून घेतलें होतें. ते दिगंबर साधूप्रमाणें नग्न स्थितींत फिरत. असेच ते फिरत फिरत एक दिवस सेवाग्रामला आले व बापूजींच्या आग्रहामुळें तेव्हांपासून ते सेवाग्रामलाच आहेत.

## पोलिसांनीं टोप्या वर केल्या : ३ :

चिमूरच्या वेळचा भनसाळीभाईंचा तो चित्रपट अजून डोळ्यांसमोर ताजा आहे. ब्रिटिश सैन्यानें चिमूरच्या मातृजातीची केलेली विटंबना पाहून भनसाळींच्या आत्म्याला चैन नव्हती. अशा तऱ्हेचे अमानुष अत्याचार करणाऱ्या सरकारच्या पारतंत्र्यांत एक क्षणभर श्वास घेणें

देखील असह्य आहे, असें त्यांना वाटूं लागलें. ह्यामुळें ब्रिटिश राज्यांत जिवंत राहायचें नाहीं, असा भनसाळींनीं निर्धार केला. सरकारनें आपल्याला पकडून जेलमध्यें ठेवावें, म्हणून त्यांनीं अनेक प्रयत्न केले. सुरुवातीला दोन तीन वेळा सरकारनें त्यांना तुरुंगांत टाकलें. तुरुंगांत नेल्याबरोबर भनसाळी निर्जल उपवास सुरू करीत. हा मनुष्य जेलमध्यें ठेवणें बरोबर नाहीं, असें सरकारला लवकरच दिसून आलें व त्यामुळें भनसाळींना जेलमध्यें टाकण्याचें सरकारनें बंद केलें. भनसाळीं-बरोबर इतर मंडळींनीं कांहीं केलें, तर पोलिस त्या मंडळींना पकडून सजा करीत, परंतु भनसाळींना मात्र वाटेल तें करण्याची त्यांनीं पूर्ण मोकळीक ठेवली होती. वर्ध्याला आपणाला कोणी पकडीत नाहीं असें जेव्हां त्यांनीं पाहिलें, तेव्हां भनसाळी दिल्लीला गेले. तेथें श्री. अणे यांच्या घरीं जाऊन त्यांनीं सत्याग्रह सुरू केला. दिल्लीच्या पोलिसांनीं पकडून त्यांना जेलमध्यें ठेवलें. आतां तरी सरकार सोडणार नाहीं, अशी आमची कल्पना होती. पण एक दिवस आम्हीं पाहतों, तो भनसाळीं सेवाग्राममध्यें पुन्हां हजर. तीन चार दिवस दिल्लीला उपवास केल्यावर अखेरीस दिल्लीच्या पोलिसांनीं त्यांना सेवाग्रामला आणून पोंचविलें. भनसाळींना आश्रमांत पोंचविल्यावर आपल्या टोप्या वर करून दिल्लीच्या पोलिस–अधिकाऱ्यांनीं भनसाळींचा निरोप घेतला.

## निर्जल उपवास : ४ :

भनसाळींचें हें जाणें-येणें सेवाग्राममध्यें असणाऱ्या आम्हां लोकांना त्या वेळीं नित्याचेंच झालें होतें. भनसाळींनीं सत्याग्रह करण्याकरतां बाहेर जावें व पोलिसांनीं त्यांना पुन्हां सेवाग्रामला आणून घालावें ! अशा स्थितींतच चिमूरच्या अत्याचाराच्या बातम्या सेवाग्रामला येऊन पोहोंचल्या. सरकारनें आपणाला पकडून जेलमध्यें न्यावें व तेथें

आपण आपला देह विसर्जन करावा, असा भनसाळींनीं निश्चय केला होता. जेलच्या बाहेर उपवास करून देह ठेवूं नये असा भनसाळींना बापूजींचा निरोप होता. त्यामुळें जेलच्या बाहेर उपवास करण्याचें त्यांनीं रहित केलें होतें. परंतु चिमूरची हकीकत ऐकतांच भनसाळी म्हणाले, 'माझा हा देह मला सत्कारणीं लावावयाचा आहे. मातृ-जातीच्या अपमानाचा कलंक जर ह्या देहानें मला थोडाबहुत धुतां आला, तर मी आपणाला धन्य समजेन. ह्या नश्वर देहाची आहुति देण्याला ह्यापेक्षां दुसरी मोठी संधि आणखी कोणची असणार?'

ते लगेच चिमूरला गेले व तेथें बालाजीच्या देवळांत भगवंताच्या मूर्तीसमोर त्यांनीं प्रायोपवेशन सुरू केलें. आपल्या प्राणाचें लवकरच विसर्जन व्हावें, म्हणून अन्नच नव्हे तर पाणी देखील त्यांनीं वर्ज्य केलें. भनसाळींच्या ह्या उपवासामुळें सर्व हिंदुस्थानांत एकच खळबळ उडाली. सरकारनें भनसाळींच्या बातम्या छापण्याची मनाई केली व त्यामुळें सर्व वर्तमानपत्रांनीं हरताळ कसा पाळला, वगैरे गोष्टी सर्वांना माहीतच आहेत.

## चिमूरला जाण्याचा निर्धार : ५ :

चिमूरला उपवास सुरू केल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं चांद्याच्या पोलिसांनीं पकडून भनसाळींना सेवाग्रामला आणून घातलें. ९ ऑगस्ट-पासून चिमूरचा उपवास सुरू करीपर्यंत भनसाळींचे चार–चार पांच–पांच दिवसांचे चार पांच उपवास झाले होते. प्रवास आणि उपवासांनीं आधींच अशक्त झालेल्या अवस्थेंत चिमूरचा हा निर्जल उपवास भनसाळींनीं सुरू केला होता. त्यामुळें भनसाळी जेव्हां पुन्हां चिमूरला जाण्याचें म्हणूं लागले, तेव्हां आश्रमाच्या मंडळींनीं त्यांना पुष्कळ समजाविण्याचा प्रयत्न केला कीं तुम्हांला उपवासच करायचा

असेल, तर तो आतां इथेंच करा. म्हणजे आम्हीं तुमची सेवा करूं शकूं. तुमच्या अशक्त शरीरानें अशा ह्या निर्जल उपवासांत चिमूरला पायीं जाणें शक्य होणार नाहीं.

परंतु भनसाळी हें म्हणणें ऐकायला तयार नव्हते. चिमूरला जाऊन प्राण ठेवायचा त्यांचा निश्चय अढळ होता. जावें, न जावें ह्या चर्चेंत अशा तऱ्हेनें पांच सहा दिवस निघून गेले. भनसाळींच्या निर्जल उपवासाचा नववा दिवस होता. चिमूरला जाण्याचा भनसाळींचा निर्धार पाहून आश्रमांतील एक गृहस्थ त्यांना म्हणाले, ‘ भनसाळीभाई, अशा अशक्त स्थितींत तुम्हांला चिमूरला जाणें शक्य नाहीं. अंथरुणावरून उठण्याची शक्ति देखील आतां तुम्हांला नाहीं, असें आम्हाला वाटतें. तेव्हां तुम्हाला चिमूरला जायचें असेल तर तुम्हीं पाणी घेणें सुरू करा. गुळाचें पाणी घेतलें, तर तम्हीं चिमूरला सहज जाऊं शकाल.’

## गुळाचें पाणी : ६ :

‘ असें आहे ? तर द्या मला गुळाचें पाणी.’—असें म्हणून भनसाळी एक लोटाभर गुळाचें पाणी प्याले व ताडकन् उठून चिमूरच्या रस्त्याला लागले. ह्यानंतर त्यांना थांबविणें कोणाला शक्य झालें नाहीं. नवचैतन्य संचारल्याप्रमाणें झपाझप पावलें टाकीत ते थोड्याच वेळांत वर्ध्याला जाऊन पोंचले. वर्ध्याला श्री. जानकीदेवी बजाज यांनीं त्यांना पुन्हां समजावलें. परंतु व्यर्थ. भनसाळींना उपवासापासून नाहीं तरी चिमूरला जाण्यापासून परावृत्त करावें, असें सर्वांना वाटत होतें. ते असेच चालत गेले, तर रस्त्यांतच त्यांचा शरीरपात होणार, हें निश्चित दिसत होतें. ह्यामुळें केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन वर्ध्याचे एक डॉक्टर त्यांना म्हणाले, ‘ एवींतेवीं सेवाग्रामला गुळाचें पाणी तुम्हीं घेतलेंच आहे. तेव्हां तुमचें निर्जल प्रायोपवेशन आतां राहिलें नाहीं.

तुम्हीं आपला उपवास मोडलाच आहे. तेव्हां आतां चिमूरला जाण्यां-तच काय स्वारस्य आहे ?'

'मी गुळाचें पाणी घेतलें? केव्हां? सेवाग्रामला?' भनसाळी आश्चर्यानें म्हणाले. आपण आज सेवाग्रामहून निघतांना गुळाचें पाणी घेतलें, याचें त्यांना स्मरणदेखील नव्हतें. खरी गोष्ट अशी होती कीं एका मानसिक तंद्रीमध्यें नकळत त्यांनीं तें पाणी घेतलें होतें. आपण निर्जल उपवास करीत आहोंत, गुळाचें पाणी घेतल्यानें आपला उपवास मोडेल, याचें त्यांना भानच नव्हतें. एखाद्या अजाण बालकाप्रमाणें त्यांच्या हातून तें घडलें, असें म्हणतां येईल.

## स्वर्गारोहण : ७ :

लगेच आपल्याबरोबर चिमूरला येत असलेल्या आश्रमांतील गृहस्थाकडे वळून व सर्वांना उद्देशून ते म्हणाले, 'माझें तुम्हांला हें निर्वाणीचें सांगणें आहे कीं मी मरत असतांना जरी तुम्हाकडे मीं पाणी मागितलें, तरी तुम्हीं तें मला देऊं नका. तुम्हीं मला पाणी द्याल, तर माझे तुम्ही जन्माचे शत्रु झालांत असें मी समजेन.'— असें म्हणून त्यांनीं आपला चिमूरचा प्रवास सुरू केला. सेवाग्रामपासून चिमूर जवळजवळ ऐशीं मैल आहे. हे ऐशीं मैल अनवाणी चालत भनसाळींनीं बरोबर तीन दिवसांत संपवले व ते चिमूरला येऊन दाखल झाले. नऊ दिवसांच्या निर्जल उपवासानंतर पोटांत पाण्याचा एक थेंब न घालतां ऐशीं मैल पायीं चालून जाणें हें एक अलौकिक दिव्य नाहीं काय ? एक दोन मैल जातांच भनसाळी मूर्च्छित होऊन पडतील, त्यांचे पाय पुढें चालणार नाहींत, असें डॉक्टरांना वाटत होतें. परंतु ८० मैल चालून भनसाळीभाई चिमूरला जाऊन पोंहोंचले असें जेव्हां त्यांना कळलें, तेव्हां आश्चर्यानें त्यांनीं तोंडांत बोटें घातलीं. भनसाळींचें हें मानवी शरीर नाहीं, वेगळ्याच तत्त्वांचें

तें बनलें आहे, मानवी वैद्यकाला तें अनाकलनीय आहे, असें त्या डॉक्टरांना वाटलें असल्यास नवल नाहीं. भनसाळींच्या ह्या दिव्य शक्तीपुढें साऱ्या विश्वानें नतमस्तक व्हावें, असेंच त्यांचें तें अलौकिक कृत्य होतें.

## मृत्यूनिमित्त आनंद करा : ८ :

भनसाळी चिमूरला पोंचतांच पोलिसांनीं त्यांना पकडून पुन्हा सेवाग्रामला आणून पोंचविलें आणि भनसाळी न थांबतां पुन्हां चिमूरला जाण्याला निघाले. निर्जल उपवास सुरू करून त्यांना आतां चौदा दिवस झाले होते. हातांत काठी घेऊन हळूहळू एक एक पाय टाकीत त्यांनीं आपला चिमूरचा हा तिसरा प्रवास सुरू केला. प्रवास कसला ? तें त्यांचें स्वर्गारोहणच होतें. भनसाळींच्या ह्या प्रयोपवेशनाची हकीकत ऐकून गुजराथ आणि मुंबईहून भनसाळींचे बहीणभाऊ त्यांच्या भेटीला आले होते. भनसाळी चिमूरला निघालेले पाहून त्यांची बहीण रडूं लागली; तेव्हां ते बहिणीला म्हणाले, 'माझ्याकरतां तूं शोक केल्यास मला बरें वाटणार नाहीं. माझें हें मर्त्य शरीर सत्कारणीं लागत आहे, याबद्दल तुला आनंद वाटला पाहिजे. माझी इच्छा आहे कीं मीं मेल्यानंतर तुम्हीं सर्वांनीं आनंद करावा. माझ्या मरणानिमित्त तुम्हीं पंचपक्वान्नें करावींत व सण म्हणून तो दिवस आनंदांत घालवावा.'

त्यावेळेचें तें दृश्य कोणी कधीं तरी विसरणें शक्य आहे काय ? काव्यांत अनेक उदात्त प्रसंगांचीं वर्णनें मीं वाचलीं होतीं; परंतु तेव्हांचें तें दृश्य कांहीं अलौकिक होतें. तो करुणरम्य दैवी देखावा इथेंच ह्या सेवाग्राममध्यें घडला, हें आज खरें देखील वाटत नाहीं.

## मृत शरीर पशुपक्ष्यांना द्या : ९ :

आपण मेल्यानंतर आपल्या मृत शरीराचें दहन न करतां तें पशुपक्ष्यांना खाण्याकरितां तसेंच टाकून देण्यांत यावें, असें भनसाळींनीं सांगून, ठेवलें होतें. मेल्यानंतर देखील आपल्या शरीराचा उपयोग व्हावा, अशी त्या महात्म्याची इच्छा होती.

अश्रुपूर्ण नेत्रांनीं आम्हीं त्यांचें शेवटचें दर्शन घेतलें. पुन्हां त्यांची भेट होईल, असें आम्हांला तेव्हां वाटलें नाहीं.

## दैवी चमत्कार : १० :

चिमूरच्या बाबतींत सरकारशीं तडजोड करून भनसाळींचा प्राण वांचविण्याचे प्रयत्न झाल्यास करून पहावेत म्हणून श्री. कन्हय्यालाल मुनशी वगैरे कांहीं पुढारी सेवाग्रामला आले होते. ते भनसाळींना चिमूरच्या रस्त्यावर भेटले. त्यांनीं भनसाळींची समजूत काढण्याचा निर्वाणीचा यत्न केला. ‘ चिमूरच्या बाबतींत सरकारशीं बोलणें करीत आहोंत, परंतु त्याकरतां तुम्हीं आम्हांला थोडा वेळ द्या. तुम्हीं आतांच प्राण सोडलेत, तर आम्हांला काय करतां येणार ?’ भनसाळींनीं त्यांचें हें म्हणणें कबूल केलें. ‘ मी पाणी घेतों, तुम्हीं प्रयत्न करा. ’ नंतर त्यांनीं आम्हांला सांगितलें, ‘ चिमूरच्या रस्त्यावर बारा मैल भनसाळी गेले होते. पंधरा दिवसांनंतर त्यांनीं पहिल्यानेंच पाणी घेतलें; रस्त्याला लागून असलेल्या बगीच्यांतील एका विहिरीवर दोन तीन लोटे पाणी पिऊन त्यांनीं पाणी न घेण्याचा आपला नियम सोडला. ’

पाणी प्याल्यानंतर ते एक मैलहि चालूं शकले नाहींत. बैलगाडींत घालून चिमूरकडे त्यांना चालविण्यांत आलें. यावेळेस पोलिसांनीं त्यांना चिमूरला पोंहोंचूं दिलें नाहीं. चांदा जिल्ह्याच्या सरहद्दीवर पोंचतांच

त्यांना पकडून सेवाग्रामला आणून सोडण्यांत आलें. भनसाळींना आतां उठण्याची शक्ति राहिली नव्हती. त्यांना वर्ध्याला जमनालालजींच्या घरीं ठेवण्यांत आलें. साऱ्या हिंदुस्थानांतून स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी भनसाळींच्या दर्शनाला येऊं लागल्या. त्यावेळेस भनसाळींमुळें जमनालालजींचें घर तीर्थयात्रेचें स्थान झालें होतें.

सरकारशीं तडजोड झाल्यानंतर भनसाळींनीं आपला उपवास सोडला. त्यांचा हा उपवास त्रेसष्ट दिवसांचा झाला होता. ह्यापैकीं पहिल्या पंधरा दिवसांचा उपवास निर्जल होता. त्याचप्रमाणें ह्या त्रेसष्ट दिवसांच्या दीर्घकालावधींत अखंड उपवासापूर्वीं चार-चार पांच-पांच दिवसांचे चार पांच उपवास त्यांनीं केलेले होते, आणि उपवासाच्या दिवसांत शें-दीडशें मैल अनवाणी पायीं प्रवासहि त्यांनीं केला होता. हें पाहिलें म्हणजे भनसाळींचा देह हाडामासाचा बनला नसून दैवी वज्राचा बनला असावा, असें वाटूं लागतें. प्राचीन ऋषींच्या तपस्वितेचा दैवी चमत्कार दाखविणारे भनसाळी खरोखरच अमर होत !

# १५ भनसाळींचा अद्भुत दिनक्रम

## मुक्त द्वार

: १ :

सेवाग्रामला येणाऱ्या लोकांचीं आज दोन पूजास्थानें आहेत. एक बापूजी व दुसरें भनसाळी. बापूजींचें व भनसाळींचें दर्शन झाल्याशिवाय येथें येणाऱ्या यात्रेकरूंची सार्थकता होत नाहीं. परंतु दर्शनाच्या बाबतींत बापूजी आणि भनसाळी या दोघांत साम्य असें मुळींच नाहीं. बापूजींचें ओझरतें दर्शन मिळण्याचीहि मारामार पडते. बापूजी आपल्या कुटींत—कामांत नेहमीं निमग्न असतात. त्यांच्या कुटीच्या आवाराच्या आंत शिरकाव होणेंहि पुष्कळदां दुरापास्त. कारण आश्रमवासीयांचा तेथें असलेला सतत पहारा. परवानगीशिवाय बापूजींच्या झोपडीच्या आवारांत जायचें, म्हणजे देखील जरा जपूनच जावें लागतें. बापूजींच्या बाबतींत इतकी काळजी घेणें आवश्यकच आहे. तसें न केल्यास दर्शनेच्छु लोकांच्या वर्दळीमुळें त्यांना क्षणभर देखील निवांत शांतता मिळणें शक्य होणार नाहीं व त्यामुळें ते कोणतेंहि काम करूं शकणार नाहींत. त्यांच्या उलट भनसाळींचें आहे. त्यांच्याकडे कोणालाहि मज्जाव नाहीं. कोणीहि जा, केंव्हांहि जा, तुमचें स्वागत करण्याला ते नेहमीं तयार असतात. आश्रमाच्या स्वयंपाकघराच्या समोरील उघड्या जागेत शिंदीच्या चटईवर बसून नेहमीं कोणाला तरी शिकवीत असलेले तुम्हांला ते आढळतील.

## उत्कृष्ट शिक्षक

: २ :

भनसाळी एक उत्कृष्ट शिक्षक आहेत. सकाळीं सहा वाजेपासून ते रात्रीं दहा वाजेपर्यंत त्यांचें शिकविणें सतत चालू असतें. मध्यें एक दोन तास शौच-मुखमार्जन व स्नानाकरितां जे काय ते जात

असतील तेवढेंच. चार पांच तास शिकविले कीं आजकालच्या शिक्षकांना थकवा येतो. यापेक्षां जास्त वेळ शिकवण्याचें काम मनुष्य चांगल्या प्रकारें करूं शकणार नाहीं, असें शिक्षणतज्ज्ञ म्हणतात; परंतु सतत बारा बारा तास शिकवण्याची भनसाळींची शक्ति पाहिली, म्हणजे मनुष्य थक्क झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यांचें हें शिकवणेंहि असें तसें नाहीं. अगदीं समरस होऊन ते शिकवतात. इतक्या मनोरंजक तऱ्हेनें ते शिकवतात, कीं वेळ संपला तरी शिकणाऱ्या लोकांना त्यांच्याजवळून उठावेंसें वाटत नाहीं. 'आम्हांला जास्त वेळ द्या' म्हणून भनसाळींच्या ते मागें लागतात.

## विषयाचें आणि विद्यार्थ्यांचें वैचित्र्य : ३ :

भनसाळींच्या जवळ शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचें वैचित्र्यहि मोठें विलक्षण आहे. एम्. ए., बी. ए. झालेल्या एखाद्या तरुणाला अभिजात इंग्लिश शिकवीत असतांना तुम्हांला ते दिसतील, तों थोड्या वेळानें सेवाग्राममधील अगदीं अशिक्षित अशा एखाद्या मजुराला तन्मय होऊन अ-आ-इ-ई शिकवीत असलेले दिसून येतील. लहान मुलापासून तों म्हाताऱ्यापर्यंत व अशिक्षितापासून तों उच्च शिक्षण घेतलेल्या पदवीधरापर्यंत सर्व तऱ्हेचे लोक भनसाळींच्या जवळ शिकत असलेले तुम्हांला आढळून येतील.

बरें, त्यांचे शिकवण्याचे विषयहि किती भिन्नभिन्न आहेत पाहा. ते मराठी शिकवतात; गुजराथी शिकवतात; हिंदी शिकवतात; इंग्रजी शिकवतात; इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राजकारण कोणताहि विषय त्यांना तुम्हीं शिकवायला सांगा, ते त्याला तयारच. हे सर्व विषय इतक्या उत्तम तऱ्हेनें ते शिकवतात, कीं जो जो त्यांच्याजवळ शिकतो, तो तो अगदीं खूष होऊन परत जातो. त्यांच्या शारीरिक आणि बौद्धिक शक्तींना कांहीं सीमा आहे कीं नाहीं, हेंच कांहीं कळत नाहीं !

## अंगाखांद्यावर शिक्षण

: ४ :

सर्व प्रकारच्या लोकांना ते शिकवीत असले, तरी लहान मुलांना शिकवण्याची त्यांना विशेष आवड आहे. ‘मोठ्यांना शिकवून काय व्हायचें आहे ? लहान मुलांना शिकवलें तर देशाला त्यांचा कांहीं तरी उपयोग होण्याची आशा आहे’ असें ते म्हणतात. लहान मुलांना शिकवण्याची त्यांची हातोटी खरोखरच वाखाणण्यासारखी आहे.

भनसाळी लहान मुलांमध्यें इतके मिसळतात कीं कांहीं विचारूं नये. ते लहान मुलांना शिकवतात, त्या वेळचें दृश्य मोठें पाहाण्यासारखें असतें. ते मध्यें बसले आहेत, कांहीं मुलें त्यांच्या खांद्यावर चढलीं आहेत, तर कांहीं त्यांच्या मांडीवर बसलीं आहेत व भनसाळी त्यांना गोष्टी सांगत आहेत किंवा पुस्तक वाचून दाखवीत आहेत. मध्येंच भनसाळी शिकवलेल्या गोष्टींवर प्रश्न विचारीत आहेत व मुलें उत्तरें देत आहेत, मध्येंच कांहीं विनोदी प्रसंग निर्माण होऊन एकच हंशा निर्माण झाला आहे, व मुलांबरोबर भनसाळीही मोठमोठ्यानें हंसत आहेत !

भनसाळींचें शिकवणें हळू कधींच नसतें. मोठमोठ्यानें ते शिकवीत असतात. त्यांच्या त्या आवाजानें व पहाडी हंसण्यानें आश्रम दुमदुमून जातो. आश्रमाची प्रार्थना चालू असली, तरी भनसाळींचें शिकवणें बंद नसतें. ते कधीं प्रार्थनेला जात नाहींत किंवा कधीं कोणत्या कार्यक्रमाला हजर रहात नाहींत. शिकवणें, काम करीत राहणें हीच त्यांची प्रार्थना. दुसरी प्रार्थना जणूं काय त्यांना माहीतच नाहीं.

## मुलांचे आवडते गुरुजी

: ५ :

मुलांवर भनसाळींचें अतिशय प्रेम. कोणी मुलगा एखाद्या दिवशीं शिकण्याला आला नाहीं, तर ते तो कां आला नाहीं, म्हणून घरीं

विचारायला येतील. एकदां धांवत असतां एक मुलगा पडला व त्याला थोडेंसें लागलें, तेव्हां भनसाळींनीं स्वतः हातावर उचलून त्याला त्यांच्या घरीं आणून पोंचविलें. आश्रमांतील मुलें शाळेंत जात नाहींत. त्यांना जा म्हटलें तर, 'भनसाळीभाईकडे शिकायला जात असल्यावर शाळेंत जाण्याचें काय कारण?' म्हणून ते म्हणतात. 'भनसाळीभाईसारखे शाळेंतील गुरुजी थोडेच शिकवतात?' त्यांचें हें म्हणणें खोडून काढणें शक्यच नाहीं. लहान मुलांना शिकण्याचा किती कंटाळा असतो, हें सांगायला नकोच. परंतु आश्रमांतील लहान मुलें मोठ्या आनंदानें त्यांच्याकडे शिकण्याला जातात. लहान मुलांचें ते अत्यंत आवडते शिक्षक आहेत.

## भाजीची टोपली व दुधाचें पातेलें : ६ :

शिक्षणकार्याबरोबर भनसाळींचे दोन उद्योग सतत चालू असतात. चरख्यावर सूत कांतणें हा एक उद्योग व दुसरा म्हणजे खाणें. एका बाजूला त्यांचा चरखा पडलेला असतो व दुसऱ्या बाजूला फळें, भाज्या वगैरेंनीं भरलेली एक टोपली व दुधाचें एक पातेलें ठेवलेलें असतें. एकीकडे त्यांचा चरखा चालला असतो तर दुसरीकडे खाण्याचें कामहि सुरू असतें. आणि ह्या दोन्ही कामाबरोबर शिकवणें तर आहेच. शिकवतां शिकवतां दिवसभरांत एक दोन गुंड्या सूत त्यांचें सहज तयार होतें. दोन-दोन हातांच्या दोन लुंग्या व हात-हाताच्या दोन लंगोट्या. एवढ्या कपड्याकरतां लागणारें सूत एका महिन्यांतच ते कांतून टाकतात. परंतु स्वतःच्या कपड्याकरतां थोडेंच ते सूत कांततात? कोणतीहि जाडी भरडी खादी त्यांना मिळाली, म्हणजे झालें. जें कांहीं सूत ते कांततात, तें सर्व ते आश्रमाला देऊन टाकतात.

## विलक्षण पचनशक्ति : ७ :

भनसाळींची पचनशक्ति अद्भुत आहे. नुसता कडुनिंबाचा पाला खाऊन कित्येक दिवस ते राहिले होते, हें मागें सांगितलेंच आहे. अजूनदेखील ते कडुनिंबाचा पाला रोज खात असतात. शिजविलेलें अन्न ते घेत नाहींत. फक्त कच्ची भाजी आणि असलीं तर फळें व दूध हें त्यांचें रोजचें खाणें. मुळें, गाजरें, वांगीं, मेथी, चाकवत वगैरे फळभाज्या व पालेभाज्या एका टोपलींत त्यांच्याजवळ ठेवलेल्या असतात. त्या चिरण्याकरतां एक चाकूहि त्यांत पडलेला असतो. चाकूनें छिलून व तुकडे करून मधून मधून ते ती भाजी सतत खात असतात आणि जवळच ठेवलेल्या गंजांतून प्याला प्याला दूध पीत राहातात. त्यांना भाजी व दूध किती लागत असेल, असें तुम्हांला वाटतें? दिवसांतून पांच-सहा शेर भाजी व दहा-बारा शेर दूध त्यांना सहज लागतें. कांहीं दिवस मलई काढलेलें दूध ते घेत असत, तेव्हां २०–२५ शेर दूध त्यांना लागत असे. दूध आणि भाजी कमी असली, तर त्याच्या भरपाईकरतां तीळ, भुईमूग, वगैरेंची ढेप ते खातात. त्यांचें हें लोकविलक्षण व अजस्र खाणें पाहिलें म्हणजे त्यांच्या पचनशक्तीचें आश्चर्य वाटतें. आश्रमांत आज जरी ते दूध व भाजी खात असले, तरी हेंच अन्न त्यांना पाहिजे, असें कांहीं नाहीं. जें मिळेल तें खाण्याला त्यांची तयारी असते व सर्व कांहीं त्यांना पचतें.

चिमूरच्या त्रेसष्ट दिवसांच्या अमानुष उपवासानंतर कच्चें गव्हाचें पीठ पाण्यांत कालवून उपवास सोडण्याला ते तयार झाले होते. डॉक्टरनीं त्यांना पुष्कळ समजावलें, परंतु ते ऐकेनात. 'इतके उपवास झाले, म्हणून काय झालें? आजहि मी कच्चें पीठ पचवूं शकतों' ते डॉक्टरांना म्हणाले. अखेरीस डॉक्टरांनीं त्यांना निक्षून

सांगितलें कीं 'तुम्हीं वाटेल तें करा, त्याची जबाबदारी आमच्यावर नाहीं. यावेळेस तुम्हीं नुसतें पीठ घेतलें, तर तें प्राणघातक झाल्या-शिवाय राहणार नाहीं, हें आम्हांला स्पष्ट दिसत आहे.' सर्वांच्या आग्रहामुळें त्या दिवशीं त्यांनीं आपला हट्ट चालवला नाहीं, तरी उपवास सोडून दहा-बारा दिवस झाले नाहींत, तोंच त्यांनीं आपलें अन्न पूर्ववत् सुरू केलें.

## वजन वाढूं नये म्हणून उपवास : ८ :

उपवासापूर्वी त्यांचें वजन एकशेंतीस होतें. त्रेसष्ट दिवसांच्या उपवासानंतर उपवास सोडण्याच्या आधीं वजन केलें असतां तें फक्त सदुसष्ट पौंड भरलें. म्हणजे उपवासामुळें त्यांचें जवळ जवळ अर्धें वजन कमी झालें होतें. त्यावेळेस त्यांचें शरीर म्हणजे कातडीनें झांकलेला हाडांचा नुसता सांपळा होता. इतकें झाल्यानंतर देखील फक्त दोन महिन्यांत त्यांनीं तें सर्व वजन भरून काढलें. आज त्यांच्याकडे पाहिलें, तर या शरीरांत थोड्याच दिवसांपूर्वीं केवळ हाडांचा सांगाडा तेवढा राहिलेला होता हें कुणाला खरें वाटणार नाहीं. इतकी उत्तम प्रकृति त्यांची आज आहे. त्यांची स्थूल मनुष्यांतच गणना करावी लागेल. आज त्यांचें वजन १३० पौंडांच्यापेक्षांहि जास्त आहे. आश्रमांत राहणारे कित्येक लोक आपलें वजन वाढावें, म्हणून किती खटपट आणि मेहनत घेत असतात! दूध, फळें, लोणी वगैरे नाना-तऱ्हेचे पौष्टिक आहार घेऊन व शरीराला पूर्ण विश्रांति देऊन चार-दोन पौंड वजन वाढलें, तरी पुष्कळ झालें, असें त्यांना वाटतें. परंतु भनसाळींचें अगदीं त्याच्या उलट आहे. वजन वाढवण्याऐवजीं वजन कमी करण्याकडे त्यांना लक्ष द्यावें लागतें. वजन जास्त होऊं नये, म्हणून ते दोन-दोन चार-चार दिवसांचे मधून मधून उपवास करीत असतात. आहे ना भनसाळींची अद्भुत शक्ति?

## निरहंकार वृत्ति

: ९ :

भनसाळींनीं अनेक अलौकिक गोष्टी केल्या आहेत. असें असलें, तरी मोठेपणाच्या दांभिकतेचा त्यांच्यांत लवलेशहि नाहीं. नम्रतेची ते मूर्तिमंत प्रतिमा आहेत. कोणी त्यांना मोठेपणा देऊं लागला किंवा कोणी त्यांची स्तुति करूं लागला, तर त्यांना अतिशय संकोच वाटतो. आपलें पूर्वचरित्र सांगण्याचें देखील तें टाळतात. रामकृष्ण परमहंसांच्या चेहऱ्यावर जो अत्यंत निरहंकार वृत्तीचा भाव दिसून येतो, तोच भाव भनसाळींच्या चेहऱ्यावर उमटलेला तुम्हांला आढळून येईल ! मी म्हणून कोणी आहें, याची जणूं काय त्यांना जाणीवच नाहीं.

एकदां पुण्याचे एक गृहस्थ सेवाग्रामला आले होते. त्यांना मी भनसाळींकडे घेऊन गेलों. भनसाळींना ते म्हणाले, ' आपलं नांव आम्ही जेलमध्यें असतांना पुष्कळ ऐकलं. आपल्या उपवासांत आमचं सारं लक्ष आपल्याकडे लागलं होतं. एक दिवस जेलमध्यें बातमी आली, कीं उपवासांत आपलं देहावसान झालं. त्या दिवशीं आम्ही सर्वांनीं उपवास देखील केला. परंतु नंतर लवकरच आपला उपवास संपल्याची व आपण सुखरूप असल्याची बातमी आम्हांला कळली. त्या दिवशीं आम्हांला किती आनंद झाला, हें सांगतां येणार नाहीं. तेव्हांपासून आपल्या दर्शनाची इच्छा होती, ती आज पूर्ण होत आहे. ' ही हकीकत सांगितल्यानंतर त्यांनीं भनसाळींना विचारलें, ' आपण यापूर्वी अहमदाबादला प्रोफेसर होतां, नाहीं ? '

हा प्रश्न ऐकतांच मनावर जणूं काय आघात झाल्याप्रमाणें कातर स्वरांत नम्रपणें भनसाळी त्यांना म्हणाले, ' माफ करा. पूर्वीच्या गोष्टी तुम्हांला विचारावयाच्या असतील, तर दुसऱ्या कोणाकडून त्या तुम्हीं

ऐकूं शकतां. मी संन्यासी जीवन घालवीत आहें. पूर्वीचं माझं असं कांहीं राहिलं नाहीं.' भनसाळींची ही निरहंकार वृत्ति त्यांच्या प्रत्येक हालचालींत भिनलेली आहे. तो त्यांचा स्वभावच झाला आहे. अहंकाराशिवाय मनुष्याचें शरीर टिकणें शक्य नाहीं, असें म्हणतात ते खरेंहि असेल. परंतु अहंकार गळून गेल्यानंतर मनुष्य कसा असूं शकतो, हें कोणाला प्रत्यक्ष पाहावयाचें असल्यास भनसाळींकडे पहावें, असें वाटतें.



# १६ महात्माजी कोठें जाणार?

## गंगेची अधोगति : १ :

‘ भर्तृहरीचा तो श्लोक तुम्हांला माहीत आहे काय ?’ बापूजींच्या दर्शनाकरितां आलेल्या माझ्या एका मित्रांनीं मला प्रश्न केला.

‘ कोणता श्लोक ?’

‘ ज्यांत स्वर्गापासून पाताळापर्यंत गंगेची अधोगति कशी होत गेली, याचं वर्णन आहे ?’

‘ माहीत आहे. पण तुम्हांला काय म्हणायचं आहे ?’

‘ दक्षिण आफ्रिकेंतून आल्यावर बापूजी अमदाबादला राहिले, तिथून ते वर्ध्याला आले, वर्ध्याहून सेवाग्रामला आले आणि आतां

सेवाग्रामहूनहि ते आणखी कुठं जाणार, म्हणून ऐकतों आहें ! हें या गंगेसारखंच कांहींसं नाहीं का ? '

' म्हणजे बापूजी एक एक पायरी खालीं उतरत आहेत असं तुमचं म्हणणं दिसतं.'

' ते स्वतः खालीं चालले असते, तर विशेष कांहीं वाटण्यासारखं नव्हतं. परंतु आपणाबरोबर लोकांनाहि ते खालीं ओढीत आहेत, ही दुःखाची गोष्ट आहे.'

## गांधीजींच्या योजनांवर आक्षेप : २ :

माझे हे मित्र एका मोठ्या शहरांत राहणारे व यांत्रिक औद्योगीकरणाचे पुरस्कर्ते आहेत. राजकारणाशीं त्यांचा संबंध नाहीं; व त्यांत ते पडतहि नाहींत. परंतु विधायक कार्यक्रमाच्या बाबतींत ते विशेष लक्ष घालतात. बापूजींविषयीं त्यांच्या मनांत श्रद्धा असली, तरी ते चुकत आहेत, असें त्यांना वाटतें. त्यांच्या म्हणण्याचें तात्पर्य हें होतें कीं, खेड्यांची उन्नति करण्याच्या दृष्टीनें बापूजी ज्या आज नवीन नवीन योजना आंखीत आहेत, त्यांपासून फायदा होण्याची शक्यता नाहीं. आज ज्या युद्धोत्तर प्रचंड योजना तयार होऊन राहिल्या आहेत, त्यांच्यापुढें महात्माजींच्या ह्या योजना टिकणें शक्य नाहीं, असा त्यांच्या म्हणण्याचा एकूण रोख होता.

अनेकांची हीच विचारसरणी आहे आणि म्हणूनच बापूजी अधिक जोरानें खेड्यांकडे वळले आहेत.

## मनांत विलक्षण खळबळ : ३ :

—' सेवाग्रामला महत्त्वाच्या घडामोडी, ' ' आश्रम मोडणार, ' ' चरखा संघाची पुनर्रचना, ' ' कस्तुरबा राष्ट्रीय ट्रस्ट फंड '—इत्यादि

गोष्टी वर्तमानपत्रांतून येत आहेत. त्यामुळें बापूजींच्या मनांत कांहीं तरी विलक्षण खळबळ चालली आहे, असें लोकांना वाटत असेल. आणि तें खरेंहि आहे. राजकारणाच्या बाबतींत मी हें लिहित नाहीं, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

## गांधीजींचा अदम्य उत्साह : ४ :

बापूजी पंचगणीहून ऑगस्ट २, १९४४ ला सेवाग्रामला आले. बरोबर दोन वर्षांपूर्वी ता. २ ऑगस्ट १९४२ ला ते येथून मुंबईला रवाना झाले होते. दोन वर्षांत विलक्षण घडामोडी झाल्या होत्या आणि त्यानंतर ते येथें आलेले आम्ही पाहत होतों. त्यांच्यावर आलेल्या राजकीय व सांसारिक संकट-परंपरांमुळें ते थकले असतील, हताश झाले असतील, अशी आमची कल्पना होती. परंतु पहिल्याच दिवशीं प्रार्थनेनंतर त्यांनीं प्रवचन दिलें! आम्ही थक्क झालों. आम्हाला कळून चुकलें, कीं आम्हीच थकलों आहों! निराश झालों आहों! बापूजी!—छे, ते तर पूर्वीच्या दुप्पट उत्साही झाले आहेत. अदम्य आकांक्षा त्यांच्यांतून ओसंडत आहेत. जगांत 'रामराज्य' प्रस्थापित करण्याकरितां झुंज घेण्याची ते तयारी करीत आहेत!!

## लढा अयशस्वी कां झाला? : ५ :

त्यांनीं पहिल्याच दिवशीं सांगितलें कीं, 'आमचा लढा अयशस्वी होण्याचें मुख्य कारण म्हणजे, खेड्यांशीं आम्ही अजून एकरूप झालों नाहीं, हें होय. इथेंच पाहा ना, आपल्याकरतां आम्ही छानशीं घरें बांधलीं; रस्ते तयार केले; स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, संस्कृति सर्वांची व्यवस्था केली. परंतु प्रत्यक्ष सेवाग्राममध्यें काय? तीच घाण, तीच रोगराई, तेंच दारिद्र्य, तेंच अज्ञान अजून आपलें अबाधित

साम्राज्य गाजवीत आहे. तें जोंपर्यंत सुधारत नाहीं, तोंपर्यंत ह्या आश्रमाची आणि येथील ह्या साऱ्या संस्थांची कांहीं किंमत नाहीं.'

## पक्के क्रांतिकारी झाले : ६ :

आज बापूजींच्या मनांत काय चाललें आहे, याची ओळख यावरून येईल. जेलमधून सुटल्यापासून ते पक्के क्रांतिकारी झाले आहेत, असें म्हणतां येईल. अर्थात् ही क्रांति दुसऱ्याच्या बाबतींत नाहीं, आपल्याच बाबतींत ते करूं इच्छितात. आपल्या सर्व संस्थांत आमूलाग्र परिवर्तन करण्याचा त्यांचा ठाम निश्चय दिसतो. खेड्यांची उन्नति जर आम्ही करूं शकत नसलों, तर चरखा संघ, ग्रामोद्योग संघ, तालिमी संघ, गोसेवा संघ आदि साऱ्या संस्था फोल होत. मग त्या ठेवण्यांत काय अर्थ आहे ? त्या नष्ट झाल्या तरी हरकत नाहीं, असें त्यांना आज वाटत आहे.

## एकसूत्रीपणाचा अभाव : ७ :

हे विचार क्रांतिकारक नाहींत काय ? स्वतःच उभारलेल्या व नांवारूपाला आणलेल्या ह्या देशव्यापी संस्था, जरूर वाटल्यास, मोडून टाकण्याचीहि ते भाषा बोलत आहेत, यावरून खेड्याच्या सर्वांगीण उन्नतीचा किती गंभीरपणें ते विचार करीत आहेत, हें दिसून येईल. याचा अर्थ असा नाहीं कीं ते या संस्था खरोखरच मोडायला निघाले आहेत. परंतु जें कार्य ते आज करूं इच्छितात, तें या संस्थांकडून कशा प्रकारें अमलांत येऊं शकेल, याचा ते विचार करीत आहेत. त्यांचा मुख्य भर यावर आहे, कीं आज विधायक कार्यक्रमाचीं कामें वेगवेगळीं चाललीं आहेत; त्यांचा परस्परांशीं फारच कमी संबंध आहे. चरखा संघाचे लोक खादी उत्पत्ति व विक्रीचें काम करीत आहेत;

बाकीच्या ग्रामोन्नतीच्या बाबींशीं त्यांचा संबंध नाहीं. ग्रामोद्योग संघाचे लोक तेलघाणी, हातकागद वगैरे विषय घेऊन बसले आहेत. तालिमी संघ सात ते चौदा वर्षांच्या मुलांचें उद्योगद्वारें शिक्षण, एवढाच विषय आपला समजून इतर विषयांशीं संबंध ठेवीत नाहींत. आश्रमाचे लोक आहारशास्त्राच्या पलीकडे जात नाहींत. अशाच प्रकारें हरिजन सेवक संघ, राष्ट्रभाषा प्रचार समिति वगैरे संस्था आपापलीं कामें करीत आहेत.

## युद्धोत्तर भीषण दुर्दशेची जाणीव : ८ :

बापूजींना एवढ्यानें समाधान नाहीं. आपली अहिंसक समाजरचनेची कल्पना ते संपूर्णपणें अमलांत आणूं इच्छितात. सत्य व अहिंसा यांवर आधारलेल्या समाजाची उभारणी जर आज करण्यांत आली नाहीं, तर युद्धोत्तर कालांत हिंदुस्थानची आजच्यापेक्षां देखील जास्त दुर्दशा होईल असें त्यांना वाटतें. आणि त्याकरितां त्यांच्या आत्म्याची सारखी तळमळ चालली आहे, असें दिसत आहे.

## जनतेचें दारिद्र्य वाढलें : ९ :

आजच्या युद्धकालांत जनतेची परिस्थिति कशा तऱ्हेची आहे, ह्याचें थोडें अवलोकन केल्यास बापूजींच्या तळमळीचें कारण लक्षांत येईल. जीवनास लागणाऱ्या सर्व वस्तूंचे भाव कल्पनातीत वाढल्यामुळें खेड्यांतील तशीच शहरांतील सर्वसाधारण लोकांची सर्व संपत्ति मोठमोठे सावकार, व्यापारी व कारखानदार यांच्या हातांत येत आहे. ह्यामुळें जे पूर्वीं लाखोपति होते ते आज करोडोपति झाले आहेत आणि सामान्य जनता, विशेषतः खेड्यांतील जनता होती त्यापेक्षांही दरिद्री झाली आहे. युद्धोत्तर कालांतील यांत्रिक औद्योगी-


करणाच्या प्रचंड योजना आज गबर झालेल्या भांडवलदारांना आणखी गबर करतील आणि अशा प्रकारें देशांतील सर्व संपत्ति व सत्ता ह्या भांडवलदार लोकांच्या हातांत येईल. हिंदुस्थानांत तरी हें स्पष्ट दिसत आहे, कीं युद्धानंतरची समाजरचना भयंकर विषम आणि हिंसक बनेल.

## अहिंसक समाजरचनाच अवश्य : १० :

ही परिस्थिति टाळावयाची असल्यास अहिंसक समाजरचनेशिवाय गत्यंतर नाहीं. सरकार आणि भांडवलदार वर्गांच्या हिंसक शक्तींनीं आपला जोरदार प्रकार चालविला आहे. साधारण लोकांना त्यांतच आपली उन्नति आहे असें वाटूं लागलें आहे. परंतु बापूजींच्या डोळयांपुढें पुढील भीषण परिस्थितीचें चित्र स्पष्ट असल्यामुळें ही परिस्थिति कशी टाळतां येईल, ह्या विचारानें ते बेचैन आहेत. आज त्यांच्या बोलण्यांत व वागण्यांत जी गंभीरता दिसून येते, ती ह्यामुळेंच होय. ह्या दृष्टीनें येथील सर्व कार्यकर्त्यांना व संस्थांना त्यांनीं वेळोवेळीं आपले विचार सांगितले, व त्याप्रमाणें नवीन योजना आंखून त्या अमलांत आणण्याचें कार्य येथें चालू झालें आहे.

## अधोगति नव्हे, उन्नति : ११ :

सुरुवातीला उल्लेखिलेला गंगेची अधोगति दाखविणारा श्लोक तिची उन्नतिच दाखवितो, असें मीं माझ्या मित्रांना सांगितलें. कारण गंगामाई जर स्वर्गांतून अशी खालीं उतरली नसती, तर लोकांना शांति आणि समृद्धि लाभली असती काय ? बापूजी आज खेड्यांकडे जात आहेत याचा अर्थ ते खालीं जात नसून वर जात आहेत, हें यावरून दिसून येईल.



# १७ 'मी एकटा राहिलों तरी....'

## सेवाग्राममध्यें मल्लयुद्ध : १ :

'थोडया दिवसांपूर्वी दोन मल्लांची कुस्ती सेवाग्रामला आम्हाला पहावयाला मिळाली. कुस्ती इतकी प्रेक्षणीय होती कीं, आतां पुढें काय म्हणून सर्वांच डोळे तिकडे लागले होते.'–ता. ७ ऑक्टोबरपासून १२ ऑक्टोबर १९४४ पर्यंत जाजूजींची बापूजींशीं जी चर्चा झाली, तिला उद्देशून वरीलप्रमाणें मी एकाजवळ म्हणालों.

## कणखर व्यावहारिक साधुत्व : २ :

श्रीकृष्णदास जाजू हे अखिल भारत चरखा संघाचे मंत्री आहेत. व्यावहारिकता व साधुत्व यांचा अद्भुत मेळ त्यांच्यांत झालेला आहे.

अखिल हिंदुस्थानांतील पंधरा हजार गांवांत पसरलेलें चरखा संघाचें अवाढव्य कार्य चालविणें सोपें काम नाहीं. तें चालविण्याकरितां तसाच कणखर मनुष्य पाहिजे. आणि जाजूजींसारखा कणखर मनुष्य दुसरा सांपडणार नाहीं, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईलसें वाटत नाहीं.

## अंतराळांतील विहार : ३ :

'या मल्लयुद्धांत हार कोणाची झाली? बापूजींची कीं जाजूजींची?'—तुम्ही विचाराल.

ह्यांत हारजितीचा प्रश्न नाहीं. खेड्यांची सर्वांगीण सुधारणा कशी करतां येईल, यासंबंधीं बापूजी आपले विचार जाजूजींना सांगत होते. त्यांचे ते विचार ऐकतांना आपण अंतराळांत विहार करीत आहोंत असा भास तें ऐकणाऱ्यांना होत होता. बापूंचा आदर्शवाद किती उत्कर्षाला पोंचला आहे याची आम्हाला पदोपदीं जाणीव होत होती. गांवांचें समग्र उत्थान कसें होऊं शकेल, ही एकच चिंता त्यांना व्यापून राहिलेली स्पष्ट दिसत होती.

## एकांगी कार्याची जाणीव : ४ :

आज चाललेलें चरखा संघाचें कार्य एकांगी आहे, अपुरें आहे. शहरांत खादी विकून खेड्यांतील लोकांना रोजी देण्यानें खेड्यांची संपूर्ण उन्नति होणार नाहीं. खेड्यांचें समग्र उत्थान करावयाचें असेल, तर खेड्यांतील लोकांना जीवनांत येणाऱ्या प्रश्नांशीं सामना करण्याला समर्थ केलें पाहिजे, असें ते म्हणाले.

## खादी विकण्याची वस्तु नाहीं : ५ :

याकरतां आज चालत असलेलें निर्मितीचें व विक्रीचें काम सर्वस्वी बंद करून फक्त स्वावलंबी खादीचें कामच चालू केलें पाहिजे, असें बापूजींनीं सांगितलें. कारण त्यांचें म्हणणें आहे कीं खादी ही रोटीप्रमाणें घरांतच तयार झाली पाहिजे. ती विकण्याची वस्तु नाहीं, वापरण्याची वस्तु आहे.

## कार्यांतील अडचणी : ६ :

जाजूजींनीं बापूजींना सांगितलें कीं, 'आपण म्हणतां तें खरें असलें, तरी स्वावलंबनाच्या दृष्टीनें खादीचा प्रचार करावयाचा म्हटल्यास आज चरखा संघाचें कार्य अगदींच संकुचित करावें लागेल. चरखासंघाचे कार्यकर्ते देखील पूर्णपणें वस्त्रस्वावलंबी आहेत असें म्हणतां येत नाहीं. तेव्हां खेड्यांतील लोकांना वस्त्रस्वावलंबन पटवणें किती कठिण आहे याची कल्पना करवत नाहीं.' आजपर्यंत आम्ही ही गोष्ट करूं शकलों नाहीं, हेंही जाजूजींनीं कबूल केलें.

## बापूजींच्या आंतरिक वेदना : ७ :

जाजूजींचें हें स्पष्टीकरण ऐकून बापूजींना किती आंतरिक वेदना झाल्या, हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येणारें आहे. 'वस्त्रस्वावलंबनाच्या बाबतींत पूर्ण संशोधन करून हें दिसून आलें आहे, असें जर असेल, तर खेडयांतील लोक वस्त्रस्वावलंबी होणार नाहींत, आणि कार्यकर्ते निराश होतील.' परंतु त्यांची ही निराशा क्षणभरच राहिली. सत्यअहिंसेवर श्रद्धा असलेले सेवाभावी कार्यकर्ते काय करूं शकणार नाहींत ? कार्यकर्त्यांनीं खेडयांत जाऊन तेथील

जीवनाशीं समरस झालें पाहिजे. त्यांनीं खादी व ग्रामोद्योगाचीं कामें सुरू करून गांवाचें औद्योगिक संघटन अशा प्रकारें केलें पाहिजे कीं ज्यामुळें गांव संपूर्ण स्वावलंबी होईल.

## शेतीची उपेक्षा करूं नका :८:

आजपर्यंत बापूजींनीं शेतीचें काम आपल्या मर्यादेबाहेरचें म्हणून सोडून दिलें होतें. राज्यसत्ता हातीं असल्याशिवाय शेतीच्या बाबतींत कांहीं करतां येणार नाहीं, अशी त्यांची कल्पना होती. पण गांवाचें समग्र उत्थान करावयाचें असल्यास शेतीच्या क्षेत्रांत काम करणें अनिवार्य आहे, असें आज ते सांगत आहेत. ते इथपर्यंत म्हणाले कीं ' आमचे लोक खादीच्या ऐवजीं शेतींत विशारद होऊन लोकांची सेवा करतील, तर मला वावगें वाटणार नाहीं.' ग्रामोत्थानाचा पाया खादी आहे हें त्यांचें म्हणणें कायम असलें, तरी शेतीची उपेक्षा करून चालणार नाहीं, असें आज त्यांना वाटत आहे.

## राज्यसत्तेची आवश्यकता :९:

राज्यसत्ता हातांत आल्याशिवाय किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्याशिवाय राष्ट्रोद्धाराचीं कोणतींहि कामें करतां येणार नाहींत, असें म्हणणारा एक पक्ष आहे. बापूजींच्या समग्र ग्रामउत्थानाबद्दल जवाहरलाल नेहरूंचे भगिनीपति श्री. हाथीसिंग यांच्याशीं मी बोलत असतांना हा प्रश्न निघाला. यांत्रिक औद्योगीकरणाला ते मानणारे असले, तरी हिंदुस्थानांत ग्रामोद्योगांना स्थान आहे, अशा मताचे ते आहेत; परंतु राज्यसत्ता हातीं आल्यास हें सर्व पांच-दहा वर्षांत आपणाला करून दाखवतां येईल. तेंच राज्यसत्ता नसल्यास शंभर वर्षांत देखील हें अमलांत येईल कीं नाहीं याची

शंकाच आहे, अशा तऱ्हेचें त्यांचें मत पडलें. बहुतेकांचें असेंच मत आहे, यांत शंका नाहीं.

## मग अहिंसा कशाला ? : १० :

मी त्यांना म्हणालों कीं असें असल्यास बापूजींची अहिंसा निष्फळ असल्याची कबुली देण्यासारखें होत नाहीं काय ? सत्तेनेंच जर कामें होत असतील, तर अहिंसेच्या मागें बापूजी कां लागले आहेत ? पूर्वीपेक्षां देखील बापूजींचा अहिंसेवर आज जास्त विश्वास आहे. शेती, शिक्षण, आरोग्य वगैरे सर्व जीवनक्षेत्रांत आपण कार्य केलें पाहिजे, हें जें ते आज म्हणत आहेत, त्यावरून हें दिसून येईल.

## सत्ता नको, अहिंसा हवी : ११ :

सत्तेनें नाहीं, अहिंसेनेंच गांवांचें उत्थान होणार आहे, यावर बापूजींचा पूर्ण विश्वास आहे. आणि त्यामुळेंच अहिंसक समाजरचनेचें स्वप्न खरें झालेलें ' याचि डोळां ' पाहण्याची ते पराकाष्ठा करीत आहेत. जेलमधून सुटल्यानंतर आपण सरकारशीं व मुस्लिम लीगशीं तडजोड घडवून आणूं व अशा प्रकारें राष्ट्रीय सरकार स्थापन करून लोकांचें समग्र उत्थान अहिंसक समाजरचनेच्या पायावर घडवून आणतां येईल, असें त्यांना वाटत होतें. परंतु सरकारशीं किंवा मुस्लिम लीगशीं समेट करण्याचे त्यांचे प्रयत्न सफल झाले नाहींत; तर सरकारचा आणि विरोधी पक्षांचा विरोध कळसाला पोंचला आहे, त्यांच्याकडून सहकार्य मिळण्याची थोडीहि आशा नाहीं, अशा विपरीत परिस्थितींत सांपडलेला कोणताहि मनुष्य निराश झाल्याशिवाय राहिला नसता. परंतु ज्याचा ईश्वरावर विश्वास आहे, तो कधीं तरी निराश होईल काय ? बापूजींचें जीवन तत्त्वावर अधिष्ठित आहे. परिस्थिति

अनुकूल नसली, लोक विरोधी असले, म्हणून काय झालें? जें श्रेयस्कर आहे तें केलेंच पाहिजे.

## आपल्या पायावर उभे राहा : १२ :

आणि म्हणूनच तालिमी संघाच्या लोकांना त्यांनीं सांगितलें कीं सरकारवर अवलंबून राहूं नका, स्वतःच्या पायावर उभे राहा व नव-शिक्षणाला देशव्यापी बनवा. तात्पर्य, सत्ता मिळेल तेव्हां मिळेल, त्याकरतां थांबून राहण्याची आवश्यकता नाहीं. सत्तेशिवाय देखील अहिंसक समाजरचनेचें कार्य करतां येणें शक्य आहे. आणि तें करण्याकरितां ते आपल्या सर्व संस्थांना सांगत आहेत.

## कठिण परीक्षा है : १३ :

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणें जाजूजींची व बापूजींची जी चर्चा झाली, त्यांत बापूजी आपल्या क्रांतिकारी कल्पना सांगत होते व त्या अमलांत कशा आणतां येतील याबद्दल जाजूजी संशय व्यक्त करीत होते व त्यांतील व्यावहारिक अडचणी पुढें मांडीत होते. एक अंतराळांत विहार करीत होता, तर दुसऱ्यानें जमिनीवर आपले पाय पक्के रोवले होते. आणि म्हणूनच दोघांचें तें प्रेक्षणीय मल्लयुद्ध होतें असें मीं म्हटलें. ‘ कठिण परीक्षा है ’–असें म्हणून जाजूजी चिंताग्रस्त होत, तेव्हां बापूजी त्यांना धीर देत कीं ‘ हरलांत तरी मीहि तुमच्या-बरोबर आहें ना. ’

बापूजींचें म्हणणें असें आहे कीं एकएका कार्यकर्त्यानें एकएका गांवांत जाऊन बसावें व अहिंसक समाजरचनेच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याच्या कार्याचा आरंभ करावा. कार्यकर्त्याला स्वतंत्रपणें कार्य करण्याची मोकळीक असावी, त्यावर इतरांचें नियंत्रण नसावें, असेंहि त्यांचें म्हणणें आहे.

## योग्य कार्यकर्त्यांची उणीव : १४ :

जाजूजींचें म्हणणें असें कीं स्वतंत्रपणें कार्य करूं शकतील, असे योग्य कार्यकर्ते फारच थोडे आहेत. बाकीच्यांवर नियंत्रण असलें पाहिजे. रुपया-पैशांचा संबंध आहे. विकेन्द्रीकरण आपण म्हणतां, पण तशी लायकी आमच्यांत नाहीं. तसे कार्यकर्ते मिळणें आज कठिण आहे. कार्यकर्ते देखील आज लोकसमाज जसा आहे तसेच मिळणार; त्याहून चांगले थोडेच मिळायचे आहेत ?

## गांधीजींचा निर्धार : १५ :

सरकारचें आणि लोकांचें आपणाला सहकार्य नाहीं आणि आपण उभारलेल्या संस्था—ज्यांच्यातर्फे आपणाला आपलें कार्य चालवावयाचें आहे—त्या, तें कार्य कठिण असून तें अमलांत आणणें आपल्या शक्तीबाहेरचें आहे, असें म्हणत आहेत, हें पाहिल्यावर तरी बापूजी निराश झाले असतील, असें तुम्हाला वाटेल; पण नाहीं. त्यांचा आशावाद जबरदस्त आहे. एका बाजूनें आपल्या संस्थांना समर्थ करण्याचें कार्य त्यांनीं सुरू केलें व दुसऱ्या बाजूनें ह्या संस्था व आपले अत्यंत विश्वासू कार्यकर्ते देखील जर ह्याला तयार नसले, तर स्वतःच एकट्यानें समग्र उत्थानाचें काम करण्याचा त्यांचा निर्धार आहे. ते उपवास करणार म्हणून जिकडे तिकडे खळबळ उडाली होती. परंतु त्या उपवासाच्या मागें कोणता निर्धार होता हें या लेखाच्या शीर्षस्थळीं दिलेल्या त्यांच्या उद्गारांवरून दिसून येईल. ‘ मी एकटा राहिलों, तरी हेंच काम मला करावयाचें आहे. देशानें सांथ दिली तर ठीक, स्वतःच्या संस्थांनीं आणि मित्रांनीं सांथ दिली तर ठीक; नाहीं तर मी एकटा हिंदी जनतेच्या समग्र उत्थानाचें काम

करीन, मागें हटणार नाहीं', ह्या वीरवृत्तीचें प्रतिबिंब त्यांच्या सर्व व्यवहारांत आज दिसून येत आहे.

## समग्र उत्थानाची चळवळ : १६ :

जनतेच्या समग्र उत्थानाच्या लोभनीय ध्येयानें त्यांचे सर्व व्यवहार चाललेले आहेत. विधायक कार्यक्रमांत आजपर्यंत त्यांनीं शेतीचा समावेश केला नव्हता, पण त्यालाहि आज त्यांनीं स्थान दिलें आहे. गोसेवासंघाचें कार्य या दृष्टीनें संघटित करण्याचें कार्य सुरू झालें आहे. शिक्षणाच्या बाबतींतहि आज त्यांचीं मतें सर्वगामी बनलीं आहेत. सात ते चौदा वर्षांच्या मुलांना उद्योगाच्या द्वारें शिक्षण देणें ज्याला वर्धा शिक्षण पद्धति किंवा Basic Education असें संबोधिण्यांत येतें, एवढ्यानें काम होणारें नाहीं. मूल जन्मल्यापासून तों थेट मरेपर्यंत, लहानापासून थोरांपर्यंत सर्व स्त्रीपुरुषांना शिक्षण देण्याचें काम करण्याचा तालिमी संघाला त्यांनीं आदेश दिला आहे. मुली आणि स्त्रिया यांना समाजानें अशिक्षित ठेवलें आहे, त्यांच्या शिक्षणाची आधीं काळजी घेतली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे व त्या दृष्टीनें कस्तुरबा ट्रस्ट फंडाचें कार्य चालविण्यांत येणार आहे.

## साक्षरता नाहीं, सार्थकता हवी : १७ :

अमुक एका विशिष्ट वर्गाला अमुक एक विशिष्ट शिक्षण देण्याची बापूजींची कल्पना नाहीं. संपूर्ण जनतेला सर्वांगीण शिक्षण देण्याची त्यांची दृष्टि आहे. बापूजी जनतेला फक्त साक्षर करूं इच्छित नाहींत, जीवनोपयोगी सर्व बाबींचें ज्ञान ते त्यांना देऊं इच्छितात.

६७३८.

## बुलंद काम :१८:

खेड्यांच्या उत्थानाची त्यांची कल्पना प्रचंड आहे. मनुष्यजीवनांतील अशी एकहि गोष्ट नाहीं कीं, जिच्यामध्यें ते क्रांति करूं इच्छित नाहींत. आणि हें सर्व सत्तेशिवाय निव्वळ अहिंसेनें, सेवेनें झालें पाहिजे. असें काम करण्याची हिंमत असलेले कार्यकर्ते त्यांना आज पाहिजे आहेत. या त्यांच्या कल्पनेप्रमाणें येथील सर्व संस्थांनीं एकत्रित होऊन ग्रामोत्थानाचें कार्य करण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें सर्व संस्थांच्या संचालकांचें एक कार्यकारी मंडळहि स्थापन करण्यांत आलें आहे. परंतु बापूजींचा संस्थांपेक्षांहि कार्यकर्त्यांवर अधिक भर आहे. प्रत्येक खेड्यांत असा एक तरी कार्यकर्ता त्यांना हवा आहे. तालिमी संघाच्या सदस्यांना उद्देशून नुकतेच म्हटलेले बापूजींचे हे शब्द लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

ते म्हणाले, ‘ आम्ही अद्याप खेड्यांत गेलों आहोंत कोठें ? सेवाग्राम हें पहिलें खेडें आहे कीं, जिथें मी जाऊन बसलों. इथें मला जें करावयाचें होतें, तें मी करूं शकलों नाहीं. काम कठीण आहे. त्याच्या नुसत्या विचारानें डोकें फिरूं लागतें; परंतु त्याबरोबरच तें ‘ बुलंद काम ’ आहे. ’

काम कठीण असेल, पण तें बुलंद आहे. बापूजी एकटे राहिले तरी त्यांना तें करावयाचें आहे !

सेवाग्राम
२-१२-४४

REFBK-0006739

# शुद्धिपत्र

—:०:—

| पृष्ठ--ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १३—८ | बहिरुपाधिन् | बहिरुपाधीन् |
| २६–१५ | कलावृत्तींनीं | कलाकृतींनीं |
| २८—९ | महात्मजींच्या | महात्माजींच्या |
| ३१–२१ | आपल्या | आपला |
| ३३–२० | विद्यार्थि | विद्यार्थी |
| ४३–११ | चाहते | चाहती |
| ५०–१२ | सत्याची | त्याची |
| ५२–११ | कार्यालयाला | कार्याला |
| ६०–१८ | मसूर | न सूर |
| ६६—९ | कश्चिदेनमः | कश्चिदेनम् |
| ६६–१५ | ऽ प्येन | ऽ प्येनं |
| १०३–१२ | चह | चहा |
| १०३–१४ | साहित्यकांत | साहित्यिकांत |

# गांधीजींचें जीवन

१८६९ ऑक्टोबर २—जन्म. पोरबंदर येथें (आजोबा व वडील दिवाण).
१८९४ मे २२ रोजीं नाताळ इंडियन कॉंग्रेसची स्थापना.
१८९६ हिंदुस्थानांत परत. गोखले भेट.
१८९७ डर्बान येथें पुन: गेले—१३ जानेवारी रोजीं (मार खाल्ला. वेषांतर केलें.)
१९०१ हिंदुस्थानांत परत. ब्रह्मदेशांत दौरा.
१९०३ पुनश्च आफ्रिकेंत.
१९०७ बॅरिस्टरी बंद. नोंदणी–फी. लोकेशनचा कायदा मंजूर. सत्याग्रहाचें रणशिंग.
१९०८ (१०–१) गांधींना २ म. शिक्षा, नंतर स्मट्सनें वचनभंग केला. १० फेब्रुवारी रोजीं मीर आलम या पठाणानें डोक्यावर सोटा मारला.
१९१५ जानेवारी ९—मुंबईस परत.
१९१५ मे २५–सत्याग्रहाश्रमाची स्थापना अहमदाबाद येथें.
१९१८ अहमदाबाद येथील गिरणी-मजुरांनीं महागाई-भत्ता मिळविण्यासाठीं संप केला. गांधीजींची चौकशी-समिति. ३ दिवस उपोषण, २१ दिवसांनीं तडजोड.
१९१९ एप्रिल ६—अमृतसर येथें जालियनवाला बागेंत डायरचा गोळीबार. डिसेंबर–नव्या सुधारणा–राजबंद्यांची मुक्तता–अमृतसरची राष्ट्रसभा–टिळक–गांधींचा समेट.
१९२० १ ऑगस्ट–असहकारिता सुरू. सप्टेंबर–कलकत्ता येथें जादा राष्ट्रसभा. १ वर्षांत स्वराज्याची घोषणा. डिसेंबर–नागपूर येथें जादा राष्ट्रसभा.
१९२१ नोव्हेंबर १७–युवराजांचें मुंबईंत आगमन, स्वागतावर बहिष्कार, दंगेधोपे गांधींचा ४ दिवसांचा उपवास.
१९२२ फेब्रुवारी ५–चौरीचुरा येथें २१ पोलिसांना जाळलें. बार्डोलींतील कायदेभंगाची चळवळ स्थगित. गांधींचा ५ दिवसांचा उपवास. मार्च १० रोजीं गांधींना अटक. ६ वर्षे शिक्षा.
१९२४ ५ फेब्रुवारी रोजीं बंधमुक्तता. ८ सप्टेंबर रोजीं दिल्ली येथें २१ दिवसांचें उपोषण. त्याचें कारण हिंदुमुसलमानांचे दंगे. डिसेंबरमध्यें बेळगांव येथील राष्ट्रसभेचे अध्यक्ष गांधी.
१९३० जानेवारींत ११ मागण्या गांधींनीं जाहीर केल्या–मार्च १२ रोजीं सत्याग्रहाश्रमाचा स्वराज्यप्राप्तीपर्यंत त्याग करून दांडीकडे. ६ एप्रिल रोजीं दांडी येथें मिठाचा कायदेभंग. ४ मे रोजीं कराडी येथें अटक. येरवड्यास रवानगी.
१९३१ जानेवारी १–जानेवारी २५ रोजीं गांधीजींची बिनशर्त सुटका. मार्च ४ रोजीं गांधी–अर्विन करार.—ऑगस्ट २९ रोजीं दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठीं गांधी मुंबईहून विलायतला निघाले.

१९३२ जानेवारी ४ रोजीं पहांटे मुंबई येथें अटक. येरवड्यास रवानगी.—ऑगस्ट १७ रोजीं जातिनिर्णय–सप्टेंबर २० रोजीं प्राणांतिक. उपोषण–२६ रोजीं येरवडा करारास सरकारी मान्यता. उपोषणाची समाप्ति.

१९३३ मे ८–२१ दिवसांचा उपवास–कारण अस्पृश्यता. ऑगस्ट १ रोजीं–गांधीजींना अटक—तारीख ४ रोजीं मुक्तता–पुनः अटक १ वर्षाची शिक्षा.

१९३४ जून २५ रोजीं पुणें येथें गांधीजींवर बाँब—त्यांतून बचाव–जुलैमध्यें ७ दिवसांचा उपवास–लालनाथावर हल्ला हें कारण. ऑक्टोबर २९ रोजीं मुंबई येथें राष्ट्रसभा-तींतून गांधीजी निवृत्त.

१९३५ सेगांव ( सेवाग्राम ) या खेड्यांत आश्रमाची कोनशिला.

१९३७ निवडणुकींत राष्ट्रसभा यशस्वी—एप्रिलपासून हंगामी मंत्रिमंडळें–सरकारकडून दोन अभिवचनें मिळून गांधींनी जुलै १७ रोजीं सात प्रांतांत राष्ट्रसभेला राज्यारूढ केलें.

१९३९ राजकोट-प्रकरणीं प्रायोपवेशन. ऑक्टोबरांत प्रांतिक मंत्रिमंडळाचे राजीनामे.

१९४२ मार्च—क्रिप्स् योजनेचा अव्हेर, ऑगस्ट ८—'चलेजाव'ची घोषणा. अटक, आगाखान वाड्यांत स्थानबद्ध. ता. १५ रोजीं महादेवभाईंचा मृत्यु.

१९४३ फेब्रुवारी—स्थानबद्धतेंत २१ दिवसांचें उपोषण.

१९४४ फेब्रुवारी २२—सौ. कस्तुरबांचें तुरुंगांत निधन.

मे ६—आजारीपणामुळें गांधीजी बंधमुक्त.

सप्टेंबर ९ ते २७—बॅ. जिनांशीं वाटाघाटी—अखंड भारताचा पुरस्कार. ऑक्टोबर २—सेवाग्राम येथें गांधीजींना १ कोटी १५ लाखांचा 'कस्तुरबा–निधि' खेड्यांतील बाल–स्त्रियांच्या शिक्षणारोग्याप्रीत्यर्थ अर्पण. "१२५ वर्षे जगण्याची माझी इच्छा आहे." असे गांधीजींचे उद्गार.

१९४५ एप्रिल. गांधीजींना वाढदिवसानिमित्त जमा केलेल्या २४००० रु. थैली अर्पण करण्यांत आली. जून ता. २५ जून सिमला परिषदेस सुरुवात. एक महिना वाटाघाटी चालून ती अयशस्वी झाली.

१९४६ मार्च–नव्या प्रांतिक निवडणुका. लोकनियुक्त प्रां. मंत्रिमंडळाची पुनर्स्थापना. ता. १६ मे ब्रिटिश मंत्री-शिष्टमंडळाच्या शिफारसींचा खर्डा प्रसिद्ध झाला. गांधीजींनीं त्यावर अनुकूल अभिप्राय दिला. जून १६–हंगामी सरकारच्या स्थापनेबाबत व्हाइसरॉयच्या शिफारसींचा खर्डा. जुलै १–नेरळनजीक आगगाडीच्या अपघातांतून गांधीजींचा बचाव. सप्टेंबर ता. २–हंगामी राष्ट्रीय सरकारची स्थापना. ऑक्टोबर २–गांधीजींचा ७८ वा वाढदिवस.